नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक २६७ * * अकोला * सोमवार, दिनांक २४ मार्च २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
4 रुपयात

## छत्रपती संभाजीराजेंचे मुख्यमंत्री फडणवीसांना पत्र

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २३ :
महाराणी ताराबाई यांच्या समाधी स्थळाबाबत छत्रपती संभाजीराजे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिले आहे. महाराणी ताराबाई यांच्या स्मृतीस्थळाबद्दल अधिक व विस्तृत संशोधनासाठी इतिहास तज्ज्ञांची समिती नेमण्याची मागणी या पत्राद्वारे छत्रपती संभाजीराजे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

इतिहास अभ्यासकांनी महाराणी ताराबाई यांचे स्मृतीस्थळ हे सातारा येथे संगम माहुली येथे असल्याचे मांडले आहे. महाराष्ट्र शासनाने इतिहास तज्ज्ञांची समिती नेमून या स्मृतीस्थळाबद्दल अधिक व विस्तृत संशोधन करावे व तत्काळ या स्मृतीस्थळाचा जीर्णोद्धार करावा, अशी विनंती छत्रपती संभाजीराजे यांनी पत्रातून मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.



अग्राग्रलेख

### खरीखरी...


## शांतता राखा !

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नागपूर येथे पत्रकार परिषद घेतली. नागपूरच्या दंगलीसाठी जे जे जबाबदार आहेत अथवा असतील. त्यांच्याकडून दंगलीत झालेल्या नुकसानीची भरपाई वसूल करण्यात येईल, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्टपणे घोषित केलेले आहे. हे दंगलखोर कोण होते. त्यांनी पद्धतशीरपणे जे विध्वंसक कृत्य केले. ते सर्वांनाच ठाऊक आहे. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी हिंसाचाराबद्दल कोणकोण जबाबदार आहेत, याचा आढावा घेतला. या हिंसाचारमागे मालेगाव कनेक्शन आहे का, याचाही उल्लेख मुख्यमंत्र्यांनी केला. या नियोजित दंगलीमागे आणखी कोणकोण आहेत. याचा तपास सुरू असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. नागपूर शहर वर्षानुवर्षे शांततेचे शहर म्हणून ओळखले जाते. या शहरात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय आहे. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची दीक्षाभूमी सुद्धा आहे. नागपूरची स्थापना ज्यांनी केले ते राजे बख्त बुलंदशाह हे मुस्लिम होते. त्यांचा पुतळा सरकारतर्फे नागपूरच्या मध्यवर्ती ठिकाणी बसविण्यात आलेला आहे. अशा सर्वधर्मसमभावी शहरात झालेली दंगल निश्चितच चिंताजनक आहे. सकाळी बजरंग दल आणि विश्व हिंदू परिषद यांनी मोर्चा काढला. त्या मोर्चात औरंगजेबाच्या कबरीबद्दल काही विधाने करण्यात आली. त्यानंतर नागपूर येथील काही भागात जी दंगल उसळली. त्यात मोठी दगडफेक करण्यात आली. त्यावेळेस मोठमोठाले दगड वापरण्यात आल्याचे प्रत्यक्षदर्शी सांगतात. ही दगडफेक नियोजनाशिवाय होऊ शकत नाही हे स्पष्ट आहे. नियोजन नसते तर इतके मोठे दगड एवढ्या मोठ्या प्रमाणात पोलिसांना मारण्यासाठी उपलब्ध झाले असते काय, हा सुद्धा प्रश्न आहे. दंगलखोरांनी जाळपोळ केली. अनेक वाहनांचे नुकसान केले आणि लोकांना त्यांच्या घरादारात जाऊन धमक्याही दिल्याचे आरोप होत आहेत. यात कोणाचीही बाजू घेण्याचा प्रश्नच नाही. जी वस्तुस्थिती आहे ती मान्य केलीच पाहिजे. काँग्रेसने याबाबतीत केवळ मुसलमानांवरच देशद्रोहाचा गुन्हा का? अशी विचारणा केलेली आहे. याबाबतीत काँग्रेसने सत्यशोधन समितीची स्थापना केलेली आहे. त्यामुळे त्यांनाही सत्य शोधून दंगल कशी आणि कोणी केली. हे सांगावे लागेल. दंगलखोर विशिष्ट समाजाचे आहेत. असा आरोप पोलिसांकडून चौकशी पूर्ण झाल्याशिवाय करता येणार नाही. आता हळूहळू जसजशी संचारबंदी शिथिल होत आहे. तसतशी राजकीय वक्तव्ये करण्यात येत आहेत. त्याबद्दलही मुख्यमंत्र्यांनी चिंता व्यक्त केलेली आहे. कायदा हाती घेणारे कोणीही असोत, त्यांना कायद्याच्या राज्यात शिक्षा होणे अवश्यंभावी आहे. नागपूर शहराचा बराच मोठा भाग संचारबंदीमुळे अनेक दिवस बंद होता. त्यामुळे कोट्यवधींचे नुकसान झालेले आहे. अनेक व्यापा?यांचा मोठ्या प्रमाणावर तोटा झालेला आहे. तो कोण भरून काढणार. ज्यांचे नुकसान झालेले आहे त्यांना नुकसान भरपाई मिळेल. मात्र दंगलीमुळे नुकसान झालेले आहे, पण दिसत नाही त्या नुकसानीची भरपाई कोणीही करू शकत नाही. एकूणच या दंगलीपायी शांत शांत असलेले नागपूर अजूनही अशांत आहे. शहरातील व्यवहार ज्या बँकांमार्फत चालतात. त्या बँकाही या काळात बंद होत्या. मुख्यमंत्र्यांनी याबाबतीत कठोर धोरण स्वीकारलेले आहे. ते अयोग्य आहे असे कोणीच म्हणणार नाही. आता जे दोषी असतील त्यांना निश्चितच शिक्षा झाली पाहिजे. पण पकडलेले सर्वच दोषी आहेत, असे समजण्याचे कारण नाही. नागपूर शहराच्या सौख्यासाठी आणि शांततेसाठी या दंगली बाबत कडक निर्णय घेऊन मुख्यमंत्र्यांनी आपले शहर कसे शांत राहील आणि सर्व व्यवहार कसे सुरळीतपणे सुरू होतील हे पहावयाचे आहे. मुख्यमंत्र्यांच्या शहरात झालेली दंगलीची ही घटना शेवटची ठरो. एवढीच अपेक्षा याप्रसंगी व्यक्त करावीशी वाटते.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# सुशांत सिंह राजपूतची हत्या नव्हे, आत्महत्याच!

### सीबीआयने दाखल केला क्लोजर रिपोर्ट : रिया चक्रवर्तीला क्लीन चिट





■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २३ :
सुशांत सिंह राजपूत प्रकरणाचा क्लोजर रिपोर्ट मुंबई न्यायालयात दाखल केला आहे. सुशांत सिंग राजपूत यांचे २०२० मध्ये निधन झाले. सुमारे ४ वर्षे आणि ४ महिन्यांनंतर, सीबीआयने क्लोजर रिपोर्ट दाखल केला. सीबीआयने रिया चक्रवर्ती आणि तिच्या कुटुंबाला क्लीन चिट दिली आहे. सीबीआयच्या तपासानुसार, सुशांत सिंह राजपूतच्या मृत्यूला कोणीही जबाबदार नाही.

रिया चक्रवर्ती सुशांत सिंह राजपूतसोबत रिलेशनशिपमध्ये होती. मात्र, दोघांनीही आपले नाते अधिकृत केले नव्हते. पण 14 जून 2020 रोजी मुंबईतील वांद्रे येथील राहत्या घरी सुशांत मृतावस्थेत सापडला होता. करीयर यशाच्या शिखरावर असताना त्याने स्वतःला संपवल्यामुळे त्याच्या मृत्यूचे गूढ वाढले होते.

सुशांत सिंह राजपूतच्या आत्महत्या प्रकरणात ड्रग्जचा अँगलही समोर आला. सुशांतच्या कुटुंबीयांनी रिया चक्रवर्तीवर गंभीर आरोप केले होते. सुशांत आत्महत्या प्रकरणात तिला मुख्य आरोपी मानले जात होते. तिला एक महिना भायखळा तुरुंगात देखील जावे लागले होते.

या प्रकरणात, सीबीआयने 6 ऑगस्ट 2020 रोजी एफआयआर नोंदवला होता, आता 4 वर्षे 6 महिने आणि 15 दिवसांनंतर, सीबीआयने अंतिम क्लोजर रिपोर्ट मुंबई कोर्टात दाखल केला आहे.

यामध्ये अभिनेत्री रिया चक्रवर्ती आणि तिच्या कुटुंबीयांना क्लीन चिट देण्यात आली आहे. या प्रकरणात कुठलाही पुरावा न सापडल्याने सीबीआयने तपास बंद केला आहे. सीबीआयने दोन प्रकरणांची चौकशी केली होती...

सुशांतचे वडील केके सिंह यांनी रिया चक्रवर्तीविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त करणे, फसवणूक आणि मनी लाँड्रिंगचा आरोप करत एफआयआर दाखल केला होता.

रिया चक्रवर्तीची तक्रार, ज्यामध्ये तिने सुशांतच्या कुटुंबावर मानसिक छळाचा आरोप केला होता.

**2020 मध्ये फ्लॅटमध्ये सापडला होता मृतदेह**

सुशांत सिंह राजपूत 14 जून 2020 रोजी मुंबईतील वांद्रे येथील राहत्या घरात मृतावस्थेत आढळला होता. पहिल्या दृष्टीक्षेपात हे प्रकरण आत्महत्येचे वाटत होते.

यानंतर मीडिया आणि विरोधी पक्षांच्या दबावामुळे हे प्रकरण सीबीआयकडे सोपवण्यात आले. सीबीआयच्या क्लोजर रिपोर्टमध्ये सुशांतच्या मृत्युचे कारण आत्महत्या असल्याचे सांगण्यात आले आहे.

दरम्यान, सुशांतच्या मृत्युच्या काही दिवसांपूर्वी 8 जून रोजी त्याची मॅनेजर दिशा सालियन हिचा मुंबईतील मालाड येथील इमारतीच्या १४ व्या मजल्यावरून पडून मृत्यू झाला. दोघांचाही मृत्यू संशयास्पद होता. मात्र, आजपर्यंत यावर कोणताही खुलासा होऊ शकला नाही.

# पैशाचे सोंग करता येत नाही

### मलाही हिशोब द्यावा लागतो : अजित पवार स्पष्टच बोलले



■ महासागर प्रतिनिध
मुंबई, दि. २३ :
आम्ही लाडक्या बहिणींना 2100 रुपये देणार नाहीत, असे बोललेलो नाही. पण सध्या आमची परिस्थिती नाही. परिस्थिती बदलल्यावर लाडक्या बहिणींना 2100 रुपये नक्की देऊ, असा पुनरुच्चार उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज नांदेड येथे एका सभेत बोलताना केला.

राज्याच्या 13 कोटी जनतेचा 365 दिवसाचा हिशोब लावावा लागतो. सगळी सोंग करता येतात पैशांचे सोंग करता येत नाही. शासनाच्या तिजोरीत खडखडाट असल्याचे अनेक जण बोलतात. कृपा करून तुम्ही गैरसमज करून घेऊ नका, असेही अजित पवार म्हणाले.

राज्यात महायुती सरकार आल्यास लाडक्या बहिणींना 1500 रुपयांऐवजी 2100 रुपये देऊ, असे आश्वासन महायुतीच्या नेत्यांनी विधानसभा निवडणुकीच्या प्रचारावेळी दिले होते. निवडणुकीत महायुतीला प्रचंड बहुमत मिळाले. यानंतर लाडक्या बहिणींना 2100 रुपये कधी मिळणार असा प्रश्न विचारला जात होता.

अर्थसंकल्पीय अधिवेशनात याबाबत घोषणा होईल, असे वाटत होते. मात्र, अर्थसंकल्पात याबाबत कोणतीही घोषणा सरकारच्या वतीने करण्यात आली नाही. त्यानंतर विरोधकांनी लाडक्या बहिणींना 2100 रुपये देण्यावरून सरकारवर टीका केली होती.

शासनाच्या तिजोरीत खडखडाट असल्याचे अनेक जण बोलतात. कृपा करून तुम्ही गैरसमज करून घेऊ नका. मी आपल्या राज्याचा सर्वात मोठा अर्थसंकल्प 7 लाख 20 कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सादर केला आहे. यामध्ये पेन्शन, होणारे पगार, राज्य सरकारने काढलेल्या कर्जांचा व्याज जाईल. राहिलेला पैसा माझ्या लाडक्या बहिणींसाठी आहे. पण आता मी सगळा हिशोब केला. तुम्ही तुमचा संसार करताना महिन्याचा हिशोब लावता कसा मला राज्याच्या 13 कोटी जनतेचा हिशोब लावावा लागतो, असे अजित पवार म्हणाले.

सगळी सोंग करता येतात पैशांची सोंग करता येत नाहीत. मला दिलेली योजना चालू ठेवायची आहे. सरकारला चालू ठेवायचे आहे. त्यामुळे यासाठी आम्ही नवीन पर्याय काढत आहोत. काही बँकांना आम्ही तयार केले आहे. जर तुम्हाला 50 हजार कर्ज काढून, एकत्र येऊन व्यवसाय करायचा आहे. लाडक्या बहिणींमध्ये ज्या महिला या योजनेत बसतात त्यांनी एकत्र येऊन 20 एक महिला आल्या तर 20 गुणिले 50000 साधारण 10 लाख रुपये घेऊन तुम्ही तुमचे काम करू शकता. वीस महिलांचे घेण्याला 30 हजाराने पैसे येतील.

तुमच्या व्यवसायाचा हप्ता तुम्हाला या पैशातून देता येईल. हा उपाय राज्य सरकारने आणला आहे असे अजित पवार म्हणाले. त्यामुळे घाबरण्याचे कारण नाही तिजोरीत खडखडाट आहे असे समजू नका. मी आर्थिक शिस्त लावण्याचा प्रयत्न करतोय असेही अजित पवार म्हणाले.

## विधानसभेत सगळे तेच भरलेत....

### राज ठाकरेंचा सरकारला टोला



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २३ :
एका खोक्या भाईचे काय घेऊन बसलात, इथे संपूर्ण विधानसभेत खोके भाई भरलेत असा टोला राज ठाकरेंनी सरकारला लगावला. ते आज मुंबई पक्षाच्या आयोजित मेळाव्यात बोलत होते.

राज ठाकरे यांच्या या टीकेला भाजप आमदार आशिष शेलार यांनीही खोचक उत्तर दिले आहे. ज्यांना निवडून येता येत नाही, लोक निवडून देत नाहीत. ते विधान करण्याच्या कार्यक्रमात बसतात, अशी टीका आशिष शेलार यांनी राज ठाकरे यांच्यावर केली.

पुढील काही महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होण्याची शक्यता आहे. मुंबई महानगरपालिकेची निवडणुकही होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकाऱ्यांची आज रवींद्र नाट्य मंदिरात बैठक घेण्यात आली. या बैठकीत पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना राज ठाकरे यांनी राज्यातील राजकीय परिस्थितीवर भाष्य करताना सरकारवर उपरोक्त टीका केली.

एका खोक्या भाईचे काय घेऊन बसला आहात, विधानसभेत सगळे खोक्या भाईच भरलेले आहेत, त्यामुळे मूळ विषय बाजूला राहतात, तुम्हाला भलत्याच विषयांमध्ये भरकटून टाकले जाते, असे राज ठाकरे यांनी म्हटले. मनात अनेक गोष्टी साचल्या आहेत, त्या सर्व गुढीपाडवा मेळाव्यात बोलेन, असेही राज ठाकरे म्हणाले.

## भारतीय विद्वान गायत्री चक्रवर्ती यांना हॉलबर्ग पुरस्कार



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २३ :
भारतीय विद्वान आणि साहित्यिका गायत्री चक्रवर्ती स्पिवाक यांना २०२५ चा हॉलबर्ग पुरस्कार जाहीर झाला आहे. तुलनात्मक साहित्य, अनुवाद, वसाहतोत्तर अभ्यास, राजकीय तत्वज्ञान आणि स्त्रीवादी सिद्धांतातील त्यांच्या संशोधन आणि योगदानासाठी त्यांना हा पुरस्कार मिळाला आहे.
गायत्री चक्रवर्ती स्पिवाक या एक प्रसिद्ध भारतीय विद्वान, साहित्यिक सिद्धांतकार आणि स्त्रीवादी विचारवंत आहेत. त्यांनी १० हून अधिक पुस्तके लिहिली आणि अनेक पुस्तके संपादित किंवा अनुवादित केली आहेत. त्यांचे संशोधन २० हून अधिक भाषांमध्ये अनुवादित झाले आहे.

## फरार हिरे व्यापारी मेहुल चोकसीला भारतात आणण्याची तयारी



■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. २३ :
गीतांजली जेम्सचा मालक आणि १३,८५० कोटी रुपयांच्या बँक घोटाळ्यातील प्रमुख आरोपी मेहुल चोकसी हा त्याची पत्नी प्रीती चोकसीसह बेल्जियममध्ये राहत आहे.

तो "एफ रेसिडेन्सी कार्ड" वर बेल्जियममधील अँटवर्प येथे राहत आहे. पंजाब नॅशनल बँक घोटाळ्यानंतर तो २०१८ मध्ये भारतातून अँटिग्वा-बाबुर्डा येथे पळून गेला. चोकसीला भारतात आणण्यासाठी, अधिकाऱ्यांनी बेल्जियम सरकारला प्रत्यार्पणाची प्रक्रिया सुरू करण्यास सांगितले आहे. मेहुल चोकसी आणि नीरव मोदी यांच्यावर मुंबईतील पंजाब नॅशनल बँकेच्या ब्रॅडी हाऊस शाखेत १३,८५० कोटी रुपयांचा घोटाळा केल्याचा आरोप आहे.

यापूर्वी, चोकसीने त्याचा पासपोर्ट निलंबित झाल्यामुळे तो भारतात परतू शकत नसल्याचे निमित्त केले होते.

चोकसीने २०१८ मध्ये भारत सोडण्यापूर्वी २०१७ मध्येच अँटिग्वा-बाबुर्डाचे नागरिकत्व घेतले होते. मेहुल चोकसीने प्रकृती बिघडल्याचे कारण देत भारतात येण्यास वारंवार नकार दिला. तो फक्त व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे समोर येतो.

# सिंहस्थ कुंभमेळासाठी यूपीप्रमाणे कायदा

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती



■ महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. २३ :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी सकाळी त्र्यंबकेश्वर येथील ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेतले. तसेच त्र्यंबकेश्वरच्या विकास आराखड्याचा आढावा घेतला. यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधत होऊ घातलेल्या सिंहस्थ कुंभमेळ्याविषयी माहिती दिली. उत्तर प्रदेशने महाकुंभसाठी ज्याप्रमाणे कायदा तयार केला, तसा कायदा सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी करणार असल्याचे ते म्हणाले.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, नाशिकमधील कुशावर्त तीर्थ त्र्यंबकेश्वरची पाहणी केलेली आहे. त्र्यंबकेश्वरचा एक विकास आराखडा प्रशासनाने तयार केला आहे. त्याचे प्रेझेंटेशन मी घेतलेले आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने नाशिकचा विकास आपण करत आहोत. तसाच त्र्यंबकेश्वरचाही विकास झाला पाहिजे. त्र्यंबकेश्वरच्या विकासासाठी 1100 कोटी रुपयांचा आराखडा तयार केलेला आहे. त्याचे दोन टप्पे आम्ही करत आहोत.

पहिला टप्पा सिंहस्थ कुंभमेळ्यापर्यंत आपल्याला पूर्ण करता येईल आणि दुसरा टप्पा जो आहे, ज्यामध्ये काही कामे होतील. यामध्ये दर्शनासाठी कॉरिडोर तयार करणे, पार्किंगची व्यवस्था, शौचालयांची व्यवस्था, यासह तेथील वेगवेगळ्या कुंडांचे रिस्टोरेशन, तेथील प्रमुख मंदिरांचे रिस्टोरेशन, एएसआयच्या मध्यस्तीने प्रत्यक्ष मंदिरात रिस्टोरेशनची जी आवश्यकता आहे ते आणि अनेक प्रकारच्या सोयी तयार करण्याचा प्रयत्न या आराखडाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पुढच्या तयारीला लागण्यासाठी प्रशासनाला सूचना दिल्या आहेत. लवकरच आम्ही हा प्रस्ताव हाय पॉवर कमिटी आणि त्यानंतर मुख्यमंत्री कमिटीकडे नेऊ आणि त्याला मान्यता देऊ. नाशिकमधील जी काही कामे आहेत, त्यालाही आम्ही मान्यता दिलेली आहे. जवळपास 11 पूल बांधत आहोत. रस्त्याचे मोठे जाळे तयार करत आहोत. ज्या ठिकाणी साधूग्राम तयार होत आहे, ती सगळी जागा ताब्यात घेत आहोत. त्याचाही विकास आपण करत आहोत. घाटांमध्ये नवीन सोयीसुविधा करत आहोत आणि काही घाट देखील वाढवत आहोत. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे, याठिकाणी एसटीपीचे जाळे तयार करून पाणी शुद्ध राहिजे पाहिजे, याहृष्टीने एक आराखडा तयार केला आहे. कुठल्याही सिंहस्थाच्या आधी त्याचे काम पूर्ण करायचे ठरवले आहे, असेही फडणवीस म्हणाले.

**निधी कमी पडू देणार नाही**

या सगळ्या कामांना मोठ्या निधी लागणार आहे. पण आम्ही राज्य सरकार म्हणून याला निधीची कमतरता पडू द्यायची नाही, असा निर्णय घेतलेला आहे. आवश्यकता तो सगळा निधी उपलब्ध करून देणार आहोत, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

**सिंहस्थसाठी मेळा प्राधिकरणाची स्थापना**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी उत्तर प्रदेश प्रमाणे सिंहस्थ कुंभमेळ्याची पूर्ण जबाबदारी घ्यावी, अशी मागणी त्र्यंबकेश्वरच्या साधूमहंतांनी केली आहे. यावर बोलताना, उत्तर प्रदेशने ज्या प्रकारे कुंभमेळ्याचा कायदा तयार केला आणि मेळा प्राधिकरण तयार केले, त्याच धर्तीवर आपलाही कायदा आपण तयार करत आहोत, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

## केंद्र सरकारने कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क हटवले



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २३ :
महाराष्ट्रातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना केंद्र सरकारने मोठा दिलासा दिला आहे. कांदा नियार्तीवरील वीस टक्के निर्यात शुल्क 1 एप्रिल 2025 पासून रद्द करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला केंद्र सरकारने घेतला आहे. या निर्णयाची अधिसूचना जारी करण्यात आली आहे. यामुळे राज्यातील लाखो कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.

गेल्या काही दिवसांपासून कांद्याचे भाव सातत्याने घसरत असल्यामुळे शेतकऱ्यांमधून नाराजी व्यक्त होत होती. उन्हाळी कांदा बाजारात येणार असल्याने येत्या काळात आणखी भाव खाली जाण्याची भीती व्यक्त होत होती. मात्र आता केंद्र सरकारने कांद्याच्या नियार्तीवरील 20 टक्के निर्यात शुल्क पूर्णपणे हटवले आहे. यामुळे कांदा निर्यातीचा मार्ग आता पूर्णपणे मोकळा झाला आहे. राज्यात कांदा पिकाची लागवड जास्त झाली आहे व पोषक हवामान असल्याने उत्पादन जास्त होणार आहे. त्यामुळे कांद्याच्या भावात शेतकऱ्यांची कोंडी होऊ नये म्हणून कांदा पिकावरील 20 टक्के निर्यात शुल्क हटवले जावे, अशी मागणी शेतकऱ्यांकडून केली जात होती. केंद्र सरकारच्या या निर्णयाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केंद्र सरकारचे आभार मानले आहेत.

केंद्र सरकारने कांद्यावरील 20 टक्के निर्यात कर संपूर्णतः: मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. 1 एप्रिल 2025 पासून या निर्णयाची अंमलबजावणी होईल, असे सांगण्यात आले.

## आयपीएलच्या दुसऱ्या सर्वात मोठ्या स्कोअरसह हैदराबादचा धडाकेबाज विजय

### राजस्थानला ४४ धावांनी हरवले, ईशानचे शतक; हेडची फिफ्टी



■ वृत्तसंस्था, हैदराबाद, दि. २३ :
सनरायझर्स हैदराबादने आयपीएल-१८ ची सुरुवात विजयाने केली आहे. रविवारी झालेल्या पहिल्या सामन्यात संघाने राजस्थान रॉयल्सचा ४४ धावांनी पराभव केला. हैदराबादने त्यांच्या घरच्या मैदानावर २८६ धावा केल्या. त्यानंतर राजस्थानला २४२ धावांवर रोखण्यात आले. सिमरजीत सिंग आणि हर्षल पटेल यांनी प्रत्येकी २ विकेट घेतल्या.

आरआरकडून ध्रुव जुरेलने ७० आणि संजू सॅमसनने ६७ धावा केल्या. त्यानंतर शिमरॉन हेटमायर (४२) आणि शुभम दुबे (३४) यांनी पन्नास धावांची भागीदारी करून संघाला २०० च्या पुढे नेले परंतु संघाला विजय मिळवून देण्यात ते मदत करू शकले नाहीत.

तत्पूर्वी राजस्थान रॉयल्सने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. एसआरएचने ६ विकेट्स गमावून २८६ धावा केल्या. संघाकडून इशान किशनने १०६ धावा केल्या, त्याने ४५ चेंडूत त्याच्या आयपीएल कारकिदीर्तील पहिले शतक पूर्ण केले. ट्रॅव्हिस हेडने ६७, हेनरिक क्लासेनने ३४, नितीश रेड्डीने ३० आणि अभिषेक शमार्ने २४ धावा केल्या. राजस्थानकडून तुषार देशपांडेने ३ आणि महीश तीक्षणाने २ विकेट घेतल्या.

# खोक्याभाईचे काय घेऊन बसलात, विधानसभेत सगळे तेच भरलेत:राज ठाकरें

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २३ : एका खोक्या भाईचे काय घेऊन बसलात, इथे संपूर्ण विधानसभेत खोके भाई भरलेत असा टोला राज ठाकरेंनी सरकारला लगावला. ते आज मुंबई पक्षाच्या आयोजित मेळाव्यात बोलत होते. राज ठाकरे यांच्या या टीकेला भाजप आमदार आशिष शेलार यांनीही खोचक उत्तर दिले आहे. ज्यांना निवडून येता येत नाही, लोक निवडून देत नाहीत. ते विधान करण्याच्या कार्यक्रमात बसतात, अशी टीका आशिष शेलार यांनी राज ठाकरे यांच्यावर केली.

पुढील काही महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होण्याची शक्यता आहे. मुंबई महानगरपालिकेची निवडणुकही होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकाऱ्यांची आज रवींद्र नाट्य मंदिरात बैठक घेण्यात आली. या बैठकीत पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना राज ठाकरे यांनी राज्यातील राजकीय परिस्थितीवर भाष्य करताना सरकारवर उपरोक्त टीका केली.




### नेमके काय म्हणाले राज ठाकरे?

एका खोक्या भाईचे काय घेऊन बसला आहात, विधानसभेत सगळे खोक्या भाईच भरलेले आहेत, त्यामुळे मूळ विषय बाजूला राहतात, तुम्हाला भलत्याच विषयांमध्ये भरकटून टाकले जाते, असे राज ठाकरे यांनी म्हटले. मनात अनेक गोष्टी साचल्या आहेत, त्या सर्व गुढीपाडवा मेळाव्यात बोलेन, असेही राज ठाकरे म्हणाले.

### आशिष शेलार काय म्हणाले?

भाजप नेते आशिष शेलार यांनी राज ठाकरे यांच्या टीकेचा समाचार घेतला. एखादे वाक्य आपले अस्तित्व जाणून देण्यासाठी करणे, आपल्याकडे ध्यान आकर्षित करून घेण्यासाठी बोलणे हे आता महाराष्ट्राच्या जनतेला कळून चुकले आहे. महाराष्ट्राच्या विधानसभेत जे लोक काम करत आहेत, ते निवडून आले आहेत. त्या लोकांना जनतेनं निवडून दिलेले आहे. ज्यांना निवडून येता येत नाही, त्यांना लोक निवडून देत नाहीत. त्यामुळे विधानसभेत न जाता ते विधान करण्याच्या कार्यक्रमात बसतात, असा खोचक टोला आशिष शेलार यांनी राज ठाकरे यांना लगावला आहे.

### मनसेमध्ये नव्या पदरचना

दरम्यान, आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी पक्ष संघटनेत अनेक बदल केले असून नवीन पदरचना तयार केल्या आहेत. मनसेने आतापर्यंत मुंबईसाठी कधीही अध्यक्षांची नेमणूक केली नव्हती. आता मात्र थेट पहिल्यांदाच मुंबई अध्यक्षाची नियुक्ती करण्यात आली असून संदीप देशपांडे यांच्याकडे ही जबाबदारी सोपवण्यात आली आहे. दक्षिण मुंबईच्या उपशहर अध्यक्षपदी यशवंत किल्लेदार तर मुंबई पश्चिम उपनगरपदी कुणाल माईणकर आणि मुंबई पूर्व उपनगरपदी योगेश सावंत यांची निवड करण्यात आली आहे. अमित ठाकरे यांच्याकडे मनसेच्या सर्व शाखाध्यक्षांची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

# शेवगा, ढोबळी मिरची, फ्लॉवर, भुईमुग शेंगाच्या दरात घट, हिरवी मिरचीच्या दरात वाढ



■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. २३ : शेवगा, ढोबळी मिरची, फ्लॉवर, भुईमुग शेंगाच्या दरात घट घट झाली. हिरवी मिरचीच्या दरात वाढ झाली असून अन्य फळभाज्यांचे स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली. श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील घाऊक बाजारात रविवारी राज्य, तसेच परराज्यातून मिळून ४० ट्रक फळभाज्यांची आवक झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत फळभाज्यांची आवक कमी झाली आहे. कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेशातून मिळून ७ ते ८ टेम्पो हिरवी मिरची, कर्नाटक, गुजरातमधून मिळून ४ ते ५ टेम्पो कोबी, कर्नाटकातून २ ते ४ टेम्पो घेवडा, आंध्र प्रदेश, तमिळनाडूतून मिळून५ ते ६ टेम्पो शेवगा, राजस्थानातून ५ ते ६ टेम्पो गाजर, हिमाचल प्रदेशातून एक ट्रक मटार, कर्नाटकातून २ ते ३ टेम्पो भुईमूग शेंग, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, कर्नाटकातून ५ ते ६ टेम्पो तोतापुरी कैरी, गुजरात आणि मध्य प्रदेशातून १० टेम्पो लसूण अशी आवक परराज्यातून झाली, अशी माहिती मार्केट यार्डातील ज्येष्ठ अडते विलास भुजबळ यांनी दिली.

# बस चालवताना मोबाईलवर क्रिकेट मॅच बघणे भोवले

## एसटीने ई-शिवनेरीच्या चालकाला केले बडतर्फ

## खासगी कंपनीला ठोठावला ५ हजारांचा दंड

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २३ : बस चालवत मोबाईलवर क्रिकेट मॅच बघणाऱ्या खाजगी चालकाला एसटी प्रशासनाने बडतर्फ केले आहे. तसेच संबंधित खाजगी कंपनीला ५ हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या निर्देशानुसार एसटी महामंडळाने ही कारवाई केली. २१ मार्च रोजी सायंकाळी ७ वाजता दादर येथून स्वारगेट (पुणे) साठी निघालेल्या खाजगी ई-शिवनेरी बसमधील चालक रात्री लोणावळाजवळ बस चालवत क्रिकेट मॅच पाहत होता. संबंधित बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी याचे चित्रीकरण परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना पाठवले. याबाबत मंत्री सरनाईक यांनी तातडीने एसटीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना नियमानुसार कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार एसटीच्या स्थानिक अधिकाऱ्यांनी संबंधित खाजगी संस्थेच्या चालकास प्रवाशांचा जीव धोक्यात घालून बेशिस्त वाहनं चालवल्या प्रकरणी बडतर्फ केले असून संबंधित खाजगी संस्थेला ५ हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. यावेळी बोलताना मंत्री सरनाईक म्हणाले की, ई-शिवनेरी ही एसटीची मुंबई पुणे मार्गावर धावणारी प्रतिष्ठित बस सेवा आहे. या बसमधून अनेक सन्माननीय व्यक्ती प्रवास करीत असतात. 'अपघात विरहित सेवा' हा या बस सेवेचा नावलौकिक आहे. त्यामुळे अशा प्रकारे बेशिस्त वाहन चालवून प्रवाशांचा जीव धोक्यात घालणाऱ्या चालकांवर कठोर कारवाई करणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रवाशांचा एसटीच्या या प्रतिष्ठित सेवेबद्दल विश्वास दृढ होत जाईल. तसेच भविष्यात एसटीकडे असलेल्या खाजगी बसच्या चालकांना संबंधित संस्थेकडून वेळोवेळी शिस्तबद्ध वाहन चालवण्याचे प्रशिक्षण दिले जाण्याची गरज त्यांनी प्रतिपादित केली. खाजगी अथवा प्रवासी वाहतूक करणाऱ्या रिक्षा, टॅक्सी चे चालक देखील कानात हेडफोन घालून गाडी चालवत मोबाइलवर मॅच अथवा चित्रपट पाहत असल्याच्या तक्रारी प्रवासी वर्गाकडून येत आहेत.

# ८० वर्षांच्या व्यक्तीकडून अल्पवयीन मुलीवर अत्याचार

## आरोपीला अटक, रायगडमधील संतापजनक घटना

■ महासागर प्रतिनिधी,
रायगड , दि. २३ : रायगडमधून एक संतापजनक घटना समोर आली आहे. ८० वर्षींय व्यक्तीने एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार केला असून त्यांच्याविरोधात माणगावच्या गोरेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार रायगड जिल्ह्यातील हमजा नावाच्या व्यक्तीने गावात किराणा दुकान आहे. अल्पवयीन मुलीला चॉकलेटचे आमिष दाखवत दुकानात नेत तिच्यावर अत्याचार केला.

रायगड जिल्ह्यातील एका ८० वर्षीय व्यक्तीचे किराणा दुकान आहे. त्याच्या दुकानात चॉकलेट घेण्यासाठी आलेल्या अल्पवयीन मुलीला तुला चॉकलेट देतो असे म्हणत हमजा नामक व्यक्तीने दुकानात बोलवले. ती दुकानात आली असता मुलीचा विनयभंग करून तिच्या मनात लज्जास्पद भावना निर्माण होईल असे कृत्य केले. या प्रकारानंतर मुलीने रडत रडत घरी जात पालकांना याबाबत माहिती दिली.

चिमुकलीने आपबिती सांगितल्यानंतर संतप्त झालेल्या वडिलांनी गोरेगाव पोलिसांनी ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी केलेल्या मेडिकल रिपोर्टनुसार संबंधित मुलीवर अत्याचार झाल्याचे उघड झाले आहे.

यानंतर आरोपीवर बाल लैंगिक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यानंतर पोलिसांनी आरोपी हमजाला अटक केली आहे.

### जतमध्ये अल्पवयीन मुलीवर बापाचा अत्याचार

जात पूर्व भागातील एका गावात मानवतेला काळीमा फासणारी घटना घडली आहे. आपल्या पोटच्या १३ वर्षांच्या अल्पवयीन लेकीवर बापानेच अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. नराधम बापावर रात्री उशिरा उमदी पोलिसांत गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी त्याला बेड्या ठोकल्या आहेत. या घटनेने जत तालुक्यात खळबळ उडाली आहे. जत पूर्व भागातील एका गावात १३ वर्षीय मुलीच्या असहायतेचा फायदा घेत बापाकडून गेल्या चार महिने अत्याचार सुरू होता. सदरचा प्रकार मुलीच्या आईच्या लक्षात आला होता. तिने याबाबत पतीला सांगण्याचा प्रयत्न केला; मात्र तो ऐकत नव्हता. अखेरीस शुक्रवारी सकाळी महिला अंमलदारांना याबाबतची माहिती दिली. पोलिसांनी नराधम बापास अटक केली आहे.

# एक एप्रिलपासून समृद्धीवर संभाजीनगर-शिर्डी२०४ टोल

## पथकरात १९% वाढ, संभाजीनगरनाशिक ३८१ रु.



### नागपूर ते इगतपुरी प्रवासासाठी टोल

| वाहनांचा प्रकार | सध्याचे दर | नवीन दर |
|---|---|---|
| कार, हलकी मोटार | १०८० | रू १२४० |
| हलकी व्यावसायिक मिनीबस | १७४५ रू | |
| बस अथवा छोटा ट्रक | ३६५५ | रू ४३५५ |
| तीन आसांचा व्यावसायिक वाहन | ३४४४० | ४७५० |
| अवजड बांधकाम साहित्य | ५७४० | रू६८३० |
| अति अवजड वाहने | ६४८० | रू८३१५ |

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २३ : हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मुंबई ते नागपूर समृद्धी महामार्गावर १ एप्रिलपासून पथकर (टोल) वाढीचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) पथकर वाढीचा निर्णय घेतला असून प्रतिकिमीनुसार दरवाढ होणार आहे. पथकरात१४ टक्यांची वाढ केली आहे. त्यामुळे समृद्धीचा प्रवास महागणार आहे. समृद्धी महामार्गातील शेवटचा इगतपुरी ते आमने हा टप्पा पूर्ण झाला असून, या टप्प्याचे लोकार्पण झाल्यानंतर मुंबई ते नागपूर अवघ्या आठ तासांत पार करण्याचे स्वप्न पूर्ण होणार आहे.

त्यामुळे १ एप्रिल २०२५ पासून संपूर्ण ७०१ किमीच्या प्रवासासाठी चारचाकी वाहनांसाठी एकेरी टोल १,२५०, रुपये आहे. आता , रुपये इतका भरावा लागणार आहे. मुंबई ते नागपूर एक्स्प्रेस वे या ७०१ किलोमीटर अंतरापैकी नागपूर ते इगतपुरी हा किमीचा मार्ग सुरू झाला आहे. महिनाभरात इगतपुरी ते आमने हा किमीचा मार्ग वाहतूक सेवेत दाखल होणार आहे. १ एप्रिलपासून समृद्धी महामार्गावर नवे टोलदर लागू होणार असून पुढील तीन वर्षासाठी म्हणजेच ३१मार्च २०२८ पर्यंत हे दर लागू राहतील.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ व नागपूर-मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्स्प्रेस-वेलिमिटेड या कंपनीने टोलवाढीचा निर्णय घेतला आहे. डिसेंबर २०२२ मध्ये समृध्दी महामार्गावरील टोल दर जाहीर करण्यात आले होते. त्यावेळी कार व हलक्या वाहनांसाठी प्रति किलो मीटर १.७३. रूपये टोल आकारला जात होता. आता १ एप्रिलपासून .२.०६ रुपये प्रति किमी होणार आहे. त्यानुसार किलोमीटरच्या प्रवासासाठी पथकरात १७५ रुपयांची वाढ असेल. मात्र संपूर्ण ७०१ किलोमीटर प्रवासाचा विचार केल्यास त्यासाठी सध्याच्या पथकरापेक्षा त्यांना १४७रुपयांचा कर अधिक द्यावा लागणार आहे.

'अजित पवार आम्हाला रोखू शकणार नाहीत...'

# दादांच्या मुस्लिमांबद्दलच्या विधानावर संजय निरुपम यांनी केले भाष्य

मुंबई, दि. २३ : जे मुस्लिम देशभक्त आहेत आणि मुजाहिदीन नाहीत त्यांच्यासोबत आम्ही उभे राहू. पण मुस्लिमांच्या नावाखाली दंगली घडवणाऱ्या अशा मुस्लिमांवर आम्ही डोळे मोठे करत कारवाई करणार आणि अजित पवारही आम्हाला रोखू शकणार नाहीत, त्यांनी रोखूही नाही, असे शिवसेना नेते संजय निरुपम यांनी म्हटले आहे. तर राज्यात जे दंगली प्रवृत्तीचे मुस्लिम राहतात त्यांच्याविरोधात आजपासून मोठी कारवाई सुरू झाली पाहिजे. ज्यामुळे यापुढे दंगल करण्याची कुणाची हिंमत होऊ नये. संजय निरुपम पुढे बोलताना म्हणाले की, अजित पवारांनी जे म्हटले आहे ते आम्हाला दुरुस्त करायचे आहे. देशभक्त आणि भारतीय असलेल्या मुस्लिमांवर आमचे कोणतेही आरोप नाहीत. पण दंगल घडवणारा कोणताही मुस्लिम देशद्रोही आहे, आम्ही त्याच्यावर कारवाई करू आणि अजितदादाही त्याला वाचवू शकणार नाहीत.

### संपत्ती जप्त झाली पाहिजे

संजय निरुपम म्हणाले की, नागपूर दंगलीमध्ये सहभागी असणाऱ्यांची संपत्ती जप्त झाली पाहिजे. ती मालमत्ता विकून दंगलीमध्ये झालेल्या नुकसानाची भरपाई केली जावी, अशी भूमिका शिवसेनेची आहे. नागपूरमधील दंगल हे मोठे कारस्थान होते, मोमिनपुरा आणि आजूबाजूच्या परिसरातील त्यात अवैध बांधकाम करण्यात आले आहे. त्याविरोधात बुलडोजर कारवाई झाली पाहिजे. यापूर्वीदेखील या परिसरात असेच काही घडवले आहे. मालेगाव दंगलीमध्येही त्यांचे नाव आले होते. त्यांच्यावर बुलडोजर कारवाई, मालमत्ता जप्त अशी कारवाई करावी.

### वडील असे खोटे बोलू शकत नाही

संजय निरुपम म्हणाले की, उद्धव ठाकरे यांच्या मुलाच्या हात दिशा सालियानचा हत्यामध्ये आहे, याप्रकरणाची चौकशी झाली पाहिजे. दिशा सालियानची वडिलांनी असा सांगितलेला आहे की त्यांच्या मुलीवर सामूहिक बलात्कार झाला होता. म्हणजे कोणी वडील असे खोटे बोलू शकत नाही.

### राऊतांचे वक्तव्य चुकीचे

संजय निरुपम म्हणाले की, भाजपाचे बडे नेते लालकृष्ण अडवाणी यांना कोणीही कैद करून ठेवलेले नाही. अडवाणी यांचे वय आता ९५ वर्षापेक्षा अधिक आहे. ते देशाचे केंद्रीय गृहमंत्री आणि उपपंतप्रधान होते. ते लोकसभेत अखेरपर्यंत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि संपूर्ण कॅबिनेट त्यांच्या वाढदिवसाला त्यांना शुभेच्छा द्यायला जाते. त्यांना कोणीही कैद केले नाही. लालकृष्ण अडवाणी यांना केंद्र शासनातर्फे सर्व प्रकारची सुविधा दिल्या जाते. त्यांच्या भेटीगाठीसाठी त्यांच्या इच्छे प्रमाणे कोणीही जाऊ शकतो. त्यांना भेटू शकतो. संजय राऊत यांनी त्यांच्याविषयी जे म्हटले आहे. ते चुकीचे आहे. त्यांनी हा आरोप मागे घ्यावा. त्यांच्यावर कारवाई होऊ शकते.

उद्धव ठाकरे यांचे नवीन आराध्य दैवत है औरंगजेब झाले आहेत.

# उच्चशिक्षित तरुणाला गांजा विक्री करताना पकडलं; १० किलो गांजा जप्त

■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. २३ : पिंपरी-चिंचवडमध्ये गांजा विक्री करणाऱ्या उच्चशिक्षित तरुणाला अंमली पदार्थ विरोधी पथकाने बेड्या ठोकल्या आहेत. हरीश मगन सोनवणे अस अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून सहा लाखांचा १० किलो गांजा जप्त करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी हरीश सोनवणे हा उच्चशिक्षित आहे. तो पिंपरी- चिंचवड मध्ये कंत्राट पद्धतीवर नोकरी करतो. त्याचा भाऊ देखील उच्चशिक्षित असून स्पोर्ट टीचर आहे. पैशांच्या हव्यासापोटी हरीश सोनवणे ने गांजा विक्री करत होता.




हरीश सोनवणे च मूळ गाव हे मध्यप्रदेशच्या बॉण्ड्री वर असलेल्या धुळे जिल्ह्यातील शिरपूर गाव आहे. मध्यप्रदेश मधून त्याने गांजा आणला असल्याचा अंदाज पोलिसांना आहे. सांगवी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पिंपळे सौदागर परिसरातील प्रथम वाईनच्या समोर उभा राहून तो गांजा विक्री करण्याचा प्रयत्न करत होता. दुचाकी वरील बसलेल्या हरीश च्या पाठीवर सॅग आणि पुढे ट्रॅव्हल बॅग मध्ये दहा किलो गांजा होता. याबाबतची माहिती अंमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलीस कर्मचारी विजय दौंडकर आणि कलाटे यांना मिळाली.

पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली एक टीम तयार करण्यात आली. तात्काळ घटनास्थळी पोहचले. पिंपळे सौदागर मधील प्रथम वाईनच्या समोर हरीश सोनवणे हा दुचाकी वर बसलेला असताना त्याला ताब्यात घेतलं. त्याची पंचासमोर झडती घेण्यात आली. त्याच्या बॅगेमध्ये दहा किलो गांजा आढळला आहे. हा गांजा मध्यप्रदेशातून आणला असल्याचा अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे. या प्रकरणी सांगवी पोलीस ठाण्यात हरीश सोनवणे याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रम गायकवाड यांच्या टीम ने केली आहे.

# ट्रॅक्टर उलटून शेतकऱ्याचा मृत्यू

## कुटुंबीयांना लाखांची नुकसान भरपाई, ग्राहक तक्रार निवारण आयोगात दावा निकाली

■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. २३ : ट्रॅक्टर उलटून मृत्युमुखी पडलेल्या शेतकऱ्याच्या कुटुंबीयांना २० लाख रुपयांची नुकसान भरपाई देण्याचे आदेश देण्यात आले. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगात शनिवारी आयोजित करण्यात आलेल्या लोक अदालतीत तडजोडीत शेतकऱ्याच्या कुटुंबीयांना दाखल केलेला दावा निकाली काढण्यात आला.

याबाबत सावित्री सुनील पाटील यांनी गेल्या वर्षी १४ मे रोजी पुणे जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगात २० लाख ६५ हजारांची नुकसान भरपाई मिळवण्यासाठी दावा दाखल केला होता. १४ मे रोजी दुपारी शेतातील कांदा पावसापासून सुरक्षित राहावा म्हणून शेतकरी सुनील पाटील हे शेतातील कांदा हलविण्यासाठी ट्रॅक्टर घेऊन निघाले होते. त्या वेळी ट्रॅक्टर खड्ड्यात उलटला. अपघातात सुनील पाटील यांना गंभीर दुखापत झाली. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. पाटील यांनी वाहनचा वैयक्तिक विमा उतरविला आला होता. पतीचा ट्रॅक्टर उलटून अपघाती मृत्यू झाल्यानंतर विमा कंपनीने नुकसान भरपाई मिळवण्यासाठी त्यांनी त्यांचे वकील ड. राहुल अलुरकर यांच्या मार्फत ग्राहक तक्रार निवारण आयोगात दावा दाखल केला होता.

संबंधित दावा प्रलंबित होता. पुणे जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष अनिल जवळेकर, सदस्य शुभांगी दुनाखे, सरिता पाटील यांनी दावा सामंजस्याने निकाली काढण्यासाठी प्रयत्न केले. लोक अदालतीत हे प्रकरण ड. किरण घोणे, ड. अनिल सातपुते यांच्या पॅनेलसमोर तडजोडीसाठी ठेवण्यात आले. विमा कंपनीकडून ड. ऋषीकेश गानू, ड. आकाश फिरंगे यांनी बाजू मांडली. विमा कंपनीच्या अधिकारी भक्ती कुलकर्णी यांनी दावा तडजोडीत काढण्यासाठी प्रयत्न केले. तडजोडीत शेतकऱ्याच्या पत्नीला लाख रुपये देण्यात आले. कार्यालयीन कर्मचारी रघतवान, योगेश चवंडके, मनीषा पाटील, चित्रा आपटे, ऋता चाबुकरस्वार,परीक्षित धुमाळे, गजानन चव्हाण यांनी सहाय केले.

# आदिवासीं व नक्षलीं भागात काम करणारे भरारीं पथकांचे डॉक्टर अनेक महिने विनावेतन

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २३ : आरोग्य विभागाअंतर्गत सोळा आदिवासी जिल्ह्यातील तसेच गडचिरोलीतील नक्षली भागात काम करणाऱ्या भरारी पथकातील बहुतेक कंत्राटी डॉक्टरांना गेले काही महिने वेतनच मिळाले नसल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. आरोग्य विभागात दोन सचिव व आयुक्त असे तीन आयएएस बाबू असतानाही आम्हाला वेळेवर पगार मिळत नसेल तर हे बाबूलोक करतात काय,असा संतप्त सवाल या डॉक्टरांनी केला आहे.पगाराबरोबरच आमचे भत्तेही वेळे-वर मिळत नाहीत तसेच करोना काळाळातील कामासाठी विशेष भत्ता देण्याचे जाहीर करून आजपर्यंत तोही देण्यात आला नसल्याचे भरारी पथकाच्या डॉक्टरांचे म्हणणे आहे.



राज्यातील १६आदिवासी जिल्ह्यात वाढते बालमृत्यू, मातामृत्यू तसेच आरोग्याचे प्रश्न लक्षात घेऊन मुंबई उच्च न्यायालयाने ताशेरे ओढल्यानंतर १४४५ साली आरोग्य विभागाने आदिवासी जिल्ह्यांसाठी नवसंजीवन योजना राबविण्यास सुरुवात केली. या अंतर्गत जेथे रस्ता नाही अथवा संपतो अशा अतिदुर्गम भागातील आरोग्य व्यवस्थेसाठी भरारी पथकाची नियुक्ती करण्यात आली. आज राज्यात या भरारी पथकात जवळपास २८१ डॉक्टर असून यातील बहुतेक पंधरा वर्षांहून अधिक काळ कंत्राटी पद्धतीने काम करत आहेत. एकीकडे आरोग्य सेवेत काम करण्यासाठी डॉक्टर मिळत नसताना आदिवासी तसेच गडचिरोलीसारख्या अतिदुर्गम नक्षली भागात आम्ही जीव मुठीत धरून वर्षानुवर्षे काम करत असतानाही आम्हाला आरोग्य सेवेत कायम का केले जात नाही, हा या डॉक्टरांचा सवाल आहे. यातील बहुतेक डॉक्टरांना गेले चार ते सात महिने वेतनही मिळालेले नाही. अशीवेळी आम्ही आमचे घर चालवायचे कसे,मुलांची शाळेची फी कशी भरायची,असा सवाल या डॉक्टरांकडून करण्यात येत आहे. भरारी पथकातील काही डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार प्राथमिक आरोग्य केंद्रावरही त्यांच्याकडून सलग चार चार दिवस काम करून घेतले जाते. या ठिकाणी खरेतर तालुका आरोग्य अधिकारी उपस्थित असणे अपेक्षित आहे. मात्र त्याचे कामही आम्हाला करावे लागते. वैद्यकीय अधिकारी वा तालुका अधिकाऱ्यांच्या हाती आमच्या वर्षिक कंत्राटाची दोरी असल्याने ते सांगतील तसे काम आम्हाला करावे लागते.

# स्पामधील कामकाजाचे नियमन होणार, मार्गदर्शक तत्त्वे आखण्यासाठी १२ सदस्यांची समिती

मुंबई : राज्यातील स्पा सेंटर किंवा तत्सम आस्थापनांमधील कामकाजाचे नियमन करणारी मार्गदर्शक तत्त्वे आखण्यासाठी १२सदस्यांची समिती स्थापन करण्यात आल्याची माहिती राज्य सरकारतर्फे नुकतीच न्यायालयात देण्यात आली.



तसेच, भिन्नलिंगी कर्मचाऱ्यांकडून मसाजला परवानगी देण्यास कोणताही आक्षेप नसल्याच्या भूमिकेचाही सरकारतर्फे पुनरूच्चार करण्यात आला.

# दंगलखोरांचा काश्मीर पॅटर्न

महाराष्ट्रनामा



सुकृत खांडेकर
०९५९४२२४०००
sukritforyou@gmail.com



महाराष्ट्राची उपराजधानी असलेल्या नागपुरात क्रूरकर्मा औरंगजेब याचा पुतळा जाळल्यावरून पेटलेल्या दंगलीने सर्व देशाचे लक्ष वेधून घेतले. नागपूरची गोड संत्री देशभर प्रसिद्ध आहेत. ऑरेंज सिटी असा नागपूरचा देशात लौकिक आहे. नागपूरचे लोक शांतता प्रिय व गोड स्वभावाचे आहेत. एक सुशिक्षित व सुसंस्कृत शहर म्हणून नागपूर ओळखले जाते. गेल्या दोन दशकांत नागपूर शहराचा योजनाबद्ध विकास झाला आणि नागपूर हे देशातील एक आदर्श व आधुनिक महानगर व्हावे यासाठी केंद्रीयमंत्री नितीन गडकरी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे योजनाबद्ध प्रयत्न चालू आहेत. नागपुरातील प्रमुख रस्ते गुळगुळीत आणि चमकदार झाले आहेत. नागपुरातील मेट्रो आणि उड्डाणपुलांनी या शहराचा चेहरा-मोहरा बदलला आहे. नागपूर करारानुसार उपराजधानीत दरवर्षी महाराष्ट्र विधिमंडळाचे एक अधिवेशन गेली सहा दशके घेतले जात आहे. रोजगार आणि शिक्षणासाठी या शहरात बाहेरील राज्यातून येणाऱ्या लोकांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. मुघल सम्राट औरंगजेब याची छत्रपती संभाजी नगरजवळ (औरंगाबाद) खुलताबाद येथे असलेली कबर हटवावी या मागणीसाठी संपूर्ण महाराष्ट्रात विश्व हिंदू परिषद, बजरंग दल आणि हिंदुत्ववादी संघटनांनी आंदोलन चालवले आहे. नागपुरात औरंग्याची प्रतिमा जाळल्यानंतर सोशल मीडियातून कुरणातील आयाती लिहिलेली चादर पेटवली अशी अफवा पसरवली गेली आणि मुस्लीम तरुणांना हातात शस्त्रे घेऊन रस्त्यावर उतरायला जणू संधीच मिळाली.

नागपुरात रस्त्यावर उतरलेले दंगलखोर हे मुस्लीम होते, त्यात अनेक जण नागपूर बाहेरचे होते. त्यात बांगलादेशी आणि रोहिंग्योही होते असा संशय उघडपणे व्यक्त केला जातो आहे. दंगलखोरांनी दगडफेक, तोडफोड, जाळपोळ मोठ्या प्रमाणावर केली, दंगलखोरांचे टार्गेट जसे हिंदू समाजाची मालमत्ता होते तसेच गणवेषधारी पोलीस हेसुद्धा होते. पोलिसांवर दंगलखोरांनी तुफानी दगडफेक केली, पोलिसांवर पेट्रोल बॉम्ब फेकल्याचे सांगण्यात येत आहे. चार पोलीस उपायुक्तांसह पस्तीस पोलीस जखमी झाले. दंगलखोर एवढे हिंसक बनले होते की, त्यांनी उपायुक्त निकेतन कदम यांच्यावर कुऱ्हाडीने वार केले. जमावावर पोलिसांनी लाठीमार केला व अश्रुधुराच्या नळकांड्याही फोडल्या. पोलिसांवर हल्ले चढविणाऱ्या दंगलखोरांना रोखण्यासाठी पोलिसांनी आपल्या कमरेवर लटकवलेले रिव्हॉल्व्हर बाहेर का नाही काढले? दंगलखोर हे पोलिसांवर दगड व पेट्रोल बॉम्ब फेकत असताना आणि कुऱ्हाडीचे वार करीत असताना पोलीस त्यांच्या दिशेने गोळीबार करण्यासाठी कोणाच्या आदेशाची वाट पाहत होते? महिला पोलिसांचे विनयभंग करण्याचे प्रयत्न दंगलखोरांनी केले, महिला पोलिसांच्या अंगावरील गणवेशावर हात टाकण्याचे प्रयत्न झाले, तरीही दंगलखोरांच्या दिशेने पोलिसांनी बंदुकीचे चाप ओढले नाहीत याचे मोठे आश्चर्य वाटते.

केंद्र सरकारच्या कठोर भूमिकेमुळे आता काश्मीर खोऱ्यात जरी बऱ्यापैकी शांतता दिसत असली तरी दोन दशके दहशतवादी व घुसखोरांच्या टोळ्यांचे हल्ल्याचे टार्गेट हे भारतीय सुरक्षा दले होती. सुरक्षा दलांची वाहने, जिप्स, बसेस, व्हॅन्स रस्त्यावर दिसल्या की, त्यावर दहशतवादी तुफानी दगडफेक करून पळून जात असत. अशा हल्ल्यात सुरक्षा दलाचे असंख्य जवान व अधिकारी जखमी झाले आहेत. ज्यांच्यावर सुरक्षा व्यवस्थेची जबाबदारी आहे, त्यांच्यावर हल्ले करणे, त्यांच्यावर आरोप करून त्यांची बदनामी करणे हा काश्मीर पॅटर्न आहे. नागपूरच्या दंगलीत दंगलखोरांनी हाच पॅटर्न राबवलेला दिसतो.

दुसरे महत्त्वाचे म्हणजे नागपूरमध्ये पोलिसांनी बाराशेपेक्षा जास्त संशयितांना ताब्यात घेतले, शंभरावर दंगलखोरांना अटक केली. त्यातले अनेक जण नागपूर बाहरचे आहेत. ते दंगलीच्या दिवशी तेथे कशासाठी आले होते? दंगलखोरांत बांगलादेशी व रोहिंग्यो सामील होते, हा आरोप खरा असेल तर ते पोलिसांचे अपयश म्हटले पाहिजे. नागपुरात बांगलादेशी, रोहिंग्यो, घुसखोर कुठून आले, कसे आले, केव्हा आले? पोलिसांना काहीच ठाऊक नाही काय? मुंबईप्रमाणे नागपूरही आता घुसखोरांची धर्मशाळा बनली आहे का? देशाचे केंद्रीयमंत्री नितीन गडकरी हे नागपुरात राहतात. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे नागपूरकरच. गेल्या दहा वर्षांत साडेसात वर्षे राज्याचे गृह खाते त्यांच्याकडेच आहे. सत्ताधारी भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे तर नागपूरचे पालकमंत्री आहेत. नागपूरचे खासदार, सर्व आमदार व सर्वाधिक नगरसेवक भाजपाचे आहेत. संघ परिवारातील ३२ संस्थांची मातृसंस्था असणारे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय याच शहरात आहे. पवित्र दीक्षाभूमीही याच शहरात आहे. येत्या गुढीपाडव्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी हे नागपूरला येत आहेत. पंतप्रधान मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा तसेच केंद्रातील व राज्यातील अनेक मंत्री संघाचे स्वयंसेवक आहेत. नागपूरमध्ये ९० टक्के हिंदू आहेत. मग या शहरात चार ते पाच तास अनियंत्रित व बेलगाम हिंसाचार कसा चालू राहतो? नागपुरात काही अघटित घडणार याची पुसटशी कल्पनाही पोलीस यंत्रणेला नव्हती का? विश्व हिंदू परिषदेने औरंगजेबाची प्रतिमा पेटवल्यानंतर सोशल मीडियावर ज्या क्लिप व्हायरल झाल्या, त्यावरून पोलिसांना काहीच बोध घेता आला नाही का? कुराणाची आयात लिहिलेली चादर विहिंप व बजरंग दलाने जाळली या सोशल मीडियावरील प्रचारानंतर प्रतिबंधात्मक कारवाई करावी आणि संवेदनशील विभागात मोठी कुमक बोलवावी असे पोलिसांना वाटले नाही का? राज्य राखीव दल, केंद्रीय राखीव पोलीस दल किंवा केंद्रीय औद्योगिक पोलीस दल यांच्या तुकड्या त्यांना काही काम नाही म्हणून नागपुरात तैनात करण्यात आल्या आहेत काय? देशात सर्वत्र छावा चित्रपट जोरात चालू आहे. छावा बघितल्यानंतर छत्रपती संभाजी महाराजांविषयी भक्ती, सन्मान, प्रेम प्रत्येकाच्या मनात उफाळून येतो. स्वत: पंतप्रधानांनी छावाचे कौतुक केले. राज्यातील आमदार, मंत्री यांच्यासाठी छावाचे खास आयोजन करण्यात आले होते. संभाजी महाराजांवर क्रूर अत्याचार करणाऱ्या औरंगजेबाविषयी छावा बघितल्यानंतर प्रत्येकाच्या मनात चीड, संताप प्रकट होणे स्वाभाविकच आहे. संभाजी महाराजांवर क्रूर अत्याचार करणाऱ्या औरंगजेबाची महाराष्ट्रात कबर हवीच कशाला अशी भावना हिंदूंच्या मनात प्रबळ झाली, त्यातूनच औरंग्याची कबर हटवा, मोहीम सुरू झाली.

छावा चित्रपटाने संभाजी महाराजांविषयी भक्ती निर्माण झाली पण विरोधी पक्षांच्या काही नेत्यांनी केलेल्या वक्तव्याने संताप आणि चीडही निर्माण झाली. समाजवादी पक्षाचे अबू आजमी यांनी तर औरंगजेब क्रूर नव्हता असे वक्तव्य केल्याने हिंदू संतप्त झाले. प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी तर औरंगजेबाप्रमाणेच देवेंद्र फडणवीस यांचा कारभार आहे असे सांगून हिंदूंच्या भडकलेल्या भावनेत जणू तेल ओतण्याचे काम केले. उबाठा सेनेचे अनिल परब यांनी, तर आपला संभाजी महाराजांप्रमाणे छळ झाला असे सांगून सहानुभूती मिळविण्याचा प्रयत्न केला, पण उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तुमचा संभाजी महाराजांप्रमाणे छळ झाला म्हणजे नेमके काय झाले असा प्रश्न विचारून त्यांच्या भाषणाची हवाच काढून घेतली. एक नोटीस येताच कोणी कसे लोटांगण घातले होते, याची एकनाथ शिंदे यांनी विरोधी पक्षाला आठवण करून दिली.

नागपुरात औरंगजेबाची प्रतिमा जाळली पण त्यावर कुठे आयात लिहिलेली नव्हती असे स्वत: मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे. मग ही अफवा कोणी पसरवली? एका चित्रपटावरून दंगल पेटली, असे यापूर्वी कधी झाले आहे काय? महिला पोलिसांचे विनयभंग व अश्लील शेरेबाजी झाल्यावरही पोलीस यंत्रणा शांत कशी बसू शकते? उत्तम दर्जाच्या फायबरच्या काठ्या, शॉक देणाऱ्या काठ्या, चिलखत, शिरस्त्राण आणि दंगलखोरांशी सामना करायला पुरेशी काडतुसे असा सुसज्ज शस्त्रसाठा पोलिसांकडे नव्हता का? यापूर्वी दिल्ली व मुंबईच्या दंगलीत पोलिसांवर दंगलखोरांनी हल्ले करून त्यांना भोसकून ठार मारल्याच्या घटना डोळ्यांसमोर असताना नागपूर पोलीस ढिम्म का राहिले? विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाविषयी तक्रार नोंदविण्यासाठी मायनॉरिटीज डेमॉक्रॅटीक पक्षाचा नागपूर शहराचा अध्यक्ष फहिम खान हा गणेश पेठ पोलीस ठाण्यावर जमाव घेऊन आला, तेव्हा जमावातील लोकांनी अलमगीर औरंगजेब जिंदाबाद, औरंग्या आमचा बाप आहे, अशा घोषणा दिल्या असतील, तर पोलिसांनी वेळीच सावध व्हायला नको होते का?

औरंगजेबाचे थडगे उखडून फेकून द्या, बुलढोझर फिरवा, अशी मागणी केली जाते आहे. कोण आहे औरंगजेब, त्याचा काय संबंध असा प्रश्न विचारला जातो आहे. औरंगजेबाच्या कबरीवर थुंकण्याची व्यवस्था करावी अशीही मागणी करण्यात आली आहे. औरंगजेबचा मृत्यू १७०७ मध्ये अहिल्यानगर (तेव्हाचे अहमदनगर) येथे झाला. त्याचा मृतदेह खुलताबादला आणला. छत्रपती संभाजी नगरपासून २५ किमी अंतरावर असलेल्या खुलताबाद येथे औरंगजेबची कबर आहे. मजार मुगल सम्राट शहेनशाह हजरत औरंगजेब आलमगीर, असा तिथे फलक आहे. ही कबर औरंगजेबाच्या मुलाने बांधली. हे संरक्षित स्मारक असून जो कोणी याची नासधूस करील किंवा हानी पोहोचवेल, त्याला भारतीय पुरातत्त्व अधिनियमान्वये ३ महिने कारावास किंवा ५ हजार रुपये दंड किंवा दोन्ही शिक्षा ठोठावण्यात येतील असे तेथे फलकावर लिहिलेले आहे. या कबरीच्या बांधणीसाठी त्या काळात १४ रुपये १२ आणे खर्च आला होता. या कबरीचा देखभालीचा खर्च केंद्र सरकार करीत आहे. नागपूरमधील हिंसाचारानंतर कबरीच्या परिसरात पोलीस बंदोबस्त वाढवला आहे. केंद्र सरकारच्या संमतीनंतर आणि केंद्राची मदत घेऊनच महाराष्ट्रातील औरंगजेबाचे थडगे हटवावे लागेल. राज्यात व केंद्रात भाजपाचेच सरकार आहे. औरंगजेबाचा मुद्दा संयुक्तिक नाही, संघ कोणत्याही हिंसाचाराचे समर्थन करीत नाही, अशी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने मांडलेली समतोल व संयमी भूमिका सर्वांच्या डोळ्यांत अंजन घालणारी आहे.

## परमात्मा प्राप्ती करिता मनुष्य जन्म



संत राजिन्दर सिंह जी महाराज

मनुष्य जन्म मोठ्या भाग्याने मिळतो कारण चौर्याशी लाख योनी मधून फक्त या योनीमध्ये आपण आपल्याला जाणू शकतो आणि पिता-परमेश्वराला प्राप्त करू शकतो. मनुष्य शरीरात आपल्याला विवेक दिला आहे. ज्यामुळे आपण सत आणि असतचा निर्णय करू शकतो. सत्याला अधिग्रहण केल्यावर असत्याचा त्याग करतात. आपल्या आत्म्याला मानव शरीराचे बक्षीस केवळ पैसे कमविणे, कुटुंबाचे पालन-पोषण करणे आणि मग परत जाण्यासाठी मिळाला नाही. हा आपल्या आत्म्याला यासाठी दिला गेला आहे कारण या मनुष्य शरीरातच आपण पिता-परमेश्वराला प्राप्त करू शकतो. अन्य सर्व निम्नस्तराच्या योनीमध्ये पण आत्मा आहे. परंतु त्यांना विवेक नाही. सर्व जीवांमध्ये केवळ मनुष्याला विवेक दिला आहे. त्यामुळे ते आपल्या आत्म्याचा मिलाप परमात्म्याशी करू शकतात. जर ते आपल्या योग्यतेचा उपयोग आपल्या खऱ्या स्वरूपाला 'आत्म्या ला जाणणे आणि परमात्म्याला प्राप्त करणे' हे जर साधले नाही तर मनुष्यामध्ये आणि बाकी सर्व भिन्न प्रजातींमध्ये फरक काय राहील?

आपले जीवन जगत असताना या योग्यतेचा उपयोग आपण सर्व करू शकतो. त्यासाठी आपल्याला विद्यमान पूर्ण गुरूच्या चरणी पोहोचले पाहिजे. मनुष्य जन्म मिळाल्यावर जर गुरु नाही मिळाला तर आपण त्या योग्यतेचा फायदा घेऊ शकत नाही. हे असे आहे, जसे आपल्याला नाव तर मिळाली आहे परंतु नावाडी नाही मिळाला, तर आपण भवसागर कसा पार करू शकतो? गुरू मिळाल्यावरच आपल्याला समज येते की हा संसार मायेचा आहे, जो प्रत्यक्षात काही आणि दिसायला आणखी काही आहे.

जोपर्यंत आपण पूर्ण गुरूच्या चरणी पोहोचत नाही तोपर्यंत आपले विचार हेच असतात की आपल्या जवळ जे काही आहे ते कायम स्वरूपी आहे. येथील धन-संपत्ती, नाते-गोते आणि मान-सन्मान आपल्याला या जगात जखडून ठेवतात. आपण या जगात एवढे फसत जातो की आपल्याला कधी अशी जाणीव होत नसते की आपल्या मनुष्य जीवनाला काही ध्येय सुद्धा आहे. आपल्याला याची जाणीव असो वा नसो परंतु आपल्या जीवनाला चालविणारी शक्ति परमात्म्याचा अंश आहे. आपल्याला या गोष्टीची जाणीव झाल्यावरच आपले संपूर्ण जीवन बदलून जाते आणि चांगले होते.

चला तर! आपण आपले जीवन व्यर्थ घालवू नये. आपल्या जीवनाच्या प्रत्येक दिवशी प्रभूला भेटण्यासाठी एक-एक पाऊल टाकावे, ज्या करिता हा मनुष्य देह मिळाला आहे. एकाद्या पूर्ण अध्यात्मिक गुरूच्या मार्गदर्शनाखाली ध्यान-अभ्यास करून आपण आपल्या अंतरी प्रभू-सत्तेची अनुभुती घ्यावी आणि नेहमी करता या ८४ लाख योनीच्या चक्रातून सुटका करून घ्यावी व याच जीवनात आपल्या आत्म्याची भेट पिता-परमेश्वराशी करावी.

## पाणी बचतीची सवय लावूया!



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई
मो.क्र. ९६६४५५९७८०

यापूर्वी कधीही न अनुभवलेला उकाडा यंदा राज्यातील नागरिकांना मार्च महिन्यातच सहन करावा लागत आहे. एप्रिल आणि मे महिन्यात उन्हाची तीव्रता आणखी वाढणार असल्याने उष्माघाताची शक्यता वर्तवली जात आहे. अन्य ऋतूंच्या तुलनेत उन्हाळ्यात पाण्याचा वापर अधिक वाढतो. वाढती लोकसंख्या, शहरांत सुरु असलेली विकासकामे यांमुळे उपलब्ध पाणी साठ्यावर प्रचंड ताण येत असतो. त्यामुळे येणाऱ्या काळात शहरांतील नागरिकांना पाणी टंचाईचा सामना करावा लागणार आहे हे निश्चित आहे. उन्हाळा सुरु झाला की राज्य तसेच जिल्हा प्रशासनाकडून दरवर्षी पाणी वाचवण्याचे आवाहन करण्यात येते. आगामी काळात जगायचे असेल, तर आज पाण्याची बचत करणे अनिवार्य झाले आहे. बऱ्याचदा शेजारी पाजारी अन्य कोणी पाण्याची बचत करताना दिसत नाहीत, मग मीच का पाणी वाचवावे, असे विचार मनात येतात: मात्र शेजारची व्यक्ती पैशाची उधलपट्टी करते म्हणून त्याचे पाहून आपण ती करत नाही, कारण पैशाचे महत्व, पैसे वाचवण्याचे महत्व, पैसे कमावण्यासाठी लागणारी मेहेनत याबाबतची जाण आपल्या प्रत्येकाला आहे. आज पाणी सहज उपलब्ध होत आहे याचा अर्थ भविष्यातही ते सहज उपलब्ध होईलच असे नाही. त्यामुळे पाण्याच्या बचतीचे महत्वही आपण लक्षात घ्यायला हवे. आपल्या लहान सहान कृतीतून पाण्याची बचत आपल्याला करता येते. पाणी वाचवणे म्हणजे अस्वच्छ राहणे असे मुळीच नव्हे, आपल्या दैनंदिन स्वच्छतेसाठी उदा. आंघोळ, तोंड धुणे, हात धुणे आणि अन्य स्वच्छतेसाठी किती पाणी आपण व्यय करतो हें प्रत्येकाला ज्ञात असते. त्यामध्येही उन्हाळ्यात जर आपण शॉवरचा वापर करत असू तर बादलीचा वापर करून कित्येक लिटर पाणी आपण वाचवू शकतो, हात धुताना हाताला हँडवॉश अथवा साबण लावेपर्यंत आपण नळ चालूच ठेवत असू तर तो बंद करायला हवा. कपडे आणि भांडी धुतानाही हाच नियम पाळूया. भांड्यांना साबण लावताना नळ बंद ठेवूया. पिण्यासाठी आवश्यक तेव्हढेच पाणी घेऊया, जेणेकरून पाणी पिऊन झाल्यानंतर पेल्यात उरलेले पाणी अन्यत्र टाकावे लागणार नाही. कपडे धुण्यासाठी आणि भांडी घासण्यासाठी शक्य असल्यास काही दिवस यंत्राचा वापर न करता हाताने धुण्याचा प्रयत्न करूया. घरातील एखादा नळ बिघाड झाल्याने त्यातून पाणी गळत असेल, तर तो तत्परतेने दुरुस्त करून घेऊया. झाडांना आवश्यक तेव्हढेच पाणी देऊया. एखाद्या ठिकाणी पाईपलाईनमधून पाण्याची गळती होत असेल तर त्वरित पाणी खात्याला कळवून त्या ठिकाणी दुरुस्ती करून घेऊया. पाणी वाचवण्याचे महत्व आपल्या घरातील लहानग्यांनाही सांगुया. आपण जर सोसायटीत राहत असू तर सोसायटीची मिटिंग घेऊन पाणी वाचवण्याचे प्रयत्न सामूहिकपणे करण्याचा प्रयत्न करूया ! पाण्याला जीवन असे म्हटले जाते. फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये महागडे जेवण जेवल्यानंतरही ते पचण्यासाठी जेवणांनंतर किमान ग्लासभर पाणी तरी आपल्याला हवेच असते. पाण्याविना जीवनाची आपण कल्पनाही करू शकत नाही. काही देशांमध्ये पाणीटंचाईमुळे इंधनाच्या दरात पाणी विकले जात असल्याच्या बातम्या आजवर आपण वाचल्या आहेत. आज आपण पाणी नाही वाचवले तर भविष्यात भारततही अशीच परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यासाठी पाणी वाचवण्याची सवय आतापासून अंगवळणी पाडूया ! कितीही पाऊस पडला तरी ज्या प्रमाणात लोकसंख्या वाढत आहे आणि ज्या प्रमाणात पाण्याचा व्यय होत आहे ते पाहता उपलब्ध जलसाठे दरवर्षी अपुरेच पडतात. गेल्या काही वर्षांचा अंदाज घेता हवामान खाते आणि पाऊस यांचे गणित कधी जुळताना दिसत नाही त्यामुळे यंदाही पुरेसा पाऊस पडेल याची काहीच शाश्वती नाही. राजकीय मंडळींकडून महाराष्ट्र राज्य समृद्ध पथावर असल्याचे कितीही सांगण्यात येत असले, तरी राज्याच्या काही भागांतील नागरिकांना दरवर्षी भीषण पाणी टंचाईला तोंड द्यावे लागते. ५-६ किलोमीटर अंतर पायपीट करून पाणी आणावे लागते. पाण्याच्या एका थेंबासाठी दरवर्षी कितीतरी पशु पक्ष्यांचा बळी जातो. भगवंताच्या कृपेमुळे आपल्याला पुरेसे पाणी मिळते त्याबद्दल आपण कृतदक्य राहूया आणि आतापासूनच पाणी बचतीची सवय स्वतःला आणि आपल्या कुटुंबाला लावून घेऊया जेणेकरून भविष्यात पाणीबाणी निर्माण झालीच तर तिचा सामना आपल्याला समर्थपणे करता येईल !

## वातावरणाच्या आकलनातील क्रांती!

जागतिक हवामान दिन दरवर्षी २३ मार्च रोजी साजरा केला जातो. दि. २३ मार्च १९५० मध्ये जागतिक हवामान संस्था स्थापन झाली. म्हणून हा जागतिक हवामान दिवस म्हणून निवडण्यात आला. हवामानाबाबत संपूर्ण जगातील लोकांमध्ये जागृती निर्माण व्हावी व हवामानाचे महत्व समजावे, तसेच हवामान चांगले राहण्यासाठी कोणती दक्षता घेतली पाहिजे, कोणकोणत्या उपाययोजना केल्या पाहिजे याविषयी जाणीव-जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने जागतिक हवामान दिवस महत्वपूर्ण आहे.

माणसाने विज्ञानाच्या जोरावर मोठ्या प्रमाणात प्रगती केली. परंतु हे करीत असताना निसर्गचक्राच्या गतीला बाधा निर्माण झाली. त्यातूनच पर्यावरणाचा समतोल ढासळत गेला. सुरुवातीला याचे प्रमाण कमी होते, परंतु आता मोठ्या प्रमाणात रासायनिक, आधुनिक अशा अनेक साहित्याच्या वापरामुळे हवामानाच्या हानीचा उच्चांक गाठला गेला आहे. त्यामुळे दिवसेंदिवस पृथ्वीवरील पर्यावरणाच्या चक्राचा समतोल बिघडलेला दिसून येतो. मानवनिर्मित आधुनिकीकरणामुळे पृथ्वीवर हवामानात मोठ्या प्रमाणात अनपेक्षित बदल घडत आहेत. हवामानातील या अनपेक्षित बदलांमुळे नैसर्गिक साधनसंपत्तीचे, मानवी साधनसंपत्तीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान तर होतेच शिवाय मोठ्या प्रमाणावर जीवितहानीही होते. मानव विकासाच्या प्रयत्नाने माणूस निसर्गात खुप ढवळाढवळ करत आहे. त्याचेच हे दुष्परिणाम पुढे पुढे दिसून येत आहेत. मानवासोबतच इतर प्राणी, पक्षी यातून सुटू शकत नाहीत. कारण पृथ्वीवरील सजीवांची जैविक साखळी आहे, ती एकमेकांवर अवलंबून आहे. त्यामुळे एका घटकातील बदलाचा परिणाम इतर घटकांवर झालेला दिसून येतो. पृथ्वीवर सजीव सृष्टी व मानवी जीवनासाठी पोषक वातावरण असल्याने पृथ्वीवर मानवाचे अस्तित्व टिकून आहे. मानव ज्या ठिकाणी वास्तव्य करतो त्याच्या सभोवतालच्या हवामानाचे नाते त्याच्याशी अतिशय घनिष्ठ असते. त्यामुळेच मानवाच्या अस्तित्वाला अर्थ आहे. म्हणून हवामान हे मानवाच्या जगण्याची आवश्यकता आहे. कारण हवामानाचा मानवी जीवनावर खोलवर परिणाम होतो. मानवाचे भरण-पोषण करण्यात हवामानाचे नाना आविष्कार महत्वपूर्ण भूमिका पार पाडतात. उन्हाळा, पावसाळा, हिवाळा हे हवामानाचे एक प्रकारे आविष्कार आहे.

चक्रीवादळे ओडिशाच्या किनारपट्टीवर धडकतात, तेव्हा भारत अक्षरशः वादळाच्या नजरेत असतो. चक्रीवादळे भारतासाठी नवीन नाहीत, परंतु भारताने एक प्रचंड यशस्वी निर्वासन कसे काढले- इतिहासातील सर्वात मोठे- चक्रीवादळ येण्यापूर्वी एक दशलक्षाहून अधिक लोक सुरक्षित आश्रयस्थानी स्थलांतरित झाले हे विशेष होते. प्रचंड जीवांची शोकांतिका काय असू शकते, सन १९९९च्या चक्रीवादळामुळे झालेल्या १० हजार मृत्यूंच्या तुलनेत या स्थलांतरामुळे फक्त ४० मृत्यू झाले. येथे इतके जीव वाचवण्यात कशामुळे मदत झाली? अचूक हवामान अंदाज जगभरातील हजारो जीव वाचविण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. हवामान, आपल्या सभोवतालच्या वातावरणाची स्थिती म्हणूनच परिभाषित केलेले, अतिशय गतिमान आहे. गरम किंवा थंड, ओले किंवा कोरडे, शांत किंवा वादळी, स्वच्छ किंवा ढगाळ, धुके किंवा धुकेसदृश्य प्रत्येक स्थितीचा आपल्या जीवनावर काही परिणाम होतो. बियाणे पेरण्यापूर्वी शेतकरी ढगांचा शोध घेतात, पायलट टेकऑफ किंवा उतरण्यासाठी दृश्यमानतेवर अवलंबून असतात, खलाशी वाऱ्यावर आधारित जहाजाची पाल बसवतात आणि अनेक क्रीडा स्पर्धा पावसाच्या दयेवर असतात. पावसाच्या सरी बंगळुरूमधील वाहतूक सुरळीतपणे किंवा विस्कळीत करू शकतात!

खूप काही धोक्यात असताना आपल्या अस्तित्वासाठी हवामान समजून घेणे अत्यावश्यक आहे. त्यामुळेच हवामानशास्त्र नावाच्या विज्ञानाच्या एका नवीन शाखेचा उदय झाला आहे. ग्रीक शब्द मेटीओरॉसपासून व्युत्पन्न, ज्याचा अर्थ उंच आकाशात असा होतो, हवामानशास्त्रात या शब्दाचा अनुवाद हवेतील गोष्टींचा अभ्यास असा होतो. भारतीय संदर्भात हवामान समजून घेण्यासाठी अनेक अत्यावश्यकता आहेत. भारतासारखा देश, जो प्रामुख्याने शेतीवर आधारित अर्थव्यवस्था आहे, हवामानशास्त्र अतिशय समर्पक आहे. मान्सूनचा पाऊस वर्षातील चार महिने टिकतो, त्यामुळे आपली शेती आणि पाण्याच्या गरजांवर परिणाम होतो आणि त्याचा अंदाज लावण्याची क्षमता अत्यंत गंभीर बनते, असे प्रा.जे श्रीनिवासन सेंटर फॉर टमॉस्फेरिक अँड ओशनिक सायन्सेस (सीएओएस), इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बंगलोर येथील प्राध्यापक म्हणतात, माझ्या मते, भारताने हवामानशास्त्रासाठी अधिक पैसा आणि संसाधने खर्च केली पाहिजेत.

मानवतेसाठी हवामानशास्त्राचे महत्त्व ओळखून, संयुक्त राष्ट्रांच्या जागतिक हवामान संघटनेने दरवर्षी २३ मार्च हा जागतिक हवामान दिन -डब्ल्यूएमडी- म्हणून पाळण्याचा निर्णय घेतला आहे आणि २०१७ची थीम अंडरस्टँडिंग क्लाउड्स अशी घोषित केली होती. हा एक खास मार्ग आहे, पावसाच्या हार्बिंगर्सचे आभार व्यक्त करण्याचा. हवामानशास्त्राचा संस्थापक मानला जाणारा, प्रसिद्ध ग्रीक तत्वज्ञानी अरिस्टॉटल यांचे ३५० ईसा पूर्व मधील हवामानशास्त्र या ग्रंथात पाऊस आणण्यासाठी जबाबदार असलेल्या जलचक्राचे वर्णन केले आहे. परंतु ढग निर्मिती आणि पाऊस आणि सूर्याभोवती पृथ्वीच्या हालचालींमुळे होणारे ऋतुचक्र याविषयीचे भारतीय ज्ञान उपनिषदांच्या काळापासूनचे आहे. वराहमिहिराचे शास्त्रीय ग्रंथ बृहतसंहिता सुमारे ५०० एडीमध्ये लिहिलेले, त्या काळात अस्तित्वात असलेल्या वातावरणातील प्रक्रियांच्या सखोल ज्ञानाचा स्पष्ट पुरावा देते. जगभरातील तत्सम कार्यांमुळे ऋतू, वारा, गडगडाट, विजा, बर्फ, पूर, दऱ्या, नद्या इ.यासारख्या इतर वातावरणीय घटनांबद्दलचे आकलन समृद्ध झाले आहे. १५व्या शतकात पर्जन्यमान मोजण्यासाठी कोरियाच्या प्रिन्स मुंजॉन्ग यांनी पहिल्या प्रमाणित पर्जन्यमापकाचा शोध घेऊन हवामानशास्त्रातील एक नवीन युग चिन्हांकित केले. निमोमीटर- वाऱ्याची शक्ती मोजण्यासाठी, थर्मोस्कोप- तापमान मोजण्यासाठी, पारा बॅरोमीटर- वातावरणाचा दाब मोजण्यासाठी आणि हायग्रोमीटर- आर्द्रता मोजण्यासाठी यांसारख्या उपकरणांच्या नंतरच्या शोधांमुळे आम्हाला हवामानावर परिणाम करणारे घटक मोजण्याची क्षमता मिळाली. या उपकरणांव्यतिरिक्त, बर्फाची निर्मिती, हायड्रोडायनॅमिक्स, वायूंचे गतिज सिद्धांत, थर्मोडायनामिक्सचे नियम, ढगांची ओळख आणि वर्गीकरण आणि वाऱ्याच्या गतीचे वर्गीकरण यावरील विविध वैज्ञानिक प्रबंधांमुळे वातावरणातील विविध घटनांबद्दलची आमची समज वाढली. या व्याख्यांचा मूर्त परिणाम म्हणजे पहिला आंतरराष्ट्रीय क्लाउड टलस जो १९व्या शतकाच्या शेवटी छापला गेला.

सद्य परिस्थितीवर आधारित हवामानाचा अंदाज घेण्यासाठी १७व्या शतकात हवामान निरीक्षण नेटवर्क सुरू करण्यात आले होते, जेथे डेटा नियमित अंतराने गोळा केला गेला आणि मैल दूर असलेल्या प्रक्रिया केंद्रात पाठविला गेला. टेलीग्राफच्या आगमनाने विस्तृत क्षेत्रातून हवामान निरीक्षणांचे द्रुत संकलन सक्षम केले, ज्याचा उपयोग प्रदेशासाठी वातावरणाच्या स्थितीचे नकाशे तयार करण्यासाठी केला जात असे. सन १८६०मध्ये प्रथम दैनिक हवामान अंदाज वृत्तपत्रांवर आला. १९व्या शतकाच्या उत्तरार्धात, भारतासह अनेक देशांनी राष्ट्रीय हवामान सेवांची स्थापना केली. भारत हवामान विभाग- आईएमडी, सन १८७५मध्ये स्थापित आज हवामानशास्त्र, भूकंपशास्त्र आणि इतर संबंधित क्षेत्रांशी संबंधित सर्व बाबींमध्ये प्रमुख सरकारी संस्था आहे. २०व्या शतकाच्या पहाटेने हवामानशास्त्रातील तांत्रिक प्रगतीला वेग दिला- हवामान उपग्रह, संगणक आणि जलद संप्रेषण वाहिन्यांनी हवामान समजून घेण्याचा आणि अंदाज लावण्याचा एक नवीन अध्याय उघडला. गेल्या शतकात हवामानशास्त्राच्या क्षेत्रात तीन क्रांतिकारक बदल झाले आहेत- उपग्रह, संगणक आणि दळणवळण अशी प्रो.श्रीनिवासन यांनी टिप्पणी केली, त्यांनी आमच्या वातावरणाच्या आकलनात क्रांती घडवून आणली आहे.

एप्रिल १९६०मध्ये एनएएसए- नासाद्वारे टीआईआरओएस-१ या पहिल्या यशस्वी हवामान उपग्रहाच्या प्रक्षेपणाने आकाशात डोळा लावला. तेव्हापासून, चीन, भारत, रशिया आणि युरोपियन युनियनमधील अनेक देशांनी त्याचे अनुसरण केले आहे आणि हवामानविषयक उपग्रहांची स्वतःची मालिका प्रक्षेपित केली आहे. कॅमेरे आणि सेन्सर्सने सज्ज असलेले हे उपग्रह पृथ्वीला उत्तर-दक्षिण दिशेला- ध्रुवीय परिभ्रमण फिरवतात किंवा फिरणाऱ्या पृथ्वीच्या-भूस्थिर संदर्भात स्थिर राहतात. उपग्रह केवळ ढग आणि ढग प्रणालींपेक्षा बरेच काही पाहू शकतात- शहरातील दिवे, आग, प्रदूषणाचे परिणाम, अरोरा, वाळू आणि धुळीची वादळे, बर्फाचे आवरण, महासागरातील प्रवाह, ऊर्जा प्रवाह इ. सॅटेलाइट इमेजेस महासागरांवर पर्जन्यवृष्टी कशी होते, वादळ कसे जन्माला येते आणि जमिनीवर कसे सरकते, हे समजते, जे आधी अशक्य होते ते समजून घेते, प्रो.श्रीनिवासन म्हणतात, उपग्रहांद्वारे, आम्ही आता प्रत्येक चक्रीवादळ आणि प्रत्येक वादळावर लक्ष ठेवत आहोत आणि आम्हाला आश्चर्यचकित करणारे काहीही नाही. २०व्या शतकाच्या सुरूवातीपासून, गणित आणि भौतिकशास्त्रातील एक समस्या म्हणून हवामान अंदाजाकडे पाहिले जात होते ज्याने गणिते आणि भौतिकशास्त्राच्या नैसर्गिक नियमांवर आधारित उपाय मागितले होते, त्यामुळे अंकीय हवामान अंदाजांना जन्म दिला. तथापि, गणितीय मॉडेल्स सोडवण्यामध्ये गुंतलेल्या गणनांच्या पूर्ण संख्येने संगणकाच्या आगमनापर्यंत त्याची पूर्ण क्षमता मर्यादित केली. आज, बहुतेक हवामान संस्था सुपरकॉम्प्युटर वापरतात जे सेकंदाला दहा लाख कोटी गणना प्रक्रिया करू शकतात, त्यामुळे अंदाज अचूकता वाढते.

दिवसेंदिवस वातावरण आणि विविध घटकांबद्दलची आपली समज जसजशी वाढत जाते, तसतसे जगभरातील हवामानशास्त्रज्ञ सद्य हवामान आणि तापमान, दाब आणि वारा यांसारख्या पर्यावरणीय परिस्थितींचा विचार करून वातावरणाच्या भविष्यातील स्थितीचा अंदाज घेण्यासाठी मजबूत गणितीय मॉडेल तयार करत आहेत. प्रचंड संगणकीय क्षमतेने समर्थित, ही मॉडेल्स आता वाढीव रिझोल्यूशनसह चालविली जाऊ शकतात. नेहमीच्या गडगडाटी वादळाला किंवा चक्रीवादळाला राक्षसात रूपांतरित करू शकतील अशा छोट्या-छोट्या परिस्थितींचे अनुकरण करणे आता सोपे काम आहे. आम्ही सांख्यिकीय अंदाजावरून संगणक आधारित अंदाजाकडे वळलो आहोत ज्यामध्ये उपग्रहांकडील डेटा आत्मसात करणारे चांगले मॉडेल समाविष्ट आहेत. आपले वातावरण अतिशय गुंतागुंतीचे असल्याने, चक्रीवादळांसारख्या मोठ्या घटनांचे भाकीत करणे, जे पूर्वी अव्यवहार्य होते, ते आता कोणत्याही अडचणीशिवाय केले जाते प्रो.श्रीनिवासन स्पष्ट करतात. आता, हवामानशास्त्रज्ञ पुढील १२, २४, ३६, ४८ आणि ७२ तासांसाठी अचूक अंदाज बांधतात आणि या प्रक्रियेत आम्हाला नैसर्गिक आपत्तींना चांगला प्रतिसाद देण्यात मदत करतात.

इंटरनेट ऑफ थिंग्ज आणि बिग डेटा सारख्या अग्रगण्य तंत्रज्ञानासह हवामानशास्त्राचे भविष्य कसे दिसते? ज्याप्रकारे गोष्टी घडत आहेत, मला खात्री आहे की हवामानशास्त्राचे भविष्य खूप रोमांचक असेल, असे मत प्रा.श्रीनिवासन यांनी व्यक्त केले. आज, सेन्सर लहान आणि स्वस्त होत आहेत, जे डेटा संकलनात क्रांती घडवून आणतील. कॉम्प्युटिंगची प्रचंड शक्ती आपल्याला वातावरणातील जटिल घटनांचे अगदी कमी रिझोल्यूशनमध्ये मॉडेल बनविण्यास सक्षम करते असेही ते पुढे म्हणाले. हवामानशास्त्राचे क्षेत्र मान्सूनचा अचूक अंदाज लावणे किंवा पृथ्वीच्या पृष्ठभागापासून सुमारे एक किलोमीटर अंतरावरील ढगांची प्रत्येक हालचाल समजून घेणे यासारख्या बौद्धिकदृष्ट्या उत्तेजक आव्हानांनी भरलेले आहे. पुढील पन्नास वर्षे व्यग्र ठेवण्यासाठी या क्षेत्रातील आव्हाने भरपूर आहेत! ही आव्हाने सोडवल्यास भविष्यात नाट्यमय परिणाम मिळतील. अशी टिप्पणी प्रा.श्रीनिवासन यांनी केली.

निसर्गाचे मार्ग डीकोड करण्याचा मानवतेचा शोध कधीही संपत नाही आणि हवामानशास्त्रही त्याला अपवाद नाही. हवामानाचे कोडे समजून घेण्याच्या आमच्या छोट्या पण महत्त्वाच्या पावलांनी आता आम्हाला अशा माहितीने सशक्त केले आहे जे निसर्गाच्या खेळाविरूद्ध ट्रम्प कार्ड असू शकते. याची आठवण करून देण्यासाठी आणि हवामान बदलासारखे मोठे आव्हान सोडवण्याचे संकेत मिळावेत यासाठी आजच्यापेक्षा चांगला दिवस तो कोणता?

– संकलन व सुलेखन –
श्री कृष्णकुमार आनंदी – गोविंदा निकोडे गुरूजी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.

# श्री चैतन्य अकॅडमीने सुरु केले नागपुरात पहिले टेस्ट प्रिपरेशन सेंटर

**नागपूर, २३ मार्च :** परिणामपूर्वक गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या संधी विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यावर भर देणाऱ्या इनफिनिटी लर्नचा महत्वाचा उपक्रम असलेल्या श्री चैतन्य अकॅडमीने महाराष्ट्रातील दुसरे आणि नागपूरमधील पहिले टेस्ट प्रिपरेशन सेंटर सुरू केले आहे. या शिकवणी केंद्राचे उद्घाटन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री श्री नितीन गडकरी यांच्या हस्ते करण्यात आले. हे नवीन केंद्र नागपूरमधील विद्यार्थ्यांना जेईई मेन्स, जेईइ ॲडव्हान्स आणि नीट परीक्षांसाठी अत्याधुनिक सुविधा आणि अनुभवी शिक्षकांचे मार्गदर्शन पुरविणार असून या परीक्षांसाठी त्यांना दर्जेदार शिकवणी मिळणार आहे. या उपक्रमामुळे आता विद्यार्थ्यांना उत्कृष्ट प्रशिक्षणासाठी इतर ठिकाणी जावे लागणार नाही.




योग्य आणि प्रभावी शैक्षणिक सुविधांची मागणी लक्षात घेता विद्यार्थ्यांना आपल्या गावातच राहून स्पर्धात्मक परीक्षांसाठी दर्जेदार शिक्षण घेता यावे या उद्देशाने श्री चैतन्य अकॅडमीने नागपुरातील हे केंद्र सुरू केले आहे. या उपक्रमामुळे श्री चैतन्य अकॅडमीची पश्चिम भारतातील उपस्थिती अधिक बळकट झाली आहे. नागपूरमधील विद्यार्थ्यांना उत्कृष्ट शिकवणी, अनुभवी शिक्षकांचे मार्गदर्शन आणि उत्तम संसाधने मिळावी, त्यांना आपल्या शहरातून बाहेर जावे लागू नये आणि जागतिक दर्जाचे शिक्षण त्यांच्यापर्यंत पोहोचावे, या हेतूने हे केंद्र सुरू करण्यात आले आहे.

श्री चैतन्य ग्रुपच्या सीईओ आणि संचालक सुश्री सुषमा बोप्पाना, श्री चैतन्य गेल्या ४० वर्षांपासून महत्वाकांक्षी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक स्वप्नांना मूर्त स्वरूप देण्याचे काम करत आहे. २०२३ मध्ये आम्ही जेईई मेन्स, जेईइ ॲडव्हान्स आणि नीट परीक्षांमध्ये देशातून पहिला क्रमांक मिळवण्याचा इतिहास रचला आहे. आमचे नागपूर केंद्र याच यशाची पुनरावृत्ती करेल तसेच जेईई आणि नीट परीक्षांमध्ये यश मिळविण्यासाठी इच्छुक असणाऱ्या शहरातील प्रत्येक विद्यार्थ्याला त्याची पार्श्वभूमी न बघता दर्जेदार मार्गदर्शन मिळेल. आम्ही गणित आणि विज्ञान विषयांवर विशेष भर देतो जेणेकरून कठीण स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थ्यांची शालेय वयातच मजबूत पायाभरणी होते. त्यामुळे पुढील टप्प्यावर जाताना त्यांना अवघड विषय शिकताना अडचणी येत नाहीत. या केंद्र विस्तारासह आम्ही एक गतिशील शिक्षण वातावरण निर्माण करण्याची आणि नागपूरच्या शैक्षणिक क्षेत्रात सकारात्मक बदल घडवण्याची आमची बांधिलकी स्पष्ट करत आहोत.

इनफिनिटी लर्नचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री उज्ज्वल सिंग म्हणाले, श्री चैतन्यची सिद्ध असलेली शिक्षण पद्धती आम्ही नागपूरच्या विद्यार्थ्यांसाठी आणत आहोत. वैयक्तिक मार्गदर्शन, आधुनिक तंत्रज्ञान आणि संकल्पनांची सखोल समज हा आमच्या शिक्षण पद्धतीचा गाभा आहे जो आमच्या बच्चा सिखा कि नही या ब्रिदवाक्यातून स्पष्ट दिसून येतो. आपले स्वप्न साकार करण्यासाठी, देशाच्या सर्वोत्तम शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी आणि आपल्यासह आपल्या कुटुंबाचे उज्ज्वल भविष्य घडविण्यासाठी आम्ही या केंद्राद्वारे नागपूर आणि आजूबाजूच्या परिसरातील विद्यार्थ्यांना सर्वोत्कृष्ट मार्गदर्शन देणार आहोत. या केंद्राची सुरुवात म्हणजे शिक्षणाचे लोकशाहीकरण आणि प्रत्येक विद्यार्थ्याला त्यांच्या मूळ गावी, त्यांच्या सोयीनुसार, भौगोलिक परिस्थितीची पर्वा न करता उच्च दर्जाची संसाधने उपलब्ध करून देण्याच्या आमच्या वचनबद्धतेचा पुरावा आहे.

श्री चैतन्य अकॅडमी इनफिनिटी लर्न उपक्रमाचे ध्येय नागपूरमध्ये जेईई मेन, जेईई ॲडव्हान्स आणि नीट परीक्षांमध्ये देशातून पहिला क्रमांक मिळविण्याच्या मिळवण्याच्या ऐतिहासिक यशाची पुनरावृत्ती करणे आहे. श्री चैतन्य हा आशियातील सर्वात मोठ्या शैक्षणिक गटांपैकी एक असून, २०२३ मध्ये त्यांनी जेईई आणि नीट परीक्षेमध्ये टॉप रँकर्स घडवले आहेत. नागपूरमधील हे टेस्ट प्रिपरेशन सेंटर जेईई आणि नीट परीक्षांसाठी विशेष कोचिंग प्रदान करेल तसेच येथे इयत्ता ८वी, ९वी आणि १०वीसाठी फाउंडेशन कोर्सेस उपलब्ध असतील. या केंद्रामध्ये विद्यार्थ्यांना संकल्पनांची मजबूत पकड मिळावी आणि राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धात्मक परीक्षांमध्ये यश मिळवण्यासाठी आवश्यक कौशल्ये आणि ज्ञान विकसित करता यावे यावर भर दिला जाणार आहे.

हे अत्याधुनिक केंद्र एआय-आधारित वैयक्तिक शैक्षणिक साधने, सुसज्ज ग्रंथालय, प्रॅक्टिस लॅब्स, संपूर्ण टेस्ट सिरीज आणि अनुभवी प्राध्यापकांसह उत्तम पायाभूत सुविधा प्रदान करेल. श्री चैतन्य अकॅडमीचा तंत्रज्ञान आणि पारंपरिक शिक्षण पद्धती यांचा समतोल साधून, एक अद्वितीय हायब्रिड शैक्षणिक अनुभव देण्यावर विश्वास आहे. सुलभता, गुणवत्ता आणि परवडणारे शिकवणी शुल्क या गोष्टींना प्राधान्य देत सुरु करण्यात आलेल्या नागपूर आणि नांदेडमधील या नव्या टेस्ट प्रिपरेशन सेंटर्समुळे महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात मोठा बदल घडेल.या केंद्र विस्तारासह श्री चैतन्य अकॅडमी आता भारतभरात एकूण ५० केंद्रे चालवत असून जेईई आणि नीट परीक्षांच्या शिकवणीमध्ये अग्रणी म्हणून आपले स्थान बळकट करत आहे. या केंद्र विस्तारामुळे आता विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे कोचिंग घेण्यासाठी आणि यश संपादन करण्यासाठी मोठ्या शहरांत जाण्याची गरज पडणार नसून आपल्या गावात राहूनच ते दर्जेदार शिक्षण घेऊ शकतील.

हा धोरणात्मक विस्तार इन्फिनिटी लर्नला भारतातील अग्रगण्य अभियांत्रिकी आणि वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश मिळवून देणाऱ्या आघाडीच्या संस्थांपैकी एक म्हणून स्वतःला सिद्ध करण्याच्या दिशेने महत्वाचे पाऊल आहे.

## पीडब्ल्यूच्या गेट वालाने गेट २०२५ मध्ये टॉप दहा अंतर्गत १४ रँक्स सुनिश्चित केले, नागपूरचा संकेत टॉप रँकर्समध्ये



**नागपूर, २३ मार्च :** फिजिक्सवाला (पीडब्ल्यू) या शिक्षण कंपनीच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या गेट व्हर्टिकल गेट वालाच्या माध्यमातून गेट २०२५ मध्ये उत्तम कामगिरी केली आहे. नागपूरच्या संकेत तुपकरने मेकॅनिकल इंजीनिअरिंगमध्ये एआयआर आणि इंजीनिअरिंग सायन्समध्ये एआयआर ७ सुनिश्चित केले आहे, ज्यामुळे तो गुणवंत विद्यार्थ्यांच्या यादीमध्ये सामील झाला आहे. संकेतने विजय गेट २०२५ बॅचच्या माध्यमातून तयारी केली. तसेच गेट वालाने विविध स्ट्रीम्समधील टॉप १० मध्ये १४ रँक्स, तसेच ईसीईमध्ये एआयआर १ आणि आयएनमध्ये एआयआर १ सुनिश्चित केले आहे.

संकेतचे वडिल खाजगी क्षेत्रात काम करतात आणि त्याची आई गृहिणी आहे. त्यांचा अविरत पाठिंबा त्याचे सामर्थ्य राहिले आहे. त्यांनी दिलेल्या सतत प्रोत्साहनासह त्याने शिक्षणामध्ये लक्ष केंद्रित केले. त्याच्यावरील त्यांच्या विश्वासाने त्याला यशाकडे नेले आहे.

पीडब्ल्यूचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी अलख पांडे म्हणाले, ''सर्व विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन. गेल्या वर्षी गेट वाला विद्यार्थ्याने ईसीईमध्ये एआयआर १ सुनिश्चित केले आणि आम्हाला या वर्षी देखील त्याचीच पुनरावृत्ती होताना पाहण्याचा आनंद होत आहे. विविध शाखांमधील आमचे विद्यार्थी अधिक प्रमाणात टॉप रँकर्स ठरले. त्यांचे प्रयत्न आणि कटिबद्धतेमुळे हे निकाल सुनिश्चित झाले आहेत.''

संकेत आणि इतर गेट २०२५ रँकर्सनी दाखवून दिले आहे की, अवधान केंद्रित केलेली तयारी आणि स्थिर प्रयत्नामधून मोठे यश मिळू शकते. त्यांच्या प्रवासांमधून त्यांचे कुटुंबिय, शिक्षकांचा पाठिंबा आणि त्यांचा स्वत:चा निर्धार दिसून येतो. ते त्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक मार्गाच्या दिशेने वाटचाल करत असताना त्यांचे अनुभव भावी महत्त्वाकांक्षी विद्यार्थ्यांना त्यांच्या ध्येयांप्रती कटिबद्ध राहण्यास प्रेरित करतील.



## लोक कला सेवा मंडळाची बैठक सम्पन्न

**सावरगाव, २३ मार्च :** लोक कला सेवा मंडळ ऑल इंडिया शाखा काटोल व नरखेड तालुक्याच्या वतीने आढावा बैठक सावरगांव घेण्यात आली.लोक कला सेवा मंडळ ऑल इंडिया राष्ट्रीय अध्यक्ष राजकुमारजी घुले यांच्या निर्देशानुसार या बैठकीचे सावरगाव येथे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीत महाराष्ट्र कला भुषण पुस्कार,आयकार्ड विषयी माहिती देण्यात आली.संस्थेचे संघटन व कलावंतांना मानधान विषयी माहिती देण्यात आली.कलावंताना नियुक्ती पत्र देण्यात आले व लोक कला सेवा मंडळाचे विचार घरोघरी कसे रुजावे यावर चर्चा करण्यात आली.

या बैठकीला पुरुषोत्तम डांगोरे, बारई महाराज,गोपाल भिसे,शेषराव काळे,सुखदेव हनवते,नरेन्द्र धवराळ, अविदादा राऊत, राजु टापरे,संजय खोडे,ललिता खोडे उपस्थित होते.

बैठकीचे आयोजन (जिल्हा अध्यक्ष ) जोशना मदनकर व ललीता खोडे यांनी केले.प्रास्ताविक लता देशमुख,संचालन जोशना ताई मदनकर,आभार प्रदर्शन अवि राऊत यांनी केले.

यावेळी माऊली महिला भजन मंडळ, हरी पाठ महिला भजन मंडळ, गुणवंत बाबा महिला भजन मंडळ, ज्ञानेश्वरी महीला भजन मंडळ, सती अनुसया महिला भजन मंडळ व सर्व पदाधिकारी व कलावंत मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गोदरेज जर्सीतर्फे आर्थिक वर्ष २६ साठी 3x3 धोरण सादर

**हैदराबाद, २३ मार्च :** दक्षिण भारतातील दुग्ध व्यवसायातील अग्रगण्य ब्रँड गोदरेज जर्सी ने आज आर्थिक वर्ष २६ साठी आपले महत्त्वाकांक्षी 3x3 Leapfrog धोरण सादर केले. या भविष्याभिमुख उपक्रमाचा उद्देश कंपनीच्या उत्पादन श्रेणीचा विस्तार करणे, बाजारातील प्रवेश वाढवणे आणि सातत्यपूर्ण नवीन उपक्रमाद्वारे ग्राहकांचा अनुभव अधिक उंचावणे हा आहे. बदाम दूध, पनीर आणि दही या तीन मुख्य उत्पादनांवर लक्ष केंद्रित करून गोदरेज जर्सी दुग्ध व्यवसायातील मूल्यवर्धित विभागात आघाडी घेण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे.




या धोरणाची तीन प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत:

घरोघरी प्रवेश वाढवणे: आंध्र प्रदेश आणि तेलंगणामधील व्हॅल्यू ॲडेड प्रॉडक्ट पोर्टफोलिओची चाचणी आणि वापर वाढवणे.

बाजार विस्तार: बदाम दूध आणि पनीरचे आंध्र प्रदेश व तेलंगणा व्हॅल्यू ॲडेड प्रॉडक्ट मधील प्रादेशिक बाजारपेठेत वितरण वाढवणे.

उत्पादनात नाविन्यपूर्णता: ग्राहकांच्या बदलत्या आवडीनुसार सतत नाविन्यपूर्ण मूल्यवर्धित उत्पादने विकसित करणे.

गोदरेज जर्सीचे मुख्य कार्यकारी अधिकारी भूपेंद्र सूरी म्हणाले, आर्थिक वर्ष २६ च्या दिशेने वाटचाल करत असताना आमचे विकास धोरण उभरत्या श्रेणींमध्ये मजबूत स्थिरता मिळवण्यावर केंद्रित आहे. 3x3 Leapfrog धोरण आम्हाला बाजारपेठीय विस्तार वेगवान करण्यास, ग्राहकांना अधिक चांगले पर्याय देण्यास आणि सातत्यपूर्ण नवीन उपक्रम, धोरणात्मक गुंतवणूक आणि योग्य भागीदारीद्वारे शाश्वत वाढ साध्य करण्यास मदत करेल. जोडीला मूल्यवर्धित उत्पादन पोर्टफोलिओ विस्तारून आमचा बाजारपेठीय हिस्सा मोठ्या प्रमाणात वाढवण्याचे उद्दिष्ट ठेवत आम्ही दक्षिण भारतातील दुग्ध व्यवसायात आमचे नेतृत्व अधिक मजबूत करू. या धोरणांच्या मदतीने गोदरेज जर्सी पुढील दोन वर्षांत तेलंगणामध्ये १,००० कोटी रु. ची उलाढाल साध्य करण्यासाठी तयार आहे. बाजारातील प्रवेश, उत्पादन नाविन्यपूर्णता आणि ग्राहक सहभागाच्या वाढीमुळे याला चालना मिळेल.

ब्रँड आपली मार्केटिंग गुंतवणूक वाढवत आहे आणि नवीन अत्याधुनिक तंत्रांचा वापर करून विकासाला गती देत आहे. यामध्ये उच्च-प्रोफाइल सेलिब्रिटी यांचा सहभाग समाविष्ट आहे. प्रख्यात अभिनेता राणा दग्गुबाती बदाम दुधासाठी आणि विस्मई फुड्सचे प्रसिद्ध शेफ तेजा पनीर श्रेणीसाठी ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून असतील. यामुळे गोदरेज जर्सीचे बाजारपेठेतील स्थान उंचावेल, ब्रँड प्रभाव वाढेल आणि ग्राहकांमध्ये त्यांची ओळख आणखी मजबूत होईल.

गोदरेज जर्सीचे मार्केटिंग प्रमुख शंतनू राज म्हणाले, आजचे ग्राहक परिक्षेत्र आजपर्यंत कधी नव्हते एवढे गतिशील झाले आहे. त्यामुळे अग्रणी राहणे म्हणजे त्यांच्या बदलत्या गरजा ओळखून त्या पूर्ण करणे महत्त्वाचे आहे. मूल्य वर्धित उत्पादनांवर आमचा भर सुलभता, चव आणि नाविन्यपूर्णतेबाबत बांधिलकी जपत अधिकाधिक घरांपर्यंत पोहोचवण्यावर आणि बाजार विस्तारावर केंद्रित आहे. यासाठी आम्ही आंध्रप्रदेश तेलंगणामध्ये व्हॅल्यू ॲडेड प्रॉडक्ट जाहिरात आणि संज्ञापन अधिक वाढवत आहोत तसेच जागृती आणि चाचण्या दोन्ही वाढविण्यासाठी पुढील वर्षभरात तेलंगणामध्ये वितरण नेटवर्क २०,००० आउटलेट्स पर्यंत वाढवत आहोत. जोडीला गोदरेज जर्सी बदाम दूध येत्या दोन वर्षांत १०० कोटी रु. चा ब्रँड बनण्याच्या मार्गावर आहे. आम्ही क्विक कॉमर्स आणि मॉडर्न ट्रेड यांसारख्या विविध चॅनेल्समध्ये आमचे स्थान मजबूत करत आहोत. ग्राहक-केंद्रीत दृष्टिकोनाला डेटा प्रणीत माहितीची जोड देऊन सखोल सहभाग वाढवणे, उपलब्धतेला गती देणे हे आमचे उद्दिष्ट आहे. त्यायोगे गोदरेज जर्सी दक्षिण भारतातील सर्वाधिक विश्वासार्ह ब्रँड राहील हे आम्ही सुनिश्चित करत आहोत.

गोदरेज जर्सीचे शहरी तसेच ग्रामीण बाजारपेठांमध्ये धोरणात्मक विस्तार करण्याचे ध्येय आहे. ब्रँडचे मल्टी-प्रॉन्गड धोरण भविष्यासाठी मजबूत पाया तयार करत आहे. ब्रँडने महत्वाकांक्षी उत्पादन नाविन्यपूर्ण धोरण आणि ग्राहक सहभाग यावर भर देत बाजारपेठीय हिस्सा वाढवण्याच्या दृष्टीने स्वतःचे स्थान निर्माण केलेले असताना गोदरेज समूहाच्या गुणवत्ता, विश्वास आणि कल्याणकारी दृष्टिकोनाचा वारसा जपण्यास बांधील आहे.

## पंतप्रधानांच्या निष्पक्षतेवर देशवासीयांचा विश्वास : हेमंत पाटील

**मुंबई, २३ मार्च :** मतदार संघ पुनर्रचना संदर्भात विरोधकांकडून देशभरात रान पेटवण्याचा प्रयत्न केला जात आहे. देशवासियांमध्ये संभ्रम निर्माण करीत सरकारवर दबाव आणण्याचा मार्ग विरोधकांनी अवलंबला आहे.मात्र,पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात कुठलाही निर्णय निष्पक्षतेने घेतला जाईल.देशवासियांना मोदींवर विश्वास आहे, अशा शब्दात इंडिया अगेन्स्ट करप्शनचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि ओबीसी नेते हेमंत पाटील यांनी विरोधकांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केला.

मतदार संघ पुनर्रचना मुद्यावर तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम.के.स्टॅलिन यांनी बोलावलेल्या बैठकीत विरोधी पक्षाच्या नेत्यांनी हजेरी लावली. परंतु, या बैठकीत विरोधकांमधील फूट स्पष्टपणे दिसून आली. महाराष्ट्रातील मुख्य राजकीय पक्ष शिवसेना (उबाठा), एनसीपी (एसपी) सह समाजवादी आणि राष्ट्रीय जनता दलाला बैठकीचे आमंत्रण नव्हते.एकंदरीतप्रस्तावित मतदार संघ पुनर्रचना संदर्भात विरोधकांमध्ये फूट आहे.मतदार संघांची पुनर्रचना काळाची गरज आहे.वाढत्या लोकसंख्येनूसार लोकसभेतील प्रतिनिधित्व वाढवणे आवश्यक असल्याचे पाटील म्हणाले.लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघांची दर दहा वर्षांनी पुनर्रचना करावी, अशी तरतूद राज्यघटनेत आहे.लोकसंख्या त्यासाठीचा मुख्य निकष आहे. २००२ च्या संसदीय कायद्यानूसार पर्यंत मतदार संघ पुनर्रचना करण्यात येत नव्हती. २०२६ नंतर पुनर्रचना होईल, असे मत पाटील यांनी व्यक्त केले.

मतदार संघांच्या पुनर्रचने नंतर लोकसंख्येच्या आधारे दक्षिण भारतातील लोकसभेच्या जागा कमी होतील, अशी भीतीत डीएमके सह इतर पक्षांना आहे.मतदार संघाच्या पुनर्रचने विरोधात नसून निष्पक्ष पुनर्रचनेची मागणी केरळ, कर्नाटक, आंधप्रदेश, तेलंगना, ओडिशा, पश्चिम बंगाल आणि पंजाब मधील निवडक पक्षांची आहे.परंतु, विद्यमान सरकारच्या कार्यकाळात घेण्यात येणारे निर्णय हे लोकहिताचे आणि निष्पक्षच असतात, याचा या राजकीय पक्षांना विसर पडला असल्याची खंत पाटील यांनी व्यक्त केली.

# औरंगजेबाच्या कबरी वरून महाभारत!


छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित चित्रपट ' छावा ' प्रदर्शित झाल्यापासून औरंगजेबाचा विषय पुर्नचर्चेत आलेला आहे.अन्यथा लोकांना याचेशी काहीही देणेघेणे नव्हते. क्रुरकर्मा ही एक मानसिक अपप्रवृत्ती आहे.मानसिक परिवर्तनानेच कुठलाही नरसंहार हा थांबवीता येत असतो. रामायणातील वाल्या कोळीचे मतपरिवर्तन नारदाने केल्याने तो वाल्याचा महर्षि वाल्मिकी झाला.त्याच्या हातून रामायणासारखे महाकाव्य रचल्या गेले.तसेच अंगुलिमाल डाकू भगवान बुद्धांच्या संपर्कात येताच त्यांचे मतपरिवर्तन केले गेल्याने ते संत बनले. सांगायचे तात्पर्य हेच की कुठल्याही जबरदस्तीने मत परिवर्तन हे होत नसते. त्यातल्या त्यात समाजाचे तर होने हे महान कठीण काम ठरते आहे. राजेरजवाड्यांच्या काळात हे शक्य होत असे.कारण ते स्वयंभू राजे होते.ते मनमानी पद्धतीने राज्य कारभार करू शकत होते.आज राजेशाही ही संपुर्णपणे नष्ट झालेली आहे.परंतु ती अपप्रवृत्ती, मानसिकता ही आजही अनेकांमध्ये पहायला मिळते आहे.यासाठीचे आज कायदे आहेत.तेंव्हा कायद्यानेच कुठलेही प्रश्न हे सोडवीले जाऊ शकतात. बळजबरीने करण्याचा प्रयत्न केला गेल्यास दंगेपसादला तोंड द्यावे लागते. यामुळे निष्पाप लोकांचा यात बळी जात असतो.संपत्तीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असते.ते भरून निघणारे नसते. नुकतीच नागपूर मध्ये महाल परिसरात घडलेली घटना याची साक्ष देते आहे.यामुळे पोलिस यंत्रणेवर विनाकारणचा ताण निर्माण होतो आहे. त्यांना नको ती दुषणे देऊन समाज मोकळा होतो आहे.दुषणे देणे सोपे काम असते.आक्रीत समाजाला रोखणे हे महाकठीण काम असते.जे पोलिसांना करावे लागते.ते ही स्वत:चा जीव धोक्यात घालून ! समाज दोन्ही बाजूने बोलण्यास मोकळा असतो.त्याचेवर कुठलेही बंधने नाहीत.

औरंगजेबाच्या कबरी वरून चालणारे राजकारण हे चुकीचेच वाटते आहे.त्या वेळेला जे कुणी राज्यकर्ते होते त्यांनी त्या त्या परिस्थितीत घेतलेला तो निर्णय होता.आज जर तो निर्णय आपल्या नीजी स्वार्थासाठी योग्य वाटत नसेल तर त्याकडे दुर्लक्ष केलेले बरे. ऐवढेच आपले हाती आहे.आपणं कुणी महाराजा लागून गेलेलो नाहीत ? की जे स्वतःचा निर्णय ठामपणे घेऊ शकतील. आणि त्या निर्णयाला कुणाचा विरोध करण्याची हिंमत होणार नाही. आज आपणं लोकशाही व्यवस्थेत वावरतो आहे.ब-याच जणांना तर औरंगाबादमध्ये औरंगजेबाची कबर आहे याची माहिती पणं नव्हती.ती छावा सिनेमा प्रदर्शित झाल्याने त्याचा उदो उदो केला गेल्याने थोड्याफार प्रमाणात लोकांना याची माहिती झाली.आज त्याचे चुकीचे राजकारण केले जात आहे. ही दुर्देवाची बाब ठरते आहे.यात समाजकंटक आपले हात धुवून घेत असतात.हे विसरून चालणार नाही.

अमेरिकेने पाकिस्तानमध्ये घुसून ओसामा बिन लादेनला,क्रुरकर्मा ला ठार केले होते.त्याचे उदात्तीकरण होऊ नये म्हणून त्याचा पुरावा नष्ट करण्यासाठी त्याचा मृतदेह समुद्रात टाकला गेला होता असे सांगितले जाते. 'न रहेगा बास, न रहेगी बासुरी' अशी भुमिका घेतली गेली होती.ती योग्य होती असेच म्हणावे लागेल.इतिहास हा इतिहास असतो त्याला जास्त महत्त्व देता कामा नये.आपणं वर्तमान काळात जगत असतो.तेंव्हा आपला काळ कसा चांगला जाईल याचा विचार व्हावा.जनतेचे कल्याण कसे साधले जाईल यावर विचार व्हायला हवा.छ.शिवाजी महाराजांच्या काळात कायद्याचे राज्य होते.आज तर कायदे खुलेपणाने पायदळी तुडवीले जात आहेत.यात राजकारणी लोक आघाडीवर आहेत.ते सामान्य लोकांवर अन्याय करून सत्ता,संपत्ती बळजबरीने प्राप्त करू इच्छित आहेत.जे चुकीचे चालले आहे.याचे वाईट परिणाम आज महाराष्ट्रातील बीडकरांना व जनतेला भोगावे लागते आहे. बीड तर आज चुकीच्या कामांसाठी कुप्रसिद्ध झालेले आहे. आज सगळीकडेच थोड्याफार प्रमाणात हीच परिस्थिती दिसून येत आहे.राज्यकर्ते हे मस्तवाल झाले आहेत. ते स्वतःला जनतेचे सेवक समजत नाहीत.तर राज्यकर्ते समजत आहेत. ते आलिशान गाडीतून फिरून,स्वतः सुरक्षित बंगल्याचा सहारा घेतात. स्वत:साठी सरकारी सुरक्षा मागून घेतात.यामुळे जनतेची सुरक्षा वा-यावर निघाली आहे. पोलिसांना राज्यकर्ते लोकांची सुरक्षा करण्यासाठी नेमले जात आहे.मग जनतेची सुरक्षा कोण करणार आहे ? असा प्रश्न यातून उपस्थित होतो आहे. आज संसदेत,विधानसभेत, कायदेमंडळात जनतेच्या समस्यांवर कुणीही बोलत नाहीत.निव्वळ स्मारकांच्या बांधकामावर बोलले जात आहे.लोकांनी,मतदारांनी पणं याचा विरोध केलेला आढळून येत नसल्याने शेतकऱ्यांच्या, कामगारांच्या, नागरिकांच्या समस्या जिथल्या तिथेच आहेत.सत्ताधारी,विरोधक नको त्या राजकारणात व्यस्त आहेत.ते समाजा समाजात वैरभाव निर्माण करून आपली सत्तेची फळे चाखत आहेत.तर सामान्य व गरीब जनता दैनीय अवस्थेत आजही जगत आहेत.यासाठी आता जनतेनेच राजकारणाची दिशा बदलण्यासाठी पाऊल उचलले पाहिजे.कारण हा देश जनतेचा आहे.कुणा राज्यकर्ते लोकांची ही मालमत्ता नाही.याची जाणीव राज्यकर्ते मंडळींना जनतेनेच करून दिली पाहिजे. त्यांच्या सर्व सुखसोयी, सुरक्षा, सुविधा या काढून घेतल्या पाहिजेत.तरच त्यांचे डोके ठिकाणावर येऊन ते खरे राज्यकर्ते साबीत होऊ शकतील असे वाटते आहे. याचा विचार जनतेने अवश्य करावा.

**मिलिंद गड्डमवार,**
**तह. राजुरा, जिल्हा चंद्रपूर**
**(सामाजिक कार्यकर्ते व मुक्त पत्रकार)**
**मो.क्र.९५११२१५२००**

# शब्दकोडे क्रमांक २०६५



**आडवे शब्द :-**
१) मोठे भांडण
४) माल साठवून चढ्या भावाने विक्री करणारा
७) विश्वासघातकी
११) भूतकाळ
१३) जंगलातील वाट
१४) अवधान, चित्त
१५) ** तलवार
१६) बांबू
१७) यज्ञ, यज्ञात टाकण्याची आहुति
१८) मनाला टोचणारे दुःख
१९) कोलाहल, मोठा कल्ला
२०) दर्पण
२१) उपकार
२२) घसा
२३) विश्रांती
२५) प्रतिदिनी
२७) घागरा
२९) विणकराचे उपजिविकेचे साधन
३१) कर्ज देणारा
३३) रात्री चमचमणारा किटक
३५) गर्दभ
३७) कृष्णसखी
३८) अमावस्या
४०) द्रव पदार्थ
४१) अंगातील जोम
४२) उगवत्या सूर्याचा देश
४३) पाठविलेला
४५) फक्त, केवळ
४६) शुभ, पवित्र
४८) वाकबगार
४९) स्तुती करणारा
५०) बारावी रास
५१) फळाचे साल
५३) अडकित्याने कातरले जाणारे फळ
५५) पाठीला आलेली वक्रता
५७) एक द्विदल धान्य
५८) कैवारी, रक्षणकर्ता
५९) भीती, जरब
६१) निकट
६४) कणीदार
६६) मीठ
६७) पातक
६८) छंद, मंजुळ आवाज
६९) पत्र
७१) सूर्य रवि
७२) लाकूड कापण्याचे साधन
७४) व्यापारातील फायदा
७५) कानोसा घेण्यासाठी कान ताठ करणे
७६) गोमाता

**उभे शब्द :-**
१) वाळा
२) अरण्य
३) गाणे
४) वर्ष, सन
५) मूर्ख
६) पिता
७) युद्धातील एक प्रेरणादायी घोषणा
८) राण्यांची राहण्याची जागा
९) खूप खाली
१०) रक्षण करणारे सशस्त्र सैनिक
१२) कचेरी
१५) निष्कारण उठाठेव करणारा, फाजील
१६) कलावंत
२०) करवत
२३) अजगर
२४) (स्फोटाचा) मोठा आवाज
२५) रो ह यो चे पूर्ण नाव
२६) कलेवर
२७) पंख
२८) टीमचा प्रमुख खेळाडू, कॅप्टन
३०) घड्याळाचा जागविणारा आवाज
३१) प्रामाणिक
३२) पूर्ण बदल
३४) दुर्गंधयुक्त
३६) मेघ, जलद
३८) राजपुत्र सलीमची प्रेयसी
३९) समाजाला प्रगतीवर नेणारा
४२) दुनिया
४४) वैताग, वायू
४७) लोकरीचा उबदार पट्टा
४९) किमती बहुमोल, अधिक जड
५२) गव्हाचे कणीदार पीठ
५४) गूळ, साखरेचा रस
५५) वसु, पितरांच्या नावाने सोडलेला खोंड
५६) अलमारी
५८) सुकविणे
६०) जपजाप्य
६२) चेहरा, मुख
६३) उंच सखल नसलेले
६५) दिवस
६७) एक चतुर्थांश
७०) सूक्ष्म अंश, अत्यल्प
७३) काढलेली सुट्टी

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



महासागर ●सोमवार,दि.२४ मार्च २०२५

अकोला पान 3

# महिलेच्या गर्भाशयातून निघाला साढे सोळा किलो वजनाचा गोळा

**अकोला :** स्थानीय तापडिया नगर परिसरातील डॉ स्त्रीरोग तज्ञ मुकेश राठी यांच्या रुग्णालयात पोटाचा त्रासअसलेल्या महिलेच्या गर्भाशयातून तब्बल १६ किलो वजनाचा गोळा काढण्याची अद्भुत शस्त्रक्रिया स्त्रीरोग तज्ञ डॉ मुकेश राठी यांनी नुकतीच पार पाडली. बत्तीस वर्षाची मूलबाळ नसणारी परभणी येथील ही महिला रुग्ण मागच्या दोन वर्षापासून पोटाच्या दुखण्याने दुखी होती. या संदर्भात तिने अनेक उपचार घेतले.मात्र दुखणे बरे होऊ शकले नाही. डॉ मुकेश राठी यांनी या रुग्ण महिलेच्या सर्व तपासण्या करून शस्त्रक्रियेची संपूर्ण जटीलता जाणून शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला.




अतिशय गुंतागुंतीची दोन तास चाललेली ही जटील शस्त्रक्रिया त्यांनी आपल्या हॉस्पिटलमध्ये पार पाडली. प्रस्तुत शस्त्रक्रियेत महिलेच्या गर्भाशयातुन साढे सोळा किलो वजनाचा गोळा काढण्यात आला.यात गर्भाशय ला वाचविण्यात आले. यामुळे ती आता आई बनून शकते. शस्त्रक्रिया नंतर अवघ्या सोळा तासात या महिला रुग्णाचे चालणे,फिरणे, खाणे, पिणे सुरू झाले. बिन टाक्याची बिना दुर्बिणी द्वारे गर्भाशयाची शस्त्रक्रिया करण्या साठी प्रसिद्ध असणारे डॉ मुकेश राठी यांना अशा शस्त्रक्रिया व एवढे मोठे ट्यूमर क्वचितच आढळले असून या ट्युमरचा आकार व वजन याची नोंदणी कोणत्या रेकॉर्ड बुक मध्ये होऊ शकते याची पडताळणे करावे लागणार असे सांगितले. एवढ्या मोठ्या आजारातून सुटका झाल्यामुळे या महिलेचे कुटुंब आनंद व्यक्त करीत आहेत.

# रेल्वेस्थानकाचा चेहरा-मोहरा बदलणार!

## खासदार अनुप धोत्रे यांचा निर्धार स्वयंचलित जिन प्रवाशांच्या सेवेत



■**अकोला,दि २३ (प्रतिनिधी)**

रेल्वेस्थानकावर प्लॅटफॉर्म १ ते ४ पर्यत स्वयंचलित जिना उपलब्ध करून दिला आहे. अकोला रेल्वेस्थानक भविष्यात आपला चेहरा-मोहरा बदलून उत्तम दर्जाचे रेल्वेस्थानक होणार असून, मध्य आणि दक्षिण रेल्वे स्टेशनच्या माध्यमातून विकास पर्व सुरू असल्याचे प्रतिपादन खा. अनुप धोत्रे यांनी केले. स्थानिक पोस्ट ऑफिसजवळील स्वयंचलित जिना व फलाट क्रमांक दोनवरील लिफ्ट व फलाट क्रमांक चार येथील उतरता स्वयंचलित जिना ३३ कोटी रुपयांच्या विविध चढता कामांच्या लोकार्पण प्रसंगी ते बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार रणधीर सावरकर हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून आमदार वसंत खंडेलवाल, किशोर पाटील, जयंत मसने, विजय अग्रवाल, वसंत बाछुका, उन्मेष माने, सुभाषसिंह ठाकूर, रेल्वे कमर्शियल अधिकारी रावत, सहायक अधिकारी गिते, स्टेशन मास्तर कवडे, वसू, खान, गाडगे, राजेंद्र नेरकर, अनिता चौधरी, सारिका जैस्वाल, राजेंद्र गिरी, आरती घोगलिया, सुमन गावंडे, माधव मानकर, संजय गोटफोडे, देवाशिष काकड, संतोष पांडे, दिलीप मिश्रा, डॉ. किशोर मालोकार, पवन महल्ले, संदीप गावंडे, विवेक भरणे, रमेश करिहार, गणेश अंधारे, नीलेश निनोरे, प्रशांत अवचार आदी प्रामुख्याने उपस्थित होते. स्वयंचलित जिन्यामुळे रेल्वे प्रवाशांना सुविधा उपलब्ध होणार आहेत. याचा वापर योग्य रीतीने नागरिकांनी करावा, अशी विनंती आमदार रणधीर सावरकर यांनी केली. यावेळी आमदार वसंत खंडेलवाल यांनी महायुती सरकार दळणवळण तसेच सर्व क्षेत्राचा विकास करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गिरीश जोशी, संचालन देवाशिष काकड, तर आभार प्रदर्शन माधव मानकर यांनी केले.

# लग्नाच्या वरातीच्या ट्रकची उभ्या ट्रकला धडक; नवरीसह २० जखमी



■**अकोला,दि २३ (प्रतिनिधी):**

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वरील व्याळा जवळ लग्नाच्या वरातीच्या ट्रकचा भीषण अपघात झाला. वरात घेऊन जाणाऱ्या ट्रकने एका उभ्या ट्रकला मागून जोरदार धडक दिल्याने हा अपघात घडला असल्याचे समजते. ही घटना रविवारी सकाळी घडली.प्राप्त प्राथमिक माहितीनूसार, ही वरात यवतमाळ जिल्ह्यातील डोकी येथून चाळीसगाव येथे जात होती. ट्रक चालकाचे नियंत्रण सुटल्याने हा अपघात घडल्याची समोर येत आहे. या दुर्घटनेत नवरीसह तिच्या कुटुंबातील १५ ते २० जण गंभीर जखमी झाले असून, काहींना किरकोळ दुखापत झाली आहे.अपघाताची माहिती मिळताच १०८ रुग्णवाहिकांच्या मदतीने जखमींना अकोला येथील सवीपचार रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास बाळापूर पोलीस करत आहेत.

# घरांवरील क्यूआर काय पाहायला लावले का

■**अकोला,दि २३ (प्रतिनिधी):**

केंद्र सरकारच्या योजना फफेल करण्यासाठी अकोल्यात पाठविल्या जात असल्याची चर्चा आहे. क्यु आर कोडच्या माध्यमातून कचरा संकलन ही संकल्पना राबविण्यात येत असल्याचा देखावा निर्माण केला गेला आहे. जनतेच्या करांची लुट महापालिकेत सुरु असल्याची ओरड आहे.केंद्र सरकारने स्वच्छ भारत अभियानांतर्गत घरोघरी कचरा संकलन नियमितपणे करता यावे,यासाठी घरांवर क्यू आर कोडबसवण्याचा उपक्रम राबवण्याचानिर्णय घेतला. घरोघरी 'क्यूआर कोड' लावण्यात आले. परंतुतांत्रिक बाबींमुळे ही यंत्रणा अकोला शहरात दीड वर्षांनंतरही सुरु झाली नाही. घंटागाडी दररोज येत नाही, कचरा नियमित उचलला जात नाही अशा तक्रारींमुळे घंटा गाड्यांवर लक्ष ठेवण्यासाठी घरोघरी 'क्यूआर कोड' लावण्यात आले होते. कचरा उचलणाऱ्या घंटा गाडीचालक किंवा मदतनिसांना घराबाहेर लावलेला क्यूआर कोड स्कॅन करणे बंधनकारक करण्यात आले होते. जेणेकरुन क्यूआर कोडच्या माध्यमातूनच या गाड्यांवर नियंत्रण ठेवता येईल, असा उद्देश या उपक्रमाचा होता. इंडियन टेलिफ्रोन इंडस्ट्रीज आयटीसी या कंपनीसोबत केलेल्या करारानुसार ही सिस्टिम शहरात सुरू करण्यासाठी लाखोंचा खर्च करण्यात आला. शहरातील सुमारे १ लाख ४० हजार घरांना क्यूआर कोड स्टिकर लावण्यात आले. मात्र, या उपक्रमाचा बोजवारा उडाल्याचे चित्र आहे. कचरा संकलन करण्यासाठी आलेल्या घंटा गाडी चालकाकडून क्यू आर कोड स्कॅनच केले जात नाहीत. केवळ घरांवर कोड. लावण्यात आले असून, तांत्रिक त्रुटींमुळे ते स्कॅन होत नसल्याचे वास्तव आहे.

## मालवाहतूक कागी एसटी बसच्या आगीवर तात्काळ नियंत्रण

■**अकोला,दि २३ (प्रतिनिधी):**

मध्यवती बसस्थानक परिसरात उभी असलेली मालवाहतूक कागी एसटी बसमधून धूर निघत असल्याचे लक्षात येताचतात्काळ पाण्याचा मारा करुन किरकोळ प्रमाणात लागलेली आग वाचविण्यात एसटी कर्मचाऱ्यांना यश आले. शनिवारी दुपारच्या सुमारास मध्यवती बसस्थानकाच्या मालवाहतूक कागी ८६९९ क्रमांकाच्या बसच्या खालच्या भागातून धूर निघत असल्याचे बसस्थानकातील एसटीचे अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निर्देशनास आले.

# इनकम टॅक्स चौकातील न्यु शर्मा ब्रदर्स सायकल व फिटनेस सामान विक्रीचे दुकानामध्ये धाड; १.१५ कोटी रुपये जप्त

■**अकोला,दि २३ (प्रतिनिधी):**

खदान पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरुन त्यांनी इनकम टॅक्स चौकातील न्यु शर्मा ब्रदर्स सायकल व फिटनेस सामान विक्री चे दुकानामध्ये धाड टाकली. तिथे कॅश स्वरुपात एक कोटी पंधरा लाखांची रोकड मिळाली आहे. चलनामधील नगदी रोख रक्कम अवैधरित्या आणुन ठेवलेली आहे अशा खात्री लायक माहिती खदान पौलिसांना मिळाली होती.

या माहितीच्या आधारे पोलिसांनी सर्च केला असता न्यू शर्मा ब्रदर्स सायकल व फिटनेस शॉप मध्ये एक कोटी पंधरा लाखांची रोकड प्राप्त झाली आहे. दुकानामध्ये पोलिसांनी छापा




कार्यवाही केली असता दुकानामध्ये कॉउंटर जवळ दिपक दिनकर घुगे जवळ दोन पांढ-या रंगाचे कापडी थैल्यामध्ये भारतीय चलनातील १ करोड १५ लाख रूपये मिळुन आल्याने नमुद इसमास सदर रकमेच्या मालकी हक्काचे कुठले ही पुरावे मिळाले नाहीत. घटनास्थळी पंचा समक्ष जप्त करून कायदेशीर कार्यवाही करण्यात आली. असुन सदर रक्कमे बाबतची माहिती मुख्य आयुक्त आयकर विभाग नागपुर यांना देण्यात आली.

## थोडक्यात

### सी.सी.आय कापूस खरेदीची मुदत वाढवावी



**अकोट :** भारतीय कापूस निगम द्वारा तडकाफडकी कापूस खरेदी बंद झाल्याने कापूस उत्पादक अडचणीत सापडला आहेशेतक-यांचा कापूस शेवटच्या बोंडा पर्यत खरेदी करु असे शासनाने आश्वासन दिले असतांना सी सी आय ने कापूस खरेदी गुंडाळली आहे.अद्याप २० ते २५,%कापूस शेतक-याचा कापूस घरीच आहे.मार्च अखेरीस भाव वाढतील या आशेवर कापूस राखून ठेवलेले कआस्तकआरआंचई मात्र निराशा झाली.भाव तर वाढलेत नाहीत उलट ते कमी झाले यातच सी सी आय खरेदी बंद झाल्याने खुल्या बाजारात ते पुन्हा कमी होतील अशी भिती व्यक्त केली जात असून सी सी आय द्वारे कापूस खरेदीची मुदत १५ एप्रिल पर्यत वाढविण्यात यावी अशी जोरदार मागणी कापूस उत्पादक शेतक-यानी केली आहे.

### नवोदय फाउंडेशनचा जागतिक जल दिन साजरा

**अकोला:** ग्रामीण विकासासाठी सेवारत असणाऱ्या जिल्हयातील नवोदय ग्रामीण विकास संस्था, सांगवी मोहाडी यांच्या वतीने सांगवी मोहाडी येथे जागतिक जल दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात पाणी संवर्धन, जलसंधारण व जल व्यवस्थापनावर सखोल चर्चा झाली. जल संकटाच्या पार्श्वभूमीवर पाण्याच्या शाश्वत वापराबाबत जनजागृती निर्माण करणे आणि जलसंवर्धनाचे महत्त्व लोकांपर्यंत पोहोचवणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा युवा अधिकारी महेशसिंह शेखावत होते तर उद्घाटक म्हणून माजी कृषी अधिकारी मोहने होते. प्रमुख पाहुणे म्हणून एफपीसी चे चेअरमन जगदीश मुरुमकर, सुमित्राताई अंधारे कृषी महाविद्याल याचे अध्यक्ष कृष्णाभाऊ अंधारे, ग्रामीण विकास, सामाजिक लेखा परीक्षक व सल्लागार, मंत्रालय मुंबईचे प्रविण इंगळे, वन अधिकारी थोरात, डॉ. के.डी. घरडे, कृषी विद्यापीठाच्या एसडबूसीई विभागाचे डॉ. यत्नेथ बिसेन, भारतीय वृक्ष क्रांतीचे संस्थापक नाथन आदी मान्यवर उपस्थित होते.

### आमदार नितीन देशमुख यांची सांत्वनपर भेट!

**वाडेगाव:** येथील पत्रकार डॉ. शेख चांद यांच्या कुटुंबीयांची आमदार नितीन देशमुख यांनी सांत्वना भेट घेतली. माजी ग्रामपंचायत सदस्य शेख नजरु शेख बशीर यांचे नुकतेच हृदय विकाराच्या झटक्याने निधन झाले. त्या पार्श्वभूमीवर आमदार नितीन देशमुख यांनी भेट घेऊन कुटुंबातील सदस्यांकडून माहिती घेतली.

# पक्षांचे संवर्धन काळाची गरज : मनोज केदारे

■**अकोला,दि २३ (प्रतिनिधी):**

निसर्गाचा समतोल राखणे साठी पशू पक्षांचे संवर्धन करणे काळाची गरज आहे. दिवसेंदिवस पक्षांची संख्या कमी होत आहे. असे खदान पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मनोज केदारे यांनी सांगितले.चिमणी दिवसानिमित्य शिवतेज प्रतिष्ठान तफर्फे पक्षांकरिता पाणीपात्र योगसाधकांना वाटप कार्यक्रम नेहरू पार्क येथे आयोजीत करण्यात आला होता. त्या निमीत्य केदारे साहेब बोलत होते. शिवतेज प्रतिष्ठान जनतेचे शारीरीक व मानसीक आरोग्य चांगले ठेवण्याचे कार्य करित असल्यामुळे प्रतिष्ठानचे कौतूक केले.

योगगुरू मनोहर इंगळे यांनी स्व.चंद्रभागा इंगळे यांचे स्मृत्यर्थ पाणीपात्र वाटप करण्यात येत असून प्रतिष्ठानच्या कार्याचा आढावा



घेतला. कार्यक्रमास बंशलोचण मिश्रा, राम प्रकाश मिश्रा, अनुराधा करण्यात इंगळे या सर्वांचे हस्ते पाणीपात्र वाटप आले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी जसवंतसिंग मली, ॲड. वामन चौधरी, गजानन इंगळे, पुरुषोत्तम गुप्ता, शिवतेज इंगळे, अतूल पळसपगार, संजय मनतकार तसेच अनुराधा इंगळे, वंदना तायडे, अर्चना माने, अरूणा धुमाळे यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. गोविंद जाधव यांनी तर आभार बाळासाहेब काळे यांनी मानले.

# नऊ लाख साठ हजार रुपयांच्या दुचाकी चोरी प्रकरणात आरोपीला जामीन

■**अकोला,दि २३ (प्रतिनिधी):**

सिव्हिल लाईन पोलीस ठाण्याच्या हद्दीत तब्बल बारा दुचाकी चोरी प्रकरण उघडकीस आले असून, त्या दुचाकींची एकूण किंमत अंदाजे ९ लाख ६० हजार रुपये आहे. या गंभीर गुन्ह्याच्या आरोपाखाली प्रतीक एकनाथ बसू, प्रथमेश संजय सरोदे आणि मेहुल सुरेश जाधव यांना पोलिसांनी अटक केली होती. सदर प्रकरणात मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयाने तिघांच्या जामीन अर्जास नकार दिला होता. त्यानंतर आरोपी प्रथमेश संजय सरोदे यांच्यावतीने त्यांचे अधिवक्ता सुमित महेश बजाज यांच्या माफर्फत अकोला जिल्हा व सत्र न्यायालयात जामीन अर्ज दाखल करण्यात आला.पोलिसांनी या अर्जास तीव्र



विरोध नोंदवला. मात्र, अधिवक्ता सुमित बजाज यांनी प्रभावी युक्तिवाद सादर करत आरोपीची बाजू सक्षमपणे मांडली. अखेर, जिल्हा व सत्र न्यायाधीश पहाडे मॅडम यांनी आरोपी प्रथमेश संजय सरोदे यांचा जामीन मंजूर केला. या प्रकरणात अधिवक्ता वर्षा सदार व अधिवक्ता मोनिका श्रीराम यांनी देखील महत्त्वपूर्ण सहकार्य केले.

# मराठा महासंघाचे वतीने अण्णासाहेब पाटील यांना अभिवादन

■**अकोला,दि २३ (प्रतिनिधी):**

अखिल भारतीय मराठा महासंघ जिल्हा शाखा अकोला च्या वतीने जिल्हा कार्यालय अकोला येथे मराठा महासंघाचे संस्थापक कै. आमदार अण्णासाहेब साहेब पाटील यांना अभिवादन करण्यात आले .कार्यक्रमाचे सुरुवातीला मराठा महासंघाचे विदर्भ प्रदेश उपाध्यक्ष श्री राम मुळे, जिल्हाध्यक्ष सुरेश ठाकरे, महिला जिल्हाध्यक्ष सुनीताताई ताथोड यांचे हस्ते यांचे अण्णासाहेब पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येऊन पुष्पहार अर्पण करण्यात आले.तसेच उपस्थित सर्व मान्यवरांनी अण्णा साहेबांच्या प्रतिमेचे पूजन करून आदरांजली वाहिली. स्वगीय अण्णासाहेब पाटील यांनी मराठा महासंघाची स्थापना केल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात झंजावात निर्माण केला व मराठ्यांची बलाढ्य संघटना उभी करून आपल्या कार्याचा ठसा उमटविला व शासन दरबारी दब दबा निर्माण केला तसेच कामगारांना त्यांचे हक्क मिळवून



देऊन त्यांच्या मुलाबाळाकरिता शाळा निर्माण केल्या. व कामगारांचे जीवनमान उंचविण्याकरिता अनेक योजना राबविल्या तसेच ह्या प्रसंगी जिल्हाध्यक्ष सुरेश ठाकरे,महिला जिल्हाध्यक्ष, सुनीताताई ताथोड,भुजंगराव देशमुख यांनी अण्णासाहेब पाटील यांच्या कार्याविषयी माहिती विशद केली. याप्रसंगी मराठा महासंघाचे जिल्हा सरचिटणीस ॲड. अमोल सूर्यवंशी, युवक कार्याध्यक्ष आदेश अंधारे, अकोला शहर महिला अध्यक्ष अलकाताई देशमुख श्रीमती ,सविताताई शेळके, सौ. सुनीताताई देशमुख, सौ ज्योती भांबेरे, ॲड. प्रवीण महल्ले, दिलीपराव दिलीपराव देशमुख, डॉ. शशिकांत पवार,विनायकराव गायकवाड, रामरावजी बाजड, काशिनाथ तिकोडे, कृष्णराव बावणेर, संजय जाधव ,निळकंठ गांगर्डे, प्रितेश घाटोळ ,राजेश भाऊ सटाले ,आदित्य भगत रामभाऊ पटोकार आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन श्रीमती सविताताई शेळके,प्रस्ताविक जिल्हाध्यक्ष सुरेश ठाकरे,यांनी तर आभार प्रदर्शन एड. अमोल सूर्यवंशी यांनी केले.

# कै.आ.अण्णासाहेब पाटील यांची पुण्यतिथी अखिल भारतीय मराठा महासंघातर्फे अभिवादन



■**अकोला,दि २३ (प्रतिनिधी):**

अखिल भारतीय मराठा महासंघ अकोला जिल्हा महानगर व युवक शाखेतर्फे मराठा आरक्षणसाठी आपल्या आमदारकीचाही राजीनामा देणारे व मराठा समाजासाठी बलिदान देणारे क्रांती सुर्य माथाडी कामगरांचे आराध्य दैवत अ.भा.मराठा महासंघाचे संस्थापक अध्यक्ष कै. आ. अण्णासाहेब पाटील यांच्या पुण्यतिथी निमित्त आज मराठा महासंघाच्या विभागीय कार्यालयात त्यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी अण्णासाहेब पाटील अमर रहे, अमर रहे अशा गगनभेदी घोषणा देण्यात आल्या.याप्रसंगी महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष विनायकराव पवार विभागीय अध्यक्ष कृष्णा अंधारे, उपाध्यक्ष योगेश थोरात महिला विभागीय उपाध्यक्ष सौ कल्पनाताई बिडवे, उपाध्यक्ष माधुरीताई वाघमारे, जिल्हाध्यक्ष संजय सूर्यवंशी महानगर अध्यक्ष श्रीकांत सरोदे, क्रीडा विभाग जिल्हाध्यक्ष राजेश पाटील,युवक जिल्हाध्यक्ष शंतनु वसू, उपाध्यक्ष प्रतीक खराडे आदि उपस्थित होते.

# अखंड भगवंत भक्ती हीच संतांची क्रांती: हभप अनिल महाराज पाटील

## आज कीर्तन महोत्सवाची पूर्णाहुती

■**अकोला,दि २३ (प्रतिनिधी):**

अनंत काळापासूनची भगवंत प्राप्तीची भूक नष्ट व्हावी, नाम जप साधनेने भगवंत प्राप्त व्हावेत, स्वप्नात का होईना भगवंताचे दर्शन व्हावे. ही अभिलाषा अनेकांची असते. मात्र असे होत नाही.जे कुणाला शक्य नसते, ते मात्र संतांना शक्य असते. संतांनाच प्रभूकृपा का होते? तर संत हे जे शक्य नसते अशी अशक्य बाब जगाच्या कल्याणासाठी करतात.अशी आध्यात्मिक क्रांती संत करतात. म्हणूनच भगवंत त्यांना दर्शन देतात.भगवंताच्या अखंड नाम साधनेने हे शक्य होत असल्याचा हितोपदेश हभप अनिल महाराज पाटील शास्त्री यांनी केला.श्री संत जगद्गुरु तुकाराम महाराज बिजोत्सव सेवा समिती, गायत्री नगर, कौलखेड च्या वतीने गायत्री नगरच्या प्रांगणात सुरू असलेल्या किर्तन महोत्सवात बार्शी येथील कीर्तनकार हभप अनिल महाराज पाटील यांनी कीर्तनाचे सातवे पुष्प सादर केले. त्यांनी या सत्रात 'न लगे मरावे।ऐसा ठाव दिला दिला देवे।माझ्या उपकारासाठी।वागविला म्हणू कंठी।'या संत तुकाराम महाराजांच्या भक्तीसाठी नाम



कृपेची महीमा असलेल्या अभंगावर आपले कीर्तन सादर केले. ते म्हणाले,संतांच्या जीवनातील क्रांती ही विश्व कल्याणासाठी असते. क्रांती करणे ही जगात कोणाला ही शक्य आहे.जे काही ठरविल्यावर अवघड मात्र निश्चितच कोणतेही काम नाही. तुकोबा म्हणतात, जर ठरवले तर देव ही भेटू शकतो. आधी ठरवण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.प्रत्येक क्षेत्रात मनुष्य यशस्वी होऊ शकतो. मात्र प्रथम त्याने ठरविले पाहिजे. सर्वांची भावना असते की प्रत्येक क्षेत्रात आपले वर्चस्व व आपण चिरंजीवी राहिलो पाहिजे. मरण हे कोणालाच आवडत नाही.मात्र आपले आयुष्य संपते व काम शिल्लक राहते. मात्र काम संपलेले व आयुष्य शिल्लक राहणारा व्यक्ती हा संतासमान असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.अगदी मरणापर्यत जीवनात काम शिल्लक राहिले अशी ओरड होत असते. आपले काम संपले आपण निवांत आहोत असे मात्र कोणीच म्हणत नाही. प्रत्येक क्षेत्रात माणसाचा धबधबा असू शकतो. मात्र एक क्षेत्र असे आहे की त्यात त्याचे काही चालत नाही. ते क्षेत्र म्हणजे मरण होय! मग सत्ता असो, संपत्ती असो,वैभव असो, मरण हे प्रत्येकाला लागलेले आहे.,मरणाच्या वाटेत भ्रष्टाचार चालत नाही. तेथे विद्वत्ता,बुद्धिमत्ता काही ही चालू शकत नाही.मात्र तुकोबारायांचे म्हणणे असे की संतांना मरण हे नसतेच मुळी.मरणाला संत हे अपवाद असतात. तुकोबाराय हे सदैव देहासहित वैकुंठाला गेले. आपला जन्म झाला नाही तर मरण कुठून येणार असे तुकोबाराय म्हणतात. महाराज म्हणतात हे शरीर सोडावे लागत नाही तर मरावे कुठून? आम्ही शरीर धरलेच नाही तर सोडावे कसे लागणार? हा प्रश्नच उद्भवत नसल्याचे तुकोबाराय या अभंगात म्हणतात. हे शरीर ज्याचे आहे त्याला दिले तर त्यात वाईट काय ?देवाने आम्हाला अशी जागा दिली आहे त्यामुळे आम्हास मरावे लागत नसल्याचे तुकोबाराय आपल्या अभंगात सांगीत असल्याचे हभप अनिल महाराज पाटील यांनी अनेक दृष्टांत देऊन आपल्या अभंगाच्या माध्यमातून यावेळी सांगितले. ते म्हणाले, संताच्या कंठात सदा भगवंत असतो. रात्रंदिवस सत्संग व भक्ती करणाऱ्याला मरण हे नसतेच मुळी!म्हणून मरणाची तमा न बाळगता भगवंताचे नामस्मरण करून या जीवनात सत्कार्य, सत्कर्म करीत राहणे हीच या जीवनाची फलश्रुती असल्याचा हितोपदेश त्यांनी या सत्रात केला.सत्रात सर्वप्रथम हभप अनिल महाराज पाटील यांचे आ.अमोल मिटकरी व अन्य मान्यवरांनी स्वागत केले. या कीर्तन महोत्सवाची सोमवार दि २४ रोजी सायं ५ वाजता परिसरात गाथा दिंडी होऊन साय ७ वाजता इलोरा येथील हभप तुकाराम महाराज सखारामपूरकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने समाप्ती होणार आहे.या कीर्तन महोत्सवात समस्त महिला पुरूषांनी मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आवाहन श्री संत जगद्गुरु तुकाराम महाराज बीजोत्सव सेवा समिती केले.

# मंदिरे, धार्मिक स्थळांचे घुमट गोलाकार का?



आपण अनेक मंदिरांना किंवा मशिदींनी भेट देतो. त्या वेळी लक्षात येते, की धार्मिक स्थळांचे छत नेहमी घुमटाच्या आकाराचे म्हणजे गोलाकार असते. उत्तर भारत असो वा दक्षिण भारत; संस्कृती वेगवेगळ्या असल्या तरी मंदिरांच्या छताच्या बाबतीत सर्वत्र एकवाक्यता दिसते.

**मंदिरातील छताचा भाग पूर्णपणे गोलाकार** असण्यामागे भारतातील वातावरणाचा संबंध असला तरी त्याबरोबरीने इतरही गोष्टींचा संदर्भ आहे. अनेक लोक याचा संबंध धर्माशी जोडतात. एक प्रकारे ते योग्यच आहे. मात्र यामागे धर्म, विज्ञान आणि वास्तुशास्त्र अशी तीनही कारणे आहेत.

**※ मंदिरामध्ये सकारात्मक उर्जा**

मंदिरात जातो तेव्हा आपल्याला एक प्रकारची मानसिक शांतता मिळते. मंदिरात घंटा वाजली किंवा कितीही आवाज आला तरी गोंगाटातही एक प्रकारची शांतता असल्याचा भास निर्माण होतो. यामागे विज्ञान आहे. खरे तर, मंदिरात घंटा वाजवली जाते किंवा मंत्रोच्चार केला जातो तेव्हा घुमटाकार छतामुळे आवाज मंदिरात पसरतो. त्या आवाजामुळे एक प्रकारचे कंपन निर्माण होते. तेव्हा घुमटाकार छताचा वापर भक्तांना ध्यान आणि उपासनेत गुंतवून ठेवण्यासाठी करण्यात येतो, हे समजून घेतले पाहिजे. म्हणजेच या आकाराच्या छतामुळे मंदिरात सकारात्मक ऊर्जा राहते. छतावरील घुमटाचा आकार ही ऊर्जा सर्वत्र पसरविण्यास मदत करतो.

**※ तापमानही संतुलित राहते**

मंदिर किंवा मशिदीत गेल्यावर तेथील तापमान संतुलित असल्याचे जाणवते. बाहेरचे तापमान कितीही गरम किंवा थंड असले तरी मंदिरात प्रवेश केल्यावर तापमान सामान्य होते. घुमटाकार छत असण्यामागे एकदेखील एक शास्त्र आहे. घुमटाकार छत मंदिरातील हवेचा प्रवाह नियंत्रित करत असल्यामुळे आतले तापमान संतुलित राहते. या कारणास्तव, मंदिर उन्हाळ्यातही थंड राहते आणि बाहेर थंडी असते तेव्हाही मंदिरातील तापमान सामान्य असते.

## कॅलिडोस्कोप



# तिची अफाट स्मरणशक्ती

उत्तर कोरिया या देशातल्या पांग उन सिम नावाच्या तरुणीने आपल्या अचाट बुद्धिमत्तेने अनेकांना थक्क केले. ही मुलगी फक्त १८ सेकंदांमध्ये पाच हजारपेक्षा अधिक आकडे लक्षात ठेवते. इतकंच नाही तर एक मिनिटापेक्षा कमी वेळात पत्याच्या कॅटचा क्रम लक्षात ठेऊन पुन्हा त्याच क्रमाने पत्ते लावते. उत्तर कोरियाने पहिल्यांदाच 'वर्ल्ड मेमरी चॅम्पियनशीप' स्पर्धेत सहभाग घेतला असता त्यावेळी पांगनेच देशाचं प्रतिनिधित्व केलं होतं. कोरियाच्या संघाने त्यावेळी सात सुवर्ण, सात रौप्य आणि पाच कांस्य पदकं पटकावली होती. स्मरणशक्ती सुधारणं वाटतं तितकं कठीण नाही. निर्धार आणि निश्चयाच्या बळावर आपण पुढे जाऊ शकतो, असं पांग सांगते. उत्तर कोरियामध्ये गोष्टी लक्षात ठेवण्याचं तंत्र शाळेत असल्यापासूनच शिकवलं जातं. या मुळे इथल्या लोकांची स्मरणशक्ती चांगली असते. अर्थात तंत्र शिकवलं जात असलं तरी उपजत बुद्धिमत्ता असणंही गरजेचं असतं. त्यामुळे पांगची ही अचाट बुद्धिमत्ता थक्क करून सोडते.

# कोंबड्या भाड्याने मिळतील



अमेरिकेत अंडी प्रचंड महाग झाली आहेत. ती खरेदी करणाऱ्या सर्वसामान्यांचा खिसा मोठ्या प्रमाणावर कापला जात आहे. परिणामी अनेकांनी आपल्या रोजच्या आहारातून अंडी बाद केली आहेत. मात्र या संकटावर मात करण्यासाठी तेथे नवीनच कल्पना काढण्यात आली आहे. आता तेथे काहींनी चक्क कोंबड्या भाड्याने देण्याचा व्यवसाय सुरू केला आहे. त्याला चांगला प्रतिसादसुद्धा मिळत आहे.

**'रेंट द चिकन' सेवा**

न्यू हॅम्पशायर येथील गॉफस्टाउन राहणारे क्रिस्टीन आणि ब्रायन टेम्पलटन यांनी अंड्याच्या समस्येवर एक अनोखा उपाय शोधला आहे. त्यांनी ही अनोखी 'रेंट द चिकन' सेवा सुरू केली आहे. या सेवेअंतर्गत लोक कोंबडी भाड्याने घेऊ शकतात आणि ताजी अंडी त्यांना घरात मिळू शकतात.

**अंड्यांच्या किंमती का वाढल्या?**

अमेरिकेत अंड्यांच्या किंमती वाढण्याचे सर्वात मोठे कारण 'बर्ड फ्लू' हे आहे. या आजारामुळे लाखो कोंबड्या माराव्या लागल्या तसेच कोंबड्यांचे खाद्य आणि विक्री प्रक्रियेतही अडचणी निर्माण असल्यामुळे अंडी महाग होतात. सध्याही हेच कारण बघायला मिळते आहे. अमेरिकेच्या अनेक राज्यांमध्ये अंड्यांच्या किंमती दुप्पट झाल्या आहेत.

**इतके भाडे**

अंड्यांच्या वाढत्या किंमतीवर क्रिस्टीन आणि ब्रायन टेम्पलटन यांनी पर्याय निर्माण केला आहे. त्यांची 'रेंट द चिकन' सेवा वेगाने लोकप्रिय होत आहे. या सेवेनुसार सहा महिन्यांसाठी कोंबडी भाड्याने घेता येते. या कालावधीत दोन कोंबड्या मिळतात. सोबत कोंबड्यांना लागणारे खाद्य आणि तिचे संगोपन कसे करावे? त्याची माहिती दिली जाते. त्यासाठी जवळपास ६०० अमेरिकी डॉलर (जवळपास ४७,६८८ रुपये) भाडे आकारले जात आहे. भाड्याने घेतलेल्या दोन कोंबड्या दर आठवड्यास एक डझन अंडी देतात. त्यामुळे बाजारातून महाग आणि असुरक्षित अंडी घेण्यापेक्षा अशी घरात मिळणारी अंडी खाणे लोकांसाठी फायदेशीर ठरत आहे. बरेच भाडेकरू कोंबड्यांशी इतके जोडले जातात, की सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर ते कोंबड्या परत करण्याऐवजी विकत घेऊन टाकतात. या सेवेमुळे लोकांची महाग अंड्याची समस्या सुटली आहे.

# कपडे उतरवले, तरच मिळेल बीचवर एन्ट्री!

समुद्र किनारा सर्वांच्या आकर्षणाचा विषय असतो. जगभरातील लाखो पर्यटक दरवर्षी वेगवेगळ्या समुद्र किनाऱ्यांना भेट देत असतात. तेथील लाटांचा आनंद घेताना वातावरणाशी एकरूप होऊन जात असतात. मात्र अनेक समुद्र किनाऱ्यांवर पर्यटकांसाठी वेगवेगळे नियम आहेत. काही समुद्र किनाऱ्यांवर पर्यटकांनी आपल्या अंगातील कपडे काढू नयेत असा नियम आहे तर काही समुद्र किनाऱ्यांवर पर्यटकांनी अंगातील कपडे काढून समुद्रात अंघोळीचा आनंद घेतला तरी चालत. मात्र जर्मनीमधील काही खास समुद्र किनाऱ्यांना भेटी द्याल तर तुम्हाला अश्चर्याचा धक्का बसू शकतो. कारण इथे तुम्ही जास्त कपडे घातले असतील तर बाहेरचा रस्ता दाखवला जातो. तुम्हाला बीचवर एन्ट्रीच मिळत नाही. बीचवर जायचे असेल तर आधी सर्व कपडे काढावे लागतात. मगच तिथे प्रवेश मिळतो.

'फर्स्टपोस्ट' च्या एका रिपोर्टनुसार उत्तर जर्मनीच्या काही समुद्र किनाऱ्यांसाठी नवा नियम लागू करण्यात आला आहे. हे समुद्र किनारे निसर्गावर विश्वास ठेवणाऱ्या आणि निसर्गाने आपल्याला दिलेल्या गोष्टींचा मनापासून स्वीकार करणाऱ्या लोकांमध्ये लोकप्रिय आहेत. जर्मनीच्या बाल्टिक समुद्राचा भाग असणाऱ्या रॉस्टॉक समुद्र किनाऱ्यावर एक विचित्र नियम बनवण्यात आला आहे. त्यासाठी रोस्टॉक टूरिझम ऑथोरेटीकडून एक २३ पानांची नियमावलीच तयार करण्यात आली आहे. त्यानुसार तुम्ही कपडे घातलेले असतील तर या समुद्र किनाऱ्यावर एन्ट्री दिली जात नाही.

कपडे घालून समुद्रात अंघोळ करणे किंवा उन्हाचा आनंद घेणे यास या समुद्र किनाऱ्यावर मनाई आहे. हा नियम बनवण्यात आला आहे कारण पूर्वी या समुद्र किनाऱ्यावर काही जण कपडे परिधान करून पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी यायचे तर काही जण कपडे न घालताच समुद्र किनाऱ्यावर यायचे. मात्र कपडे घातलेले लोक विवस्त्र वा तोकडे कपडे घालणाऱ्यांबद्दल तक्रार करायचे. अशा प्रकारच्या तक्रारी वाढल्याने शेवटी आता इथे सर्व पर्यटकांसाठी एकच नियम लागू करण्यात आला आहे.



# बर्फात बसणे भावते

आपल्याला बर्फाचा तुकडा हातात घ्यायलाही नको वाटतं. अशा परिस्थितीत बर्फाने भरलेल्या पेटीत बसणं ही अशक्य कोटीतली बाब म्हणायला हवी. मात्र ऑस्ट्रियातल्या एका माणसाने अशक्य ते शक्य करून दाखवलं आहे. जोसेफ कोएबर्ग असं या माणसाचं नाव. तो ॲथलिट आहे. जोसेफ बर्फाने भरलेल्या पारदर्शक पेटीत जवळपास दोन तास बसला. यामुळे त्याने विश्वविक्रमच केला आहे. ऑस्ट्रियाची राजधानी व्हिएन्नामध्ये हा विक्रम नोंदवण्यात आला होता. जोसेफने बर्फाने भरलेल्या पेटीत दोन तास आठ मिनिटं आणि ४७ सेकंद घालवली. जोसेफ पेटीत बसल्यानंतर त्याच्या खांद्यांपर्यंत बर्फ भरण्यात आला. यावेळी त्याने फक्त स्वीम सूट घातला होता. अशा थंडगार वातावरणात काही सेकंद घालवल्यानंतर हुडहुडी भरू लागते. आपण पार गारठून जातो. मात्र जोसेफ तब्बल दोन तास तिथे होता. या आधी चिनी ॲथलिट जिन सोंगहाओने बर्फात बसण्याचा विक्रम केला होता. त्याचा हा विक्रम जोसेफने मोडला. या पेटीतून बाहेर आल्यानंतर डॉक्टरांनी जोसेफला तपासलं. त्यावेळी तो एकदम तंदुरूस्त होता. एवढा वेळ बर्फात बसून रहाणाऱ्या जोसेफच्या धाडसाचं कौतुक संपूर्ण जगाने केले.



# किमती वेफर्स



जगभरात बटाटा वेफर्सच्या चाहत्यांची कमतरता नाही. बाजारात दहा, वीस रुपयांना बटाटा वेफर्सची पाकिटं मिळतात. हे चविष्ट वेफर्स सारखे खावेसे वाटतात. बटाटा वेफर्स हा सगळीकडे उपलब्ध असणारा पदार्थ. त्यामुळे त्यासाठी फार पैसे मोजावे लागत नाहीत. मात्र एक कंपनी विशिष्ट प्रकारचे बटाटा वेफर्स तयार करते. त्यांच्या एका वेफरची किंमत ७८५ रुपये आहे.

या कंपनीच्या बटाटा वेफर्सच्या एका पाकिटाची किंमत ५६ डॉलर्स म्हणजे चार हजार रुपये आहे. गंमत म्हणजे या पाकिटात फक्त पाच वेफर्स असतात. त्यानुसार एका वेफरची किंमत भारतीय चलनात ७८५ रुपये होते. म्हणजे हे बटाटा वेफर्सचं जगातलं सर्वात महागडं पाकिट आहे. आता या वेफर्सचं वैशिष्ट्य तरी काय, असा प्रश्न तुम्हाला पडला असेल. स्वीडनमधल्या 'सेंट एरिक्स ब्रुवरी' नामक कंपनी हे वेफर्स तयार करते. या वेफर्सचं पॅकिंग खूपच आकर्षक आहे. छोट्याशा पेटीत हे पाच वेफर्स असतात. या पेटीत एखादा दागिना किंवा मौल्यवान वस्तू आहे की काय, असंच वाटतं. हे वेफर्स वेगवेगळ्या पाच चवींमध्ये उपलब्ध आहेत. ग्राहकांच्या मागणीनुसार ते तयार केले जातात. या वेफर्सच्या डब्यात कंपनीचं प्रमाणपत्रही असतं. बनावट वेफर्सना आळा बसावा यासाठी कंपनी प्रमाणपत्र देते. यासोबतच हे वेफर्स तयार करण्यासाठी महागड्या घटकांचा वापर केला जातो. यासाठी वापरला जाणारा कांदा दुर्मिळ प्रजातीचा असल्याचं कंपनीचं म्हणणं आहे. या कांद्याचं उत्पादन लेकसँड शहरातच होतं. त्यामुळे हे वेफर्स महाग आहेत.



# इथे राहतात हिडिंबेचे वंशज

रामायण आणि महाभारत काळातल्या खुणा आजही पहायला मिळतात. भारतासह इतर काही देशांमध्येही रामायण आणि महाभारत काळाशी संबंधित ठिकाणं आहेत. भीमाने हिडिंबा नामक राक्षसीशी लग्न केल्याचे उल्लेख महाभारतात आहेत. या हिडिंबाचे वंशज आजही अस्तित्वात आहेत. हिडिंबाचे वंशज नागालँडमध्ये रहातात. नागालँडमध्ये फक्त एकच रेल्वे स्थानक आणि विमानतळ आहे. इथल्या दीमापूर शहराला नागालँडचं प्रवेशद्वार म्हटलं जातं. नागालँडच्या उत्तरेला अरुणाचल प्रदेश, पश्चिमेला आसाम तर दक्षिणेला मणीपूर आहे. नागालँडच्या पूर्वेला म्यानमार आहे. दीमापूरमधल्या महाभारतकालीन वास्तू पर्यटकांच्या आकर्षणाचं केंद्र ठरतात. इथे आजही हिडिंबा वाडा आहे. इथे बुद्धिबळाच्या भल्यामोठ्या सोंगट्या पहायला मिळतात. याच सोंगट्यांनी भीम आणि त्याचा पुत्र घटोत्कच बुद्धिबळ खेळत असत असं इथले लोक सांगतात. वनवासादरम्यान पांडवांनी या भागात काही काळ घालवल्याचं म्हटलं जातं. दीमापूर हे एकेकाळी हिडिंबापूर या नावाने ओळखलं जायचं. इथेच भीमाने हिडिंबेशी विवाह केला होता. इथले 'डिमाशा' जमातीचे लोक स्वत:ला हिडिंबाचे वंशज मानतात.

# एस्कलेटरला ब्रश का असतात?

एस्कलेटर म्हणजेच चालत्या जिन्याच्या बाजूला असणाऱ्या ब्रशने तुम्हीसुद्धा अनेकदा बूट किंवा चप्पल साफ करण्याचा प्रयत्न केला असेल. मात्र या जिन्यांच्या दोन्ही बाजूला असणारे ब्रश त्यासाठी नसतात, हे समजून घ्या.

**या ब्रशला काय म्हणतात?**

फिरत्या जिन्यांच्या दोन्ही बाजूला असणारे हे ब्रश बनवण्यासाठी नायलॉनचा वापर केला जातो. या ब्रशला तांत्रिक भाषेत 'सेफ्टी ब्रशेस' असे म्हणतात. काही देशांमध्ये एस्केलेटरवरील या ब्रशला 'स्कर्ट डिफ्लेक्टर्स' म्हणजेच स्कर्टसारख्या गोष्टी दूर ढकलण्याचे काम करणारी गोष्ट म्हणून ओळखले जातात. आता या नावावरुन तुम्हाला या ब्रशचा मूळ उद्देश काय असतो हे लक्षात आले असेलच. एस्केलेटरवरून जाताना अनेकदा लोकांचे कपडे अथवा हातातील गोष्टी किंवा बुटाच्या लेस वा पायातील चप्पल दोन्ही बाजूंच्या कडांमध्ये अडकतात. हे टाळण्याचे काम हे ब्रश करतात. काही तज्ज्ञांच्या मते हे असे ब्रश पाहिल्यानंतर फिरत्या जिन्यांवरुन जाणारे लोक आपोआपच जिन्याच्या दोन्ही बाजूंना अगदी टेकून उभे राहण्याऐवजी लांब उभे राहतात.



# जगातील साठ टक्के लोक होतील लठ्ठ



मुले लहान वयातच लठ्ठपणाने किंवा अनियंत्रित वजनाने ग्रस्त असतील तर त्यांचे आयुष्य कमी होण्याचा धोका वाढतो. लठ्ठपणाच्या तीव्रतेबद्दल एका ताज्या अभ्यासात हा निष्कर्ष काढण्यात आला आहे. या अभ्यासानुसार, योग्य ती पावले उचलली गेली नाहीत तर २०५० पर्यंत जगातील सुमारे ६० टक्के प्रौढ आणि एक तृतीयांश मुले अधिक वजनाची असतील किंवा लठ्ठपणाने ग्रस्त असतील, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

'लॅन्सेट मेडिकल जर्नल'मध्ये प्रकाशित झालेल्या या संशोधनात २०४ देशांमधील विदेचा वापर करून शतकातील सर्वात मोठ्या आरोग्य आव्हानांपैकी एक असणाऱ्या समस्येचे भयानक चित्र रेखाटण्यात आले आहे. हा अभ्यास 'सिएटल इन्स्टिट्यूट फॉर हेल्थ मेट्रिक्स अँड इव्हॅल्युएशन'ने समन्वयित केलेल्या 'ग्लोबल बर्डन ऑफ डिसीज' कार्यक्रमांतर्गत केलेल्या संशोधनावर आधारित आहे.

**अभ्यासातील महत्त्वाचे मुद्दे**

※ जगभरात जास्त वजन असणाऱ्या किंवा लठ्ठ लोकांची संख्या १९९० मध्ये ९२९ दशलक्ष होती ती २०२१ मध्ये २.६ अब्ज झाली आहे.

※ पुढील १५ वर्षांत ३.८ अब्ज प्रौढ लोक जास्त वजनाचे किंवा लठ्ठ असतील. याचा अर्थ असा की २०५० मध्ये जगातील एकूण प्रौढ लोकसंख्येपैकी सुमारे ६० टक्के लोक लठ्ठपणाने ग्रस्त असतील.

※ यामुळे अर्थातच जगाची आरोग्य व्यवस्था कोलमडेल. जगातील जवळजवळ एक चतुर्थांश लठ्ठ लोकांचे वय ६५ पेक्षा जास्त असेल असा अंदाजही वर्तवण्यात आला आहे.

※ आधीच जास्त भार असलेल्या आरोग्य व्यवस्थांवर दबाव वाढला आहे आणि मर्यादित संसाधने असणाऱ्या देशांमध्ये वैद्यकीय सेवांवर त्याचा परिणाम होत आहे.

※ लवकरच जगभरातील मुले आणि किशोरवयीन मुलांमध्ये लठ्ठपणा १२१ टक्क्यांनी वाढेल.

※ २०५० पर्यंत लठ्ठ तरुणांपैकी एक तृतीयांश तरुण उत्तर आफ्रिका आणि मध्य पूर्व, लॅटिन अमेरिका तसेच कॅरिबियन प्रदेशात राहतील.

**आठ देशात सर्वाधिक लठ्ठ**

सध्या, जगातील निम्म्याहून अधिक जास्त वजन असणारे किंवा लठ्ठ प्रौढ लोक फक्त आठ देशांमध्ये राहतात आणि यामध्ये भारताचाही समावेश आहे. चीन, भारत, अमेरिका, ब्राझील, रशिया, मेक्सिको, इंडोनेशिया आणि इजिप्त आणि नायजेरिया असे हे देश आहेत. भारत, पाकिस्तान आणि चीन सारख्या दाट लोकवस्ती असणाऱ्या देशांमध्ये लठ्ठपणा प्रतिबंधाला प्राधान्य दिले पाहिजे.

**मधुमेहाला निमंत्रण**

संशोधकांनी इशारा दिला आहे, की प्रत्येक देशातील मुलांचे वजन मागील पिढ्यांपेक्षा वेगाने वाढत असून लठ्ठ होण्याचे वय कमी होत आहे. त्यामुळे लहान वयातच टाइप २ मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयरोग आणि कर्करोग होण्याचा धोका वाढत आहे. उच्च उत्पन्न असणाऱ्या देशांमध्ये १९६० च्या दशकात जन्मलेल्या सुमारे सात टक्के पुरुष २५ वर्षांच्या वयापर्यंत लठ्ठ होत होते. परंतु १९९० च्या दशकात जन्मलेल्या पुरुषांसाठी हा आकडा १६ टक्क्यांपर्यंत वाढला आहे आणि २०१५ मध्ये जन्मलेल्या पुरुषांसाठी तो २५ टक्क्यांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे.

**लठ्ठपणा कशाला म्हणतात?**

जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, लठ्ठपणा हा एक जुनाट आणि गुंतागुंतीचा आजार असून तो जास्त चरबी जमा होण्यामुळे होतो. ही बाब आरोग्याला हानी पोहोचवू शकते. लठ्ठपणामुळे हाडांच्या आरोग्यावर आणि गर्भधारणेवर परिणाम होऊ शकतो. तसेच लठ्ठपणामुळे झोपणे किंवा चालणे यावरही परिणाम होतो. जागतिक आरोग्य संघटनेनुसार, एखाद्या प्रौढ व्यक्तीचा बॉडी मास इंडेक्स (वजन आणि उंचीचे प्रमाण) २५ किंवा त्याहून अधिक असेल तर त्याला जास्त वजन मानले जाते. बॉडी मास इंडेक्स ३० किंवा त्याहून अधिक असेल तर ती व्यक्ती लठ्ठ मानली जाईल.

# गावांच्या समस्या सोडविणारे प्रयोग करा : नितीन गडकरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

विज्ञान आणि तंत्रज्ञानामध्ये विद्यार्थ्यांची रुची वाढणे आवश्यक आहे. आपण अवगत केलेल्या ज्ञानातून साकारणारे प्रयोग गावांच्या, समाजाच्या समस्या सोडविणारे ठरावेत, अशी अपेक्षा केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केली. ब्लाईंड रिलिफ असोसिएशनच्या सभागृहात त्यांनी शालेय विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते.

पाय जॅम फाउंडेशनच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय फ्युचर प्रोग्रामचे उद्घाटन नितीन गडकरी यांच्या हस्ते झाले. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, फाउंडेशनचे शोएब दर, समन्वयक संजय हरदास यांची प्रमुख उपस्थिती होती.



नितीन गडकरी म्हणाले, जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकणाऱ्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण व्हावी आणि त्यांनी नवनवीन प्रयोग करावेत, त्यांच्या जिज्ञासू वृत्तीला प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने विज्ञान प्रदर्शन आयोजित करणे प्रशंसनीय आहे.


पाय जॅम फाउंडेशन व जिल्हा परिषदेने चांगल्या उद्देशातून हे आयोजन केल्याबद्दल त्यांचे विशेष अभिनंदन.

विज्ञानाचा संबंध आयुष्याशी आहे. आयुष्यात मोठे व्हायचे असेल तर विज्ञान, तंत्रज्ञानाची जाण आवश्यक आहे. याठिकाणी ग्रामीण भागातील शाळांच्या विद्यार्थ्यांनी जे प्रयोग प्रदर्शित केले आहेत, त्यातील कोणते प्रयोग आपल्या गावांमधील किंवा समाजातील समस्या सोडवू शकतात, याचा विचार करावा. विज्ञान-तंत्रज्ञानाच्या आवडीमध्ये भविष्य बदलण्याची शक्ती आहे. गावाच्या व समाजाच्या समस्या सोडविणारे, रोजगार देणारे प्रयोग काळाची गरज आहेत, असेही नितीन गडकरी म्हणाले.

यावेळी वेस्ट टू वेल्थचे उदाहरण देखील नितीन गडकरी यांनी विद्यार्थ्यांना दिले. ते म्हणाले, ह्यकुठलीही वस्तू टाकाऊ नसते. योग्य दृष्टी असेल तर टाकाऊ वस्तूंचाही योग्य वापर होऊ शकतो. कचऱ्यातील प्लास्टिकपासून कच्चे पेट्रोल तयार होते. ऑरगॅनिक कचऱ्यापासून सीएनजी तयार होतो. जुन्या कपड्यांपासून पिशव्या तयार केल्या तर त्याला चांगली मागणी आहे. नागपूरमध्ये धोटे नावाच्या तरुणीने मेहेंदी काढण्याचे कौशल्य अनेक मुली आणि महिलांना शिकवले. आज मेहेंदी काढण्याच्या कौशल्यातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण झाला आहे.

नागपूरला शंभर एकर जागेत ग्लोबल युनिव्हर्सिटी ऑफ लॉजिस्टिक आणि स्किल डेव्हलपमेंट होणार आहे. त्यादृष्टीने सामंजस्य करार देखील झाला आहे. या विद्यापीठात ग्रामीण भागातील तरुणांना जागतिक दर्जाचे कौशल्य शिकवले जाईल, असेही नितीन गडकरी म्हणाले.

# नागपूर शहरातील संचारबंदी पूर्णतः हटवली



## पोलिस आयुक्तांनी जारी केले आदेश

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :

नागपूर शहरात १७ मार्च रोजी रात्री साडे आठ वाजेच्या सुमारास दोन गटांत मोठा हिंसाचार उसळला होता. या घटनेनंतर पोलिसांनी नागपूर शहरातील ११ पोलिस ठाण्यांच्या संचारबंदी लागू केली होती. हिंसाचाराच्या सहा दिवसांनंतर आज रविवारी दुपारी तीन वाजेपासून शहरातील संपूर्ण संचारबंदी हटवण्यात आली आहे. पोलिस आयुक्त रवींद्र सिंगल यांनी याबाबतचे आदेश जारी केले आहेत.

नागपूर शहरात हिंसाचार उसळल्यानंतर शहरातील कायदा व सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी उपाययोजना शहरात संचारबंदी लागू करण्यात आली होती. यामुळे जनजीवन विस्कळीत झाले होते. दंगलग्रस्त परिसराशिवाय अन्य भागात कायदा व सुव्यवस्थेचा कोणताही प्रश्न निर्माण झाला नाही. त्यामुळे पोलिस आयुक्तांनी टप्प्याटप्प्याने संचारबंदी उठवण्यास परवानगी दिली होती. गुरुवारी नंदनवन व कपिलनगरमधील तर शनिवारी पाचपावली, शांतीनगर, लकडगंज, सक्करदरा आणि इमामवाडा येथील संचारबंदी हटवण्यात आली होती. यशोधरानगर येथे संचारबंदी कायम ठेवण्यात आली होती.

नागपूर शहरात हिंसाचार झालेल्या भागातील संचारबंदी आज दुपारी तीन वाजेपासून हटवण्यात आली आहे. नागपूर शहरातील संपूर्ण पोलिस स्टेशन परिसरातील संचारबंदी हटवलेली आहे. यामुळे नागरिकांना दिलासा मिळेल. लोकांनी कोणत्याही अफवेवर विश्वास न ठेवता शांतता कायम राखतील, कायदा - सुव्यवस्था बिघडणार नाही, याची काळजी घेतील, अशी आम्ही आशा करतो, असे नागपूरच्या डीसीपींनी सांगितले. नागपूरमधील जो संवेदनशील भाग आहे, तिथे पोलिसांचा बंदोबस्त राहील, असेही त्यांनी सांगितले. संचारबंदी लावलेल्या भागातील स्थिती सध्या सामान्य आहे. परंतु, महत्त्वपूर्ण अशा गणेश पेठ, तहसील, कोतवाली हद्दीत पोलिसांचा बंदोबस्त राहणार आहे, पोलिसांनी सांगितले आहे.

दरम्यान, नागपूर शहरातील संचारबंदी पूर्णतः उठवली असली, तरी भालदारपुरा, मोमीनपुरा, चिटणीस पार्क चौक, हंसापुरी आणि इतर तणावग्रस्त भागांमध्ये पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त राहणार आहे. या ठिकाणी संचारबंदी उठवली असली तरी, सशस्त्र जवान अजूनही रस्त्यावर तैनात आहेत. पोलिसांची देखील गस्त वाढवण्यात येणार आहे. संचारबंदी हटवल्यानंतर जर कुणी संशयास्पद स्थितीत फिरताना किंवा हालचाली करताना आढळल्यास त्याला ताबडतोब ताब्यात घेण्याचे आदेश पोलिस आयुक्तांनी दिले आहेत.

### १०४ दंगलखोरांची ओळख पटली, ९२ जणांना अटक

दरम्यान, नागपुरातील हिंसाचाराच्या प्रकरणात आतापर्यंत १०४ दंगलखोरांची ओळख पटली आहे. त्यापैकी ९२ जणांना अटक केली आहे. तर १२ जण अल्पवयीन असल्याने त्यांच्यावरही विधिसंघर्षित कायद्यानुसार कारवाई सुरु आहे. संपूर्ण प्रकरणात आम्ही बजरंग दल विश्व हिंदू परिषद आणि इतरांवर गुन्हा दाखल केला आहे. मात्र हिंसाचार करणाऱ्या कुणालाही या प्रकरणातून सोडले जाणार नाही. पोलिसांवर हल्ला करणे हे अतिशय गंभीर बाब असून अशा हल्लेखोरांना जर सोडले तर हे कायदा आणि सुव्यवस्था या दृष्टीने योग्य नाही. परिणामी त्यांना अद्दल घडवल्याशिवाय सोडणार नाही असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे.

# सिलिंडरच्या स्फोटात एक ठार, दोघे गंभीर

■ महासागर प्रतिनिधी,
बुलढाणा, दि. २३ :

विदर्भाचे प्रवेश द्वार आणि खान्देश व मध्यप्रदेश राज्याच्या सीमेला लागून असलेल्या मलकापूर शहराची रविवारची दुपार शहर वासियांना हादरविणारी ठरली! ऑक्सिजन सिलिंडर चा भीषण स्फोट होऊन एक इसम ठार झाला तर दोघे जन गंभीर जखमी झाले.



मलकापूर शहरातील लक्ष्मीनगर परिसरात हा खळबळजनक आणि तितकीच भीषण घटना घडली. प्राप्त प्राथमिक माहितीनुसार घटनेची माहिती पुढीलप्रमाणे आहे. यानुसार लक्ष्मी नगर भागात आज रविवारी, २३ मार्च रोजी दुपारी एका ऑटोमध्ये ऑक्सीजन सिलिंडर टाकत असताना अचानक स्फोट झाला. या स्फोटात एक जण ठार झाला असून, दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. सिलिंडर चा स्फोट नेमका कश्यामुळे झाला हे कळू शकले नाही. प्राथमिक माहितीनुसार, ऑटोमध्ये ऑक्सिजन सिलिंडर ठेवत असताना गॅस गळती किंवा अन्य तांत्रिक कारणामुळे हा स्फोट झाला असावा, अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे.

स्फोटाचा जोरदार आवाज एकटाच परिसरातील नागरिकांनी आवाजाच्या दिशेने धाव घेतली. घटना स्थळीचे दृश्य मनाला हेलावून टाकणारे होते. नागरिकांनी जखमींना दिलासा दिला. त्यानंतर जखमींना पुढील उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आले आहे. यघटनास्थळी मलकापूर पोलीस दाखल झाले असून स्फोट नेमके कश्यामुळे झाला याचा तपास करण्यात येत आहे.

# देशमुख-सूर्यवंशी हत्या प्रकरणी जनआक्रोश मोर्चा

■ महासागर प्रतिनिधी,
अहिल्यानगर, दि. २३ :

मस्साजोग (जि. बीड) येथील सरपंच संतोष देशमुख हत्या व सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणी जनतेने दबाव निर्माण करावा. तरच याप्रकरणी कुटुंबियांना न्याय मिळेल, असे प्रतिपादन माजी कुलगुरू डॉ. सजेर्राव निमसे यांनी केले. कोहिनूर मंगल कार्यालयात आयोजित मराठा समाजाच्या बैठकीत ते बोलत होते. देशमुख हत्या प्रकरणात न्याय मिळण्यासाठी अहिल्यानगर शहरात १३ एप्रिल रोजी सर्व जातीधर्मीय, सर्वपक्षीय महा जनआक्रोश मोर्चा काढला जाणार आहे. त्याच्या नियोजनासाठी ही बैठक पार पडली.

जिल्ह्यातील मराठा समाजासह विविध जाती धर्मातील कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संजीव भोर, ॲड. अनुराधा येवले, जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्ष स्वाती जाधव, माजी नगरसेवक दिलीप सातपुते, अनिल शिंदे, डॉ. दिलीप पवार, डॉ. अविनाश मोरे, आदी उपस्थित होते. डॉ. निमसे यांनी बीडमध्ये जो प्रकार सुरू आहे तो भयानक आहे. अनेक हत्या या जिल्ह्यात घडल्या आहेत, असे सांगितले.

# मोहफुल वेचायला गेलेली महिला वाघाच्या हल्ल्यात ठार

■ महासागर प्रतिनिधी,
गोंदिया, दि. २३ :

जिल्ह्यातील अर्जुनी/मोरगाव - तालुक्याच्या शिवराम/टोला येथे मोहफुल वेचण्यासाठी जंगलात गेलेल्या महिलेवर वाघाने हल्ला करून तिला ठार केल्याची घटना गोठणगाव वनपरिक्षेत्र अंतर्गत येणाऱ्या राजोली सहवन क्षेत्राच्या शिवराम/टोला जंगलात आज रविवारी पहाटेच्या सुमारास घडली. वन विभागातील सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार शिवराम/टोला गावातील अनुसया धानु कोल्हे वय ४५ वर्ष या गावातील इतर महिलां सोबत जंगलात मोहफुल वेचण्यासाठी गेल्या होत्या. मोहफुल वेचत असताना दबा धरून बसलेल्या वाघाने तिच्यावर अचानक हल्ला केला. दरम्यान अन्य महिला पळून जाऊन बचावल्या मात्र संबंधित महिला वाघाच्या तावडीत सापडली आणि तिचा जागीच मृत्यू झाला. ठार केल्यानंतर वाघाने तिला फरकटत जंगलात नेले या घटनेची माहिती मिळताच गोठणगाव वनविभागाचे अधिकारी, कर्मचारी आणि स्थानिक ग्रामस्थ घटनास्थळी मोठी गर्दी केली होती.

वाघ महिलेला ठार केल्यानंतर काही वेळापर्यंत मृतदेहाजवळ बसून राहिला. त्यानंतर काही वेळानी वन विभागाने महिलेचा मृतदेह घेऊन पुढील कार्यवाहीसाठी पाठवण्यात आला. या घटनेमुळे शिवराम/टोला गावात शोककळा पसरली असून गोठणगाव वनविभागाने नागरिकांना जंगलात एकटे न जाण्याचे आवाहन केले आहे. वनविभागाकडून पीडित कुटुंबाला मदतीसाठी आवश्यक त्या उपाययोजना केल्या जात आहेत. तसेच परिसरात वाघाचा वावर लक्षात घेऊन सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना आखण्यात येत आहेत. मध्यंतरी वन विभागातील वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी गोंदिया जिल्ह्यातील ग्रामीण ग्रामीण भागातील जनतेला सध्याच्या महफूल हंगामात पहाटेच्या सुमारास जंगल परिसरात जाण्यास मनाई करणारे आदेश केले होते. पण मोहफुल हे रात्रीच्या दरम्यान गळून पडतात त्यामुळे गावकरी महिला आणि पुरुष पहाटेच्या सुमारासच वेचणी करिता जातात.

# नागपुरात दंगलग्रस्त भागाची पाहणी करणार कॉंग्रेस समिती

*** पोलिसांनी परवानगी नाकारली**
*** गुन्हा दाखल करण्याचा दिला इशारा**

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २३ :

नागपुरातील दंगलग्रस्त भागात शांतता प्रस्थापित करण्यासाठी कॉंग्रेसने स्थापन केलेली समिती शनिवारी शहरात दाखल झाली. मात्र, नागपूर पोलीस आयुक्त रवींद्र सिंगल यांनी समितीला दंगलग्रस्त भागात जाण्यास मनाई केली आहे.

पोलिसांनी शहर कॉंग्रेसचे अध्यक्ष विकास ठाकरे यांना याबाबतचे पत्र दिले असून दंगलग्रस्त भागात गेल्यास गुन्हे दाखल करण्याचा इशाराही दिला आहे. समितीचे अध्यक्ष माणिकराव ठाकरे यांनी पोलीस आयुक्तांची भेट घेऊन पाहणीची परवानगी मागण्याचे नियोजन केले आहे. सोमवारी विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाने महाल, गांधी गेटजवळील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर आंदोलन केले. यावेळी औरंगजेबाचा प्रतिकात्मक पुतळा आणि चादर जाळण्यात आली. त्यानंतर मध्य नागपुरात दोन गटांमध्ये तणाव निर्माण होऊन दंगल झाली.

परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी सोमवारी रात्रीपासून दंगलग्रस्त भागात संचारबंदी जाहीर करण्यात आली. महाल, इतवारी, गांधीबाग, लकडगंज, कोतवाली परिसरातील बाजारपेठांकडे जाणाऱ्या रस्त्यांवर बॅरिकेड्स लावण्यात आले आहेत. गांधी गेट, महाल चिटणीस पार्क चौक परिसरात मोठ्या प्रमाणात सुरक्षा जवान तैनात करण्यात आले आहेत.

या समितीमध्ये माजी प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे, माजी खासदार हुसेन दलवाई, माजी मंत्री डॉ. नितीन राऊत, ॲड. यशोमती ठाकूर आणि आमदार साजिद पठाण यांचा समावेश आहे. नागपूर शहर कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष आमदार विकास ठाकरे हे निमंत्रक तर अखिल भारतीय कॉंग्रेसचे सचिव प्रफुल्ल गुडधे हे समन्वयक आहेत.

## नागपूर आकाशवाणीचे आता उच्च तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जगभर प्रसारण

# आकाशवाणीच्या कृषि व इतर कार्यक्रमाबाबत बैठक संपन्न

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २३ :

आकाशवाणी नागपुरचे कार्यक्रम पुर्वी ६०० किलोमीटर पर्यन्त ऐकू जात होते. आता ते न्यूज ऑन एयर ॲपच्या माध्यमातून जगभर पोहोचले जात आहेत. केंद्राच्या तांत्रिक सुधारणामुळे उच्च दर्जाचे कार्यक्रम ग्रामीण भागासह शहरी भागात मोठ्या प्रमाणात ऐकल्या जात असल्याचे आकाशवाणी नागपुर केंद्राचे उप महानिदेशक (अभियांत्रिकी) रमेश घरडे यांनी सांगितले.



बुधवार १९ मार्च २०२५ रोजी आकाशवाणी नागपुरच्या कृषी आणि गृह विभागातर्फे ग्रामीण कार्यक्रम सल्लागार समितीची त्रैमासिक बैठक आकाशवाणी नागपुर केंद्राच्या सभागृहात संपन्न झाली. आकाशवाणी कृषि विभागाचे कार्यक्रम अधिकाधिक लोकाभिमुख करण्याचा दृष्टिने निरंतर प्रयत्न करीत असल्याचे कार्यक्रम प्रमुख श्रीमती प्रियदर्शनी राऊत यांनी सांगितले.

बैठकीच्या सुरुवातीला सध्या सुरु असलेल्या तिमाहातील महात्वाच्या प्रसारित होणाऱ्या कार्यक्रमाबाबत माहिती कार्यक्रम अधिकारी सचिन लाडोले यांनी सादर केली. याबाबत उपस्थित विभाग प्रमुखांनी सूचना करून कार्यक्रमांची रूपरेषा निश्चित केली. या बैठकीला माफसूचे संचालक विस्तार अनिल भिखाने, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रविन्द्र मनोहरे, प्रकल्प संचालक आत्मा अर्चना कडू, मुख्य वैज्ञानिक निरी गजानन खडसे, केन्द्रीय कापुस अनुसंधान संस्थाचे अर्जुन तायडे, जिल्हा माहिती अधिकारी विनोद रापतवार, वनविभाग अधिकारी एन आर राउत, रेशीम विकास अधिकारी अनिल ढोले, महाव्यवस्थापक एफ डी सी उत्तम सावंत एम, मत्स्य व्यवसाय अधिकारी जितेश केशवे, कृषी विज्ञान केंद्र साकोलीचे प्रमोद पर्वते, प्रसिध्दी व माहिती अधिकारी वनविभाग संदीप गवारे, अश्विनी टेकाम मत्स्य व्यवसाय अधिकारी, एन बी एस एस एल यु पी शास्त्रज्ञ डॉ अभय शिराले, जयश्री परतेती कृषी अधिकारी, डॉ. हर्षा मेंढे उपस्थित होते. तिमाहातील प्रसारित होणारे कार्यक्रमाचे वाचन शांतनु ठेंगडी आणि रोहणी सूर्यवंशी नैमेत्तिक उदघोषक यांनी केले.

# राज्यातील प्रत्येक गावात वन पाटील नेमणार

**जंगलावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी गावांमध्ये सीबीजी गॅस पुरवठा होणार**

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २३ :

नागपूर येथे मित्रा संस्था आणि वन विभागाच्या आढावा बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. प्रत्येक गावात पोलिस पाटलाच्या धर्तीवर वन पाटील नेमण्यात येणार आहे. स्थानिकांना जंगलातून लाकूड आणि सरपण गोळा करण्यापासून रोखण्यासाठी गावांमध्ये पाइप लाइनद्वारे सीबीजी गॅस पुरवठा केला जाणार आहे.

गडचिरोली जिल्ह्यातील वाघ हल्ल्यांच्या घटना रोखण्यासाठी विशेष उपाययोजना करण्यात येत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार मित्रा संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली आराखडा तयार करण्यात येत आहे.

गेल्या पाच वर्षांत गडचिरोली जिल्ह्यात वाघ हल्ल्यात ५० हून अधिक नागरिकांचा मृत्यू झाला आहे. विशेषतः गडचिरोली, चार्मोशी, आरमोरी, वडसा आणि धानोरा क्षेत्रात या घटना घडल्या आहेत. या पार्श्वभूमीवर अतिरिक्त वाघांचे स्थलांतर तीन महिन्यांत करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

बैठकीत अन्य महत्त्वपूर्ण निर्णयही घेण्यात आले. वन्य प्राण्यांमुळे झालेल्या पीक नुकसानीची भरपाई त्वरित देण्यासाठी ई-पंचनामा पद्धत सुरू करण्यात येणार आहे. चपराळा अभयारण्यातील ६ गावांच्या स्थलांतरासाठी स्थानिकांचे सामाजिक व आर्थिक मूल्यांकन करून नवीन जागेचा शोध घेतला जाणार आहे.

या महत्त्वपूर्ण बैठकीला राज्याच्या प्रधान मुख्य वन संरक्षक शोमिता बिस्वास, अपर प्रधान मुख्य वन संरक्षक विवेक खांडेकर, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे मुख्य वन संरक्षक डॉ. रामचंद्र रामगावकर आणि गडचिरोली वन वृत्ताचे मुख्य वन संरक्षक एस. रमेशकुमार उपस्थित होते.

# महावितरणचे अध्यक्ष लोकेश चंद्र यांना केंद्रीय सिंचन आणि ऊर्जा मंडळाचा पुरस्कार

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २३ :

महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. लोकेश चंद्र यांना केंद्रीय सिंचन आणि ऊर्जा मंडळातर्फे (सीबीआयपी) ऊर्जा क्षेत्रातील विशेष योगदानाबद्दल शुक्रवारी नवी दिल्ली येथे पुरस्कार देण्यात आला.

राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी महावितरणचे कार्यकारी संचालक दत्तात्रय पडळकर उपस्थित होते. मा. लोकेश चंद्र म्हणाले की, आपल्याला मिळालेला पुरस्कार आपण नम्रतेने स्वीकारत असून याचे श्रेय मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील ऊर्जा क्षेत्रातील परिवर्तनासाठी केलेल्या नेतृत्वाला आहे. तसेच आपल्याला सहकार्य करणाऱ्या महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा आपण आभारी आहोत.

मा. लोकेश चंद्र यांनी जून २०२३ मध्ये महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक म्हणून सूत्रे स्वीकारल्यानंतर वीज ग्राहक केंद्रबिंदू मानून महावितरणच्या सेवांमध्ये सुधारणा करण्यावर भर दिला. तसेच त्यांनी अपारंपरिक उर्जेचा वापर करण्यावर भर दिला आणि राज्याची आगामी काळाची गरज ध्यानात घेऊन ऊर्जा परिवर्तन आराखडा राबविण्यास प्राधान्य दिले.




शेतकऱ्यांना कृषी पंपांना दिवसा वीज पुरवठा होण्यासाठीची मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ही जगातील सर्वात मोठी विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती योजना आहे. या योजनेच्या अंमलबजावणीत मा. लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात महावितरणने महत्त्वाचे योगदान दिले आहे. या योजनेमुळे आगामी वर्षात राज्यातील सर्व कृषी पंपांना सौर उर्जेचा पुरवठा करता येईल.

महावितरणने वीज खरेदी करारात अपारंपरिक ऊर्जेवर भर दिल्यामुळे आगामी पाच वर्षात कंपनीचे वीज खरेदीचे एक लाख ३० हजार कोटी रुपये वाचणार असून त्यामुळेच महावितरणने पाच वर्षात टप्प्याटप्प्याने वीजदर कमी करण्यासाठी महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे परवानगी मागितली आहे. भविष्यात राज्याची विजेची गरज किती वाढेल व ती कशी पूर्ण करायची याचा सविस्तर रिसोर्स ॲडेक्वसी प्लॅन महावितरणने तयार केला असून त्याची अंमलबजावणी सुरू आहे. त्यामुळे २०३० पर्यंत राज्याची ५२ टक्के विजेची गरज ही अक्षय्य ऊर्जेच्या आधारे पूर्ण होईल. मा. लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात शेतकरी व घरगुती ग्राहकांना रिन्युएबल एनर्जीचा अधिकाधिक उपयोग होण्यावर भर देण्यात आला. त्यामुळे मागेल त्याला सौर कृषी पंप योजना राबविण्यात महावितरणने आघाडी घेतली आहे. सौर ग्राम योजनेच्या अंतर्गत गावांना ऊर्जा स्वयंपूर्ण करतानाच त्यांना वीजबिलातून मुक्त करण्यात येत आहे. त्याचबरोबर सार्वजनिक पाणी पुरवठा योजना आणि पथदिवे सौर ऊर्जेवर चालविण्यासाठीच्या योजनेसाठी त्यांनी पुढाकार घेतला आहे.

## पाठलाग करणाऱ्या पोलिसांच्या वाहनाला लाथ मारली

# एका पोलिसाचा मृत्यू, दुसरा जखमी

■ महासागर प्रतिनिधी,
बुलढाणा, दि. २३ :

दारूची अवैध वाहतूक व विक्री करणाऱ्या व्यक्तीने आपला पाठलाग करणाऱ्या पोलिसाच्या दुचाकीला लाथ मारल्याने झालेल्या विचित्र अपघातात एका पोलिसाचा जागीच मृत्यू झाला. त्यांचा सहकारी पोलीस कर्मचारी गंभीर जखमी झाला आहे. त्याला नजीकच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. अपराध्याचे मनोधैर्य किती वाढले याचे ज्वलंत उदाहरण ठरलेल्या या घटनेने जिल्हा पोलीस दल अक्षरशः हादरले आहे.

आज रविवारी, २३ मार्चला भर दिवसा घडलेल्या या अभूतपूर्व आणि तितक्याच भीषण घटनेने ही बाब सिद्ध झाली आहे. अंढेरा पोलीस ठाणे हद्दीत ही घटना घडली असून मृत पोलीस आणि जखमी हे अंढेरा पोलीस ठाण्याशी संबंधित आहे.

या भीषण घटनाक्रमात एका दारू विक्रेत्याने पाठलाग करणाऱ्या पोलिसांच्या दुचाकी वाहनाला लाथ मारली. पोलीस कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला. चिखली तालुक्यातील शेळगाव आटोळ जवळ ही घटना घडली आहे. दोन्ही पोलीस कर्मचारी अंढेरा पोलीस स्टेशन मध्ये कार्यरत होते. भागवत गिरी असे मृत्यू झालेल्या पोलिस कर्मचाऱ्याचे नाव असून राम आंधळे नामक पोलीस कर्मचारी गंभीर जखमी झाले आहे.

येथे प्राप्त माहितीनुसार अंढेरा पोलीसठाण्याचे पोलीस कर्मचारी राम आंधळे आणि भागवत गिरी दुचाकीने शेळगाव आटोळ परिसरात पेट्रोलिंग करत होते. शिवणकर नामक अवैध दारू विक्रेता दारूचे बॉक्स घेऊन शेळगाव आटोळकडे येत होता. ही माहिती मिळाल्यानंतर पोलिस कर्मचाऱ्यांनी तातडीने पाठलाग सुरु करून शिवणकरला पकडण्याचा प्रयत्न केला.

आता आपण पकडले जाऊ याची खात्री झाल्याने मिसाळवाडी ते शेळगाव आटोळच्या मध्ये शिवणकरने पोलिसांचा दुचाकीला लाथ मारली. त्यामुळे भर वेगातील दुचाकी रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडाला जाऊन जोराने धडकली. यात दुचाकी चालवणारे भागवत गिरी यांचा जागीच मृत्यू झाला. जखमी पोलीस राम आंधळे यांना घेऊन कृष्णा मिसाळ यांनी चिखली येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे.